## सातारा नगरपरिषद, सातारा - लेखा परीक्षण अहवाल सन २०११-१२

क्र. स्था-२/ब/१/नपालेप/सातारा/११-१२/पुणे/२३४

**सह संचालक,**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**पुणे विभाग, पुणे**
**लेखा कोष भवन, ३ रा मजला, पुणे**
दि. ३०/०३/२०१३

प्रेषक

**सह संचालक,**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे विभाग, पुणे**

प्रति,

**मा. अध्यक्ष,**
**सातारा नगरपरिषद, सातारा**

सातारा नगरपरिषदेचे सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्री. शैलेश हिं. मोरे सहा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सातारा व सर्वश्री रा. अ. शिंदे, रा. बा. गोसावी, व.ले.प., बा. प्र. ससाणे, स. सु. तांबोळकर, स. अ. शिंदे, मि. वि. जगताप सर्व क.ले.प. स्थानिक निधी लेखापरीक्षा, सातारा यांनी मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे नियम ४ अन्वये दि. २२/१०/२०१२ ते ३१/१२/२०१२ या कालावधीत पूर्ण केले व त्याचे अंतिमीकरण श्री. संजय शहा, सह. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे यांनी दिनांक १८/०१/२०१३ रोजी केले आहे

### पदाधिकारी / अधिकारी कालावधी

| अ.क्र. | नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | सौ. स्मिता चंद्रशेखर घोडके | नगराध्यक्ष | दि.०५/०२/२०११ ते १६/१२/२०११ |
| २. | सौ. मुक्ता वसंत लेवे | नगराध्यक्ष | दि.२२/१२/२०११ ते ३१/०३/२०१२ |
| ३. | श्री. टी. आर. लवंगारे | मुख्याधिकारी | दि.०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१२ |

## लेखा परिक्षण अहवालाचा सारांश

चालू लेखा परिक्षणाअंती आढळलेल्या वित्तीय अनियमितता बाबत या अहवालात (भाग–२ मध्ये) नमूद केलेल्या एकूण आक्षेपांची संख्या ८८ असून संक्षेपाने खालील वर्गीकरणा प्रमाणे त्यांची माहिती आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षण अधिनियमाच्या कलम ९(अ) प्रमाणे कायदा बाह्य खर्चाबाबत परिच्छेद. | परिच्छेद क्र. १ ते १५ (२०११–१२) एकूण परिच्छेद – १५ | एकूण रु.४,९३,५२१ ची वसुली आवश्यक आहे. |
| २. | मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमाच्या कलम ९ (ब) नुसार अक्षम्य हयगय/ गैरवर्तणुक यामुळे तसेच अन्य कोणतेही नुकसानी बाबत परिच्छेद. | परिच्छेद क्र. १६ ते ५२ (२०११–१२) एकूण परिच्छेद – ३७ | एकूण रु.६,३०,९७०/– ची वसूली आवश्यक आहे. तसेच शासन/अन्य सक्षम अधिकारी यांचे क्षमापन आवश्यक प्रकरणी आक्षेपां बद्दल समर्थनार्थ स्पष्टीकरण आवश्यक आहे. |
| ३. | मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमाच्या कलम ९ (ड) नुसार वरील १ ते ३ शिवाय अन्य महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी बद्दल परिच्छेद | परिच्छेद क्र. ५२ ते ८८ (२०११–१२) एकूण परिच्छेद – ३६ | याबाबत अभिलेख पूर्ण करून ते व अनुपलब्ध अभिलेखांचे लेखापरीक्षण करून घेणे तसेच पदाधिकाऱ्यांचे क्षमापन आवश्यक तेथे ठरावाने मान्यता आणि आक्षेपां–बाबत समर्थनासह स्पष्टीकरण अशी पूर्तता आवश्यक आहे. |

आवश्यक ती विवरणपत्रे अहवालासोबत जोडलेली आहेत.

## भाग पहिला - मागील लेखापरिक्षण अहवाल

खालीलप्रमाणे लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद प्रलंबित असून त्याबाबत मा. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडे स्वतंत्र पत्रव्यवहार करणेत येत आहे.

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| १. | १९७२/७३/७४ | ८ | १ |
| २. | १९७६/७७/७८ | ७, ६२ | २ |
| ३. | १९७८/७९/८० | ७, ३३, ८३ | ३ |
| ४. | १९८०/८१/८२ | ५, २६, ३४, ३५, ३७, ८१, ८२ | ७ |
| ५. | १९८२/८३/८४ | ८, ३२, ३७, ३९, ४४, ६३, ९४, १०६ | ८ |
| ६. | १९८२/८५/८६ | ८, १७, १८ | ३ |
| ७. | १९८६/८७ | १३, १४, १५, ६६, ८२, १०२ | ६ |
| ८. | १९८७/८८ ते १९८९/९० | १०, १७, २५, २७, ३८, ५१, १४५, १५०, १८८, १९७, २१५ | ११ |
| ९. | १९९०/९१/९२ | ४, २६, ६६, १०२ | ४ |
| १०. | १९९२/९३ | २२,२६,२७, ३२, ४५, ७०, ७१, ८७, ९४,१०६(२) | १० |
| ११. | १९९६/९८ ते १९९८/९९ | ९, १०, १२, १५, १६, १७, २३, २५, ३०, ३१, ३२, ३३, ४७, ४८, ५८, ६०, ९३, १०४, १०९,१२१, १४५, १४७, १५१, १६८, १८७, १९८, २०० | २७ |
| १२. | १९९९/२००० ते २०००/०१ | १६, ४४, ५५, ६४, ६९, ७१, १७५, १७६, १८०, १९३, २०६, २१६, २२१. | १३ |
| १३. | २००१/०२ ते २००२/०३ | ५, २२, ४२, ४४, ४६, ४७, ४८, ५४, ९२, ९७,१०३, १०५, १०६, १११, ११५, ११७, १२३, १२८, १२९ | १९ |
| १४. | २००३/०४ | ६, १६(ब), १८, २२, २७, ४३(ब), ४४, ४६, ४७, ४८, ४९, ५५, ५८, ५९, ६१, ७०, ७७, ८२, ८४, ९६, ९७ | २१ |

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| १५. | २००४/०५ | १४, १७, १८, २४, ३०, ३२, ३४, ३६, ५०, ५१ ५६, ५७, ६५, ९४, ९५, ९६, ९७. | १७ |
| १६. | २००५/०६ | ५, ६, ७, १०, १९, २०, २३, २५, ३८, ३९, ४०, ४३, ४५, ४६, ४७, ६२, ७६, ७७(२), ८१, ८२, ८७, ८९. | २२ |
| १७. | २००६/०७ | ४, ६, ८, ९, ११, १२, १४, १५, १६, १८, २४, २५, ३३, ३४, ३८, ३९, ४४, ४५, ४६, ४७, ४९, ५१,५५, ५६, ६०, ६१, ६३, ६४, ६६, ६७, ६८, ६९, ७१,७३, ७४, ७५, ७७, ७८, ७९, ८१, ८२, ८३, ८४, ८६, ८७, ८९, ९२, ९३, ९४, ९५, ९९, १००, १०१. | ५२ |
| १८. | २००७/०८ | ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १३, १५, १७, १९, २१, २२, २९, ३६, ३७, ३८, ४०, ४१, ४७, ५६, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६५, ७०, ७२, ७३, ७५, ७६, ८०, ८३, ८४, ८६, ८७, ८८, ९०(ब), ९१, ९३, ९८ | ४५ |
| १९ | २००८/०९ | ४, ५, ६, ७, ८, १०, ११, १२, १३, १५, १६, १७, २२, २४, २६, ३३, ३४, ३५, ४१, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ५२, ५३, ५५, ५७,६३,६४, ६५, ६६, ७१ | ३३ |
| २०. | २००९-१० | १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २३, २४,२५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२,३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८० | ८० |

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | परिच्छेद क्रमांक व तपशील | एकूण |
|---|---|---|---|
| २१ | २०१०-११ | १) आर्थिक स्थितीवरील अभिप्राय<br>२) अंदाजपत्रकाबाबत<br>३) दुहेरी नोंद पद्धतीची अंमलबजावणी करणेबाबत.<br>४) लेखा परीक्षणास अभिलेखे सादर न केलेबाबत.<br>५) जंतुनाशके खरेदीतील अनियमिततेबाबत.<br>६) सुधारीत सातारा पाणीपुरवठा वितरण व्यवस्था योजनेबाबत.<br>७) घनकचरा व्यवस्थापनाबाबत.<br>८) न. पा. साताराकडील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक वेतनश्रेणीबाबत.<br>९) भ. नि. निधीमधील गुंतवणुकीबाबत.<br>१०) अंध अपंग कल्याणकारी योजनेवर खर्च न केलेबाबत.<br>११) वॉर्ड क्र. ३३ पेठ शनिवार आतार बिल्डींग पिछाडीस संरक्षक भिंत बांधणे.<br>१२) वाहन देखभाल दुरुस्तीवरील नियमबाह्य खर्चाबाबत.<br>१३) किमान रोख शिल्लक ठेवणेबाबत.<br>१४) पाणीपुरवठा योजना तोट्यात असल्याबाबत.<br>१५) प्रलंबित तसलमात रकमा वसुलीबाबत.<br>१६) पेठ भवानी सि.स.नं. ७ पैकी अ. क्र. ९ मध्ये भाजीपाला व फळ विक्री केंद्र बांधणे.<br>१७) गुरुवार पेठ सि.स.नं. २७१ मधील अ. क्र. ५३ मधील खेळाचे मैदान विकसित करणे.<br>१८) जादा दराने ब्लिचिंग पावडर खरेदी केलेबाबत. | |

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | परिच्छेद क्रमांक व तपशिल | एकूण |
|---|---|---|---|
| | | १९) नागरी सुविधा केंद्र व सर्व्हर रुम तयार करणेबाबत.<br>२०) भैरोबा मंदीर शेजारी रस्ता कॉंक्रीट करणे.<br>२१) सि. स. नं. २०९ गोडोली येथील दवाखान्याचा पत्रा बदलणे.<br>२२) श्री छत्रपती सुमित्राराजे उद्यानाच्या कडेला बाग गृह बांधणे.<br>२३) वॉर्ड क्र. १० न. पा. मालकीची गाळ काढणे व दुरुस्त करणे.<br>२४) पेठ मल्हार स. नं. ७५ येथे व्यापारी संकुल बांधणे.<br>२५) खाजगी वहानाने मुंबई प्रवास.<br>२६) वॉर्ड क्र. ३७ पद्मावती मंदीर ते शिंदे घर पाईप ड्रेन करणे.<br>२७) वॉर्ड क्र. ३७ सर्व्हे नं. ६४४ ते पटवेकर घर आर.सी.सी. गटर करणे.<br>२८) न. पा. कर्मचाऱ्यांच्या ६ व्या वेतन आयोग वेतन निश्चिती व जादा अदाईबाबत.<br>२९) कोर्ट केसेस नोंदवही व वकील फी अदाईबाबत.<br>३०) नविन निर्धारण सूची करणे व कर पात्र मूल्ध सुधारणा.<br>३१) फेर कर आकारणीवरील अपीलाबाबत.<br>३२) बृहत पत्रकातील तफावतीबाबत.<br>३३) आरोग्य विभागाने ठेक्याने दिलेल्या कामाबाबत.<br>३४) पा. पु. व अग्निशामन व्यवस्थापनाबाबत.<br>३५) ई गर्व्हनस अंतर्गत डाटा एंट्री निविदा मंजूरीतील त्रुटी व कामातील अनियमितता. | |

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | परिच्छेद क्रमांक व तपशिल | एकूण |
| --- | --- | --- | --- |
| | | ३६) युपीएस दुरुस्ती व नवीन बॅटऱ्या निविदा त्रुटीबाबत. | |
| | | ३७) महिला बालकल्याण योजना नियमबाह्य खर्चाबाबत. | |
| | | ३८) रोखपाल हाताळणी रकमेचा विमा उतरविणेबाबत. | |
| | | ३९) इमारत गाळा भाडेबाबत. | |
| | | ४०) पालिका सदस्याकडील कराच्या थकबाकीबाबत. | |
| | | ४१) शिक्षण कर व रोजगार हमीकर कमी आदा भरणेबाबत. | |
| | | ४२) जमा पावती पुस्तकाबाबत. | |
| | | ४३) चलन पडताळणीबाबत. | |
| | | ४४) कराची वाढ रक्कमेबाबत. | |
| | | ४५) जागतिक महिला दिन खर्चाबाबत. | |
| | | ४६) स्टेशनरी खरेदीबाबत. | |
| | | ४७) निविदा नमुन्याची विक्री किंमतीबाबत. | |
| | | ४८) टोपे मामा दत्त मंदिर ते अदालत वाडा रस्ता डांबरीकरण व संरक्षक भिंत व गटर बांधणे. | |
| | | ४९) वॉर्ड क्र. २० इनामदार घर ते पेव्हींग ब्लॉक बसविणे. | |
| | | ५०) वॉर्ड क्र. २१ सर्व्हे नं. १५ दिक्षित घर ते जाधव घर चेंबर बांधणे. | |
| | | ५१) वॉर्ड क्र. २१ रामाचा गोट सर्व्हे नं. २६१ ते २४७ ते ३१७ चोरगे घर पाईप ड्रेन करणे. | |
| | | ५२) शिवम कॉलनी जुना पूल पाडून नविन पूल बांधणे. | |
| | | ५३) शाहू कला मंदिर कुंपण भिंत, पार्किंग कामे करणेबाबत. | |
| | | ५४) राजमाता जिजाऊ उद्यान येथे वॉचमन केबीन बांधणे. | |
| | | ५५) वॉर्ड क्र. ६ अंतर्गत बोळ व रस्ते पेव्हर ब्लॉक बसविणे. | |
| | | ५६) वॉर्ड क्र. ३० सांस्कृतिक भवन विद्युतीकरण करणे. | |

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | परिच्छेद क्रमांक व तपशिल | एकूण |
|---|---|---|---|
| | | ५७) गोडोली नं. २३ न. पा. शाळा ध्वनिक्षेपक बसविणे. | |
| | | ५८) शाहु कला मंदिर अंतर्गत सुशोभिकरण. | |
| | | ५९) पवई नाका ट्रॅफिक सिग्नलसाठी पोल रोवणे. | |
| | | ६०) पवई नाका ट्रॅफिक सिग्नलसाठी सुधारीत लँप हेड बसविणे. | |
| | | ६१) वॉर्ड क्र. १० मातंग वस्ती लगत गटर व पाईप लाईन करणे. | |
| | | ६२) वॉर्ड क्र. ८ सदरबझार म्हाडा कॉलनी ते डीएसपी बंगला डांबरीकरण करणे. | |
| | | ६३) आयएसएसडीपी साठी सर्व्हेक्षण प्रकल्पासाठी सल्लागार नेमणे. | |
| | | ६४) शाहू स्टेडियम जुना आरटीओ फुटपाथ बांधणे. | |
| | | ६५) करंजे पार ते सतीआई मंदिर रस्ता डांबरीकरण. | |
| | | ६६) वॉर्ड क्र. ८ सिम्बॉयसिस हॉस्पीटल जवळीत रस्ता डांबरीकरण. | |
| | | ६७) वॉर्ड क्र. ९ कामाठी पुरा सरकारी नळ रस्ता डांबरीकरण करणे. | |
| | | ६८) वॉर्ड क्र. २२ स. नं. नरगुंदे घर स. न. २१६ साईड पट्टी कॉंक्रीट करणे. | |
| | | ६९) बांधकामाच्या कागदपत्राबाबत. | |
| | | ७०) जावक बारनिशीबाबत. | |
| | | ७१) ग्रंथालय वाचनालय विभागाबाबत. | |
| | | ७२) वृत्तपत्र बिलाबाबत | |

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | परिच्छेद क्रमांक व तपशिल | एकूण |
|---|---|---|---|
| | | ७३) इतर इमारती भाडे निश्चिती व शिक्षण मंडळातील थकबाकी. | |
| | | ७४) न. पा. मालकीच्या रिकाम्या गाळ्याबाबत. | |
| | | ७५) वृक्ष संरक्षण, संवर्धन प्राधिकरण निधी गणना न केलेबाबत. | |
| | | ७६) दूरध्वनी नोंदवह्याबाबत. | |
| | | ७७) वृक्ष विभागा झाडे विक्री नोंदवही सादर न केलेबाबत. | |
| | | ७८) बांधकामाच्या पुस्तकाबाबत. | |
| | | ७९) नळ कनेक्शन अनामत नोंदवहीबाबत. | |
| | | एकूण | ७९ |
| | | एकूण एकंदर | ४६३ |

उपरोक्त परिच्छेदांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायामध्ये नमूद परिच्छेद क्रमांकच अंतिम समजण्यात यावेत.

# भाग – दुसरा – चालु लेखा परीक्षण

## मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० चे

## कलम ९(अ) खालील आक्षेप

**परिच्छेद क्र. १ :- अंदाजपत्रकाबाबत.**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम २८ तसेच महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१(४) अन्वये मा. जिल्हाधिकारी, सातारा यांनी त्यांचे आदेश क्र. साशा/न.पा./कावि-६८५ दिनांक ५/५/२०११ अन्वये मान्यता दिलेली आहे.

कोणत्याही अर्थसंकल्पीय शिर्षकाखाली तरतूद केल्याशिवाय अथवा तरतूद केलेल्या रक्कमेपेक्षा जादा खर्च, बचतीमधून स्थानांतरण, अतिरिक्त अनुदान वाटप व अर्थसंकल्पात सुधारणा करणे यापैकी कोणत्याही एका मार्गाने जादा खर्चासाठी तरतूद केल्याशिवाय खर्च करता येणार नाही. तथापि काही बाबींवर तरतुदीपेक्षा जादा खर्च केलेला आहे. सदर बाब नियमबाह्य असल्याने सक्षम प्राधिकाऱ्याचे क्षमापन घेऊन दाखवावे.

तसेच काही बाबींवर तरतूद करूनही कमी प्रमाणात खर्च करणेत आलेला आहे. त्यामुळे संबंधित घटक या लाभापासून वंचित राहिले आहेत, खुलासा करावा.

संकलीत कर, पाणीपट्टी, इमारत भाडे कर इ. बाबींमध्ये तरतुदीपेक्षा कमी रक्कम जमा झालेली आहे. कमी वसुलीबाबतची कारणे शोधून वसुलीबाबत उपाययोजना करण्यात याव्यात.

न्यायालयीन प्रकरणांमुळे थकीत राहिलेल्या करांच्या रक्कमा वसुलीबाबत उपाययोजना करून वसुलीबाबत कार्यवाही करावी.

शहापुर पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती, तसेच शाहु कला मंदीर साफसफाई ठेका पद्धतीने करण्याऐवजी उपलब्ध कर्मचाऱ्यांमार्फत नियोजन करून शासनाचे काटकसरीचे धोरणांची अंमलबजावणी करण्यात यावी.

**परिच्छेद क्र. २ :- आर्थिक स्थितीवरील अभिप्राय.**

नगरपालिका साताराकडील सन २०११-१२ करीता दिनांक ३१/३/२०१२ अखेर मत्ता व दायित्व विवरणपत्राचे अवलोकन केले असता आर्थिक स्थितीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१. प्रथमदर्शनी दायित्वापेक्षा मत्ता रुपये २३,२४,००,१६३/- ने अधिक आहे. तथापि एकत्रित कर, विशेष शिक्षण कर, पाणी कर, शिक्षण व रोजगार हमी कर इ. करांची थकबाकी रु.१०,८२,५०,०५६/- येणे असून ती वसूल झाल्याशिवाय मत्ता म्हणून गणता येणार नाही. तसेच कोर्ट केसेसमुळे न होणारा वसूल रु.५,४०,९५,७३०/- विचारात घेतलेला नाही.

२. इमारत भाडे, जागा भाडे, थकीत घरपट्टीवरील व्याज, नोटीस फी इ. पोटी रु.२,२७,६७,२९७/- येणे असून त्याची थकबाकी वसूल झालेशिवाय त्याची गणना मत्तेमध्ये करता येणार नाही.

३. अग्रीम (तसलमात) रु.१८,५३,४९१/- वसूल होईपर्यंत मत्तेमध्ये समाविष्ट करता येणार नाही.

४. शासनाकडून येणे अनुदानाबाबतचा तपशील मत्तेमध्ये समाविष्ट करणेत आलेला नाही. तसेच कर्मचारी वेतन फरक, निवृत्ती वेतनधारकांचे उपदान व अंशराशीकरण इ. तपशील दायित्व सदरी नोंदलेला नाही.

तरी उपरोक्त येणे रक्कमा मत्तेमधून वगळल्यास मत्ता रु.९,९५,२९,३१९/- एवढी येते. म्हणजेच न. प. ची आर्थिक स्थिती समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही.

नगरपरिषदेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्याचे दृष्टीने खालील उपाययोजना सुचविणेत येत आहेत -

१. न. प. कडील करांची थकबाकी, जागा व इमारत भाडे, थकीत घरपट्टी वरील व्याज व नोटीस फी इ. ची थकबाकी रु.१३,१०,१७,३५३/- असून ती १००% वसूल करण्याबाबत अधिनियमातील तरतुदींचा व स्थायी निर्देशाचा वापर करून ठोस कार्यक्रम राबवून १००% वसुली कशी करता येईल याकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

२. न. पा. कडील वसुलीचे प्रमाण कमी असून कोर्ट स्थगितीमुळे व शासकीय येणे रक्कमा वसुलीबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी.

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सातारा यांना द्यावयाच्या पाणी बिलापोटीची थकबाकीबाबत नोंदवही ठेवून तपशील अद्ययावत ठेवावा.

४. न. पा. ने निरनिराळ्या योजनांसाठी घेतलेल्या कर्जापैकी रु.१,८६,३८,१३८/- ची परतफेड व कर्जाच्या व्याजापोटी द्यावी लागणारी रक्कम याचे दायित्व कमी करण्याची आवश्यकता आहे.

५. मक्तेदार व ठेकेदार यांना बिलापोटी देणे रक्कम रु.५४,३२,८०४/- दर्शविण्यात आलेली आहे. याबाबत नोंदवही व सविस्तर तपशीलाच्या आधारे थकीत बिलांचे रक्कम निश्चित केल्याचे दाखवावे.

६. कर्मचाऱ्यांच्या काही पदांना दिलेली वैयक्तिक वेतनश्रेणी रद्द झाल्याने जादा आदाईची रक्कम वसूल करणे आवश्यक असून त्यावरील महागाई भत्ता रक्कम शासनास भरणे आवश्यक आहे. सबब महागाई भत्त्याची रक्कम दायित्व सदरी दाखवून जादा आदा रक्कम मत्ता सदरी नमूद करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

**परिच्छेद क्र. ३ :- नगरपरिषदांनी निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्च मर्यादेबाबत**.

महाराष्ट्र नगरपालिका निवडणुक नियम १९६६ मधील नियम ६४ अन्वये घ्यावयाच्या कोणत्याही निवडणुकीच्या संबंधातील खर्च नगरपालिका निधीतून नगरपालिकेमार्फत देय असेल. याबाबत पुढील अभिप्रायांची पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

१. राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र यांचे आदेश क्र. रानिआ/मनपा.२००९/प्र.क्र.४(१) का-५ दि. ३० जुलै २०११ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांनी सार्वत्रिक निवडणुकांमध्ये सर्व बाबींवर सरसकट खर्च करावयाची मर्यादा प्रति मतदार रु.३५/- एवढी निश्चित केलेली आहे. सदर खर्चासाठी १ ते १४ बाबी राज्य निवडणूक आयोगाकडे द्यावयाच्या अंशदानासह निश्चित केलेल्या आहेत. सातारा नगरपरिषदे कडील एकूण मतदार संख्या ९३३९४ एवढी असून प्रति मतदार रु.३५/- प्रमाणे रुपये ३२,६८,७९०/- एवढी मर्यादा होती. सदर मर्यादेचे नगरपालिकेने उल्लंघन केलेले आहे.

२. वर्गीकरण नोंदवहीनुसार सन २०११-१२ अखेर खर्च रु.३२,३५,७२८/- आहे व जिल्हा क्रीडा संकुल भाडेबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी सातारा यांनी दि.३१/३/२०१२ अन्वये मागणी केलेली आहे. सदर मागणी रु.५४,०००/- देय आहे. तसेच अल्फाबेटीकल मतदार यादी तयार करणे कामाचे बिल प्रलंबित आहे. सबब (३२,३५,७२८ + ५४,०००) निवडणुकीवर एकूण खर्च रु.३२,८९,७२८/- अल्फाबेटीकल मतदार याद्या खर्च वगळून झालेला आहे. म्हणजेच रुपये २०,९३८/- एवढा जादा खर्च झालेला आहे. सदर जादा खर्चास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता / क्षमापन घ्यावे.

३. सातारा नगरपरिषदेने मा. जिल्हाधिकारी, सातारा यांना पत्र जा.क्र./सानप/निवडणूक/२८३ दिनांक २७/८/२०१२ अन्वये नगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीचा खर्च सन २०११ साली रुपये ३१,४३,००५/- कळविलेला आहे. चुकीची माहिती व खर्चाचा तपशील मा. जिल्हाधिकारी यांना सादर करून शासनाची दिशाभूल केलेची ले. प. ची धारणा आहे. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे क्षमापन घेणेत यावे व शासनाची दिशाभूल करणेचा हेतू स्पष्ट करावा.

४. अल्फाबेटीकल मतदार यादी तयार करणे कामाचे बिल किती आहे ? तसेच सदरची प्रलंबित रक्कम केव्हा आदा करणेत येणार आहे याबाबत नस्तीमध्ये तपशील नमूद नाही. सदरची रक्कम विचारात घेतलेस मर्यादेपेक्षा खर्चात वाढ होणार आहे. सदर वाढीसह जादा खर्चाची रक्कम वसूलात आणावी.

वसूलपात्र रक्कम रु.२०,९३८/-

**परिच्छेद क्र. ४ :- दुहेरी नोंद लेखापद्धतीची अंमलबजावणी करणेबाबत**.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विद्यमान आर्थिक व्यवस्थापन पद्धतीमध्ये सुधारणा करणे क्रमप्राप्त असल्याची बाब विचारात घेऊन दुहेरी नोंद लेखा पद्धती नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक व्यवहारात अचूकता व पारदर्शकता आणण्याची निकड व वस्तुस्थिती विचारात घेता सदर पद्धतीने लेखे ठेवणे अनिवार्य आहे.

शासन निर्णय क्र. लेखास-१०२००४/७१ प्र. क्र. ५/नवि-३१ दिनांक ६ जुलै २००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुहेरी नोंद लेखापद्धतीची अंमलबजावणी राज्यातील सर्व ‘अ’ वर्ग नगरपरिषदांनी दिनांक १ एप्रिल २००५ पासून सुरू करावी. तसेच सर्व नगरपरिषदांनी सन २००५-०६ च्या लेख्यांपासून

उपरोक्त शासन निर्णयानुसार कोडींग पद्धतीचा वापर करणे अनिवार्य राहील. दुहेरी नोंद लेखा पद्धतीची अंमलबजावणी करताना सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी पूर्वीची रोख तत्वावर लेखा ठेवण्याची पद्धती व दुहेरी नोंद लेखा पद्धती या दोन्ही पद्धतीने लेखे ठेवावयाचे आहेत. असे असताना देखील सातारा नगरपरिषदेने दुहेरी नोंद लेखा पद्धतीची कसल्याही प्रकारची अंमलबजावणी केली नसल्याचे दिसून आले आहे. याबाबत कार्यवाही का करण्यात आली नाही याचा खुलासा करून उक्त पद्धतीने दुहेरी नोंद लेखा पद्धती सुरू करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

लेखा विभाग, नगरपरिषद सातारा २०११-१२

**परिच्छेद क्र. ५ :- वॉर्ड क्र. २८ पेठ केसरकर शाहू चौक नक्षत्र अपार्टमेंट ते बंबाडे हॉस्पीटल अखेर फूटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविणे व पेठ केसरकर सि.स.नं. १५३ ते १५७ अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे.**

| | | |
|---|---|---|
| मूळ अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु.३,०९,२७७/- |
| सुधारीत अंदाजपत्रक | : | रु.४,६९,७५३/- |
| मूळ प्रशासकीय मंजूरी | : | स्थायी समिती ठराव क्र. १३८३ दि. ११/९/२०१०<br>सुधारीत स्था. स. ठ. क्र. २०२८ दि. २१/७/२०११ |
| तांत्रिक मंजूरी | : | मा. कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेश जा.क्र./चिशा/ता.मां./४६/२ दि. ३/१२/२०१०. |
| ठेकेदाराचे नाव | : | श्री. सागर रामदास खताळ |
| कामाचे आदेश | : | मुख्याधिकारी यांचे पत्र क्र. सानप/साबां/१११२ दि.४/३/११ |

| प्रमाणक क्र. व दिनांक | रक्कम रुपये | धावते/अंतिम देयक |
|---|---|---|
| ९११ / २३/९/११ | २,०९,२०८ | प्रथम धावते देयक |
| ७२९ / २५/८/११ | १,३०,८६७ | द्वितीय धावते देयक |
| १३१९ / १८/११/११ | १,७०,१४० | तृतीय व अंतिम देयक |
| एकूण ५,१०,२१५ | | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. सदर कामाचे अंदाजपत्रक सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार तयार केले आहे. तांत्रिक मान्यतेसाठी मुख्याधिकारी यांनी दि.१४/१०/२०१० रोजी कार्यकारी अभियंता म. जी. प्रा. बांध. विभाग सातारा यांचेकडे अंदाजपत्रक सादर केले व उपरोक्त प्रमाणे दि. ३/१२/१० रोजी तांत्रिक मान्यता प्राप्त झाली आहे. दै. ऐक्य ह्या वृत्तपत्रात दि. १४/१२/१० रोजी निविदा प्रसिद्ध केली आहे व उपरोक्त प्रमाणे ठेकेदारास अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ४.९०% जादा दराने मंजूर निविदेनुसार कार्यादेश दि. ४/३/११ रोजी दिला आहे. अंदाजपत्रक १०/११ च्या दरसूचीनुसार तयार करून त्यास तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक होते. अन्यथा निविदा प्राप्त झालेवर सन १०/११ च्या दरसूचीशी तुलना करणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. सन १०/११ च्या दरसूचीनुसार पेव्हींग ब्लॉक बसविणेचे दर र. रु. ५९४.४० प्रति स्के. मी. (५२९ ह्र १०% डोंगराळ भाग + मेटल लिड + ०.७५% व्हॅट + १% लेबर वेलफेअर) होत आहे व सन ०८-०९ च्या दरसुचीनुसार दर ६५१.४० प्रति स्क्वे. मी. आहे. उपरोक्त प्रमाणे ४.९९% जादा दराची निविदा जर सन १०-११ च्या दरसूचीशी तुलना केलेस १७.१४% जादा दराची निविदा मंजूर केली आहे. सदर बाब नियमबाह्य होत आहे. त्यामुळे फेरनिविदा मागविणे आवश्यक होते. अशी कार्यवाही न केलेने मक्तेदारास ६९७.७७ स्क्वे. मी. करीता ३९७७३ (६५१.४० - ५९४.४० च्या ४.९९ जादा दर) ची जादा आदाई झाली आहे. त्याची जबाबदारी निश्चित होऊन वसुली होणे आवश्यक आहे.

२ सदर कामास उपरोक्त प्रमाणे सुधारीत प्रशासकीय मान्यता/स्थायी समितीची र.रु.५,००,००० स घेतलेली आहे. परंतु खर्च र. रु. ५,१०,२१५ झालेले महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियम १९६५ चे

कलम ७२ नुसार नगरपालिका सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. कार्योत्तर मान्यता घेऊन पुर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. ६ :- सातारा शहरातील पिण्याच्या पाण्याची १/२ इंच ते १२ इंच व्यासाची पाईप लाईन्सची लिकेज काढणे.**

नगरपालिका साताराने शहरातील नळ पाणी पुरवठा योजनेवर १/२ इंच ते १२ इंच व्यासाची पाईप लाईन्सची लिकेज काढणेबाबत ठेका पद्धत अवलंबली आहे. दैनिक ग्रामोद्धार मध्ये दि.१०/१२/१० रोजी निविदा प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार चार निविदा प्राप्त होऊन त्यांचे दर मंजूर करून त्यांना दि. ७/१०/११ रोजी कामाचे आदेश दिले आहेत. सन २०११/१२ ह्या वित्तीय वर्षामध्ये वितरण नलिका देखभाल दुरुस्तीवर र. रु. १४,३३,३३३/- केला आहे. त्यापैकी पूर्वीच्या निविदा प्रक्रियेनुसार र.रु.८,५२,४७२/- व सदरच्या दि. ७/१०/११ नंतर निविदा प्रक्रियेनुसासर ५,८०,८६१/- इतका खर्च केला आहे. ह्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१. उपरोक्त प्रमाणे १/४/११ ते ६/१०/११ ह्या कालावधीत र. रु. ८,५२,४७२- रक्कमेची लिकेजेस काढण्याची कामे ही संबंधीत मक्तेदारांना दि. २८/२/२००९ रोजी १२ महिने मुदतीकरीता दिलेल्या वर्क ऑर्डर प्रमाणे केली आहेत. मुदत पूर्ण झालेवर त्वरीत नव्याने निविदा प्रक्रिया केलेली नाही व जुन्या निविदा प्रक्रियेला मुदत वाढ दिलेली नाही. त्यामुळे मुदतीनंतर ठेका चालू ठेवलेने नियमबाह्यता झाली आहे. सदर नियमबाह्यतेस क्षमापन घेऊन दाखवावे.

२. खर्च र. रु. ८,५२,४७२/- ला नगरपालिका सर्वसाधारण सभेची प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही. त्याबाबत खुलासा करून कार्योत्तर प्रशासकीय मान्यता घेऊन पुर्तता दाखवावी.

३. सदरच्या ठेकेदाराने निविदा अंदाजपत्रकापेक्षा ४.९९% जादा दराने भरलेली आहे. नगरपालिका प्रशासन संचालनालय चे स्थायी आदेश क्र. ३६ दि. २९/१२/२००५ मधील बाब क्र. ४६ नुसार वार्षिक दर करार करण्याकरीता अंदाजपत्रकीय रक्कमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजूरी देऊ नये. तथापि अत्यावश्यक कामाकरीता वार्षिक करार न करता केवळ तीन महिन्याकरीता देण्यात यावे व उर्वरित कालावधीकरीता फेर निविदा मागविण्यात याव्यात. असे आदेश असतानाही

सदरचे आदेशाचा अवलंब केला नाही. ४.९९% जादा दरामुळे सन २०१०/१२ मध्ये उपरोक्त केलेल्या खर्चामध्ये र. रु. ६८,१२४/- ची अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा अदाई झाली आहे. सदरची रक्कम वसुल करून पूर्तता दाखवावी अन्यथा नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे क्षमापन घेऊन दाखवावे.

**परिच्छेद क्र. ७ :- शहरातील प्रभाग १ ते ३९ मध्ये निर्माण होणारा कचरा घरोघरी जाऊन घंटागाडी द्वारे गोळा करणेबाबत.**

अ) प्रकल्प खर्च रु.५२,३०,७२१/-

ब) दै. ऐक्य दि. ११/२/१० निविदा जाहिरात.

शहरातील प्रभाग १ ते ३९ मध्ये निर्माण होणारा कचरा घरोघरी जाऊन घंटागाडीद्वारे गोळा करणेबाबत निविदा प्रक्रिया राबविताना तसेच सदर कामासाठी पुढील अभिप्रायस नोंदणेत येत आहेत.

१. सोनगाव कचरा डेपो ते प्रभाग अंतर तसेच प्रभागातील फिरतीचे अंतर याबाबत आढावा घेऊन प्राथमिक अंदाज घेण्यात आलेला नाही.

२. वाहन मालकाचे संमतीपत्र साध्या कागदावर घेतलेले असून ते विहीत नमुन्यात स्टॅम्प पेपरवर घेण्यात आलेले नाही.

३. सर्व प्रभागासाठी निविदा मागविताना त्याच त्याच निविदा कमी/जादा दराने मंजूर केल्याचे आढळून आले.

४. प्रभाग १५, २३, २६, ४, ५, ८ व १० च्या कचरा वाहतूक ठेक्याबाबत नगरसेवक यांनी शिफारस केल्याने ठेका देण्यात आल्याचे नस्तीवरून दिसून येते. त्यामुळे केवळ कागदोपत्री निविदा प्रक्रिया करून संबंधितांना ठेका देण्यात आलेला आहे. सदर अनियमिततेबाबत खुलासा करावा.

५. प्रभाग २ साठी निविदा प्राप्त २२/२/१० रोजी असून निविदेतील दराची माहिती मक्तेदाराने २३/२/१० रोजी भरलेली आहे. निविदा प्राप्त झालेनंतर दराचा तपशील नमूद करण्याचा हेतू स्पष्ट करावा. दराचा तपशील नमूद नसलेने निविदा नामंजूर करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

६. प्रभाग २४ व ३६ साठी वाहनमालकाची संमती घेण्यात आलेली नाही. पुर्तता दाखवावी.

७. प्रभाग १५ व १७ निविदा फॉर्मवर खाडाखोड व व्हाईटनरचा वापर असून सदरच्या निविदामंजूर करताना याबाबी दुर्लक्षित करणेबाबत खुलासा करावा.

८. प्रभाग ३१, ३२, ३३ च्या निविदेसोबत वाहनाचा तपशील, तसेच वाहनांची कागदपत्रे जोडलेली नाहीत.

९. प्रभाग २१ व ३३ साठी कचरा वहातुकीचा ठेका अस्लम अब्दुल इनामदार यांना देण्यात आलेला आहे. दोन्ही प्रभागातील ठेका मंजुर करताना त्यांचेकडील उपलब्ध वाहने, वाहनचालक, वाहनांच्या मालकीबाबतची कागदपत्रे इ. बाबी तपासल्या नाहीत. त्यामुळे दोन्ही प्रभागातील कामासाठी सदर मक्तेदार सक्षम असलेबाबत खात्री केलेची पुर्तता दाखवावी.

वरील पुर्ततेच्या अधिन राहून सदर कामसाठी झालेल्या एकूण खर्च रुपये ५२,३०,७२१/- तात्पुरता अमान्य करणेत येत आहे.

ता. अमान्य रुपये ५२,३०,७२१/-

आरोग्य विभाग, न. प. सातारा सन २०११/१२

**परिच्छेद क्र. ८ :- सातारा वाढीव पाणी पुरवठा योजना (उरमोडी पाणी उद्‌भव) कुशल, अकुशल व तांत्रिक कर्मचारी नेमून चालविणे.**

नगरपालिका साताराने वाढीव पाणी पुरवठा योजना (उरमोडी नदी उद्‌भव) चालविणे साठी ठेका पद्धतीने दिला आहे. त्यावर सन २०११/१२ ह्या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | रक्कम रुपये | तपशील |
|---|---|---|---|
| १ | १०६ २१/५/११ | ७३,२३१ | २८/१/११ ते २७/३/११ |
| २ | २७२ १७/६/११ | १,४६,४६१ | २८/२/११ ते २७/४/११ |
| ३ | | १,४६,४६१ | २८/४/११ ते २७/६/११ |
| ४ | ७१३ २५/८/११ | ७३,२३१ | २८/६/११ ते २७/८/११ |

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | रक्कम रुपये | तपशील |
|---|---|---|---|
| ५ | ९२१ २३/९/११ | ७३,२३१ | २८/८/११ ते २७/८/११ |
| ६ | | ७३,२३१ | २८/८/११ ते २७/९/११ |
| ७ | १३८१ २५/११/११ | ७३,२३१ | २८/९/११ ते २७/१०/११ |
| ८ | १८६१ १०/१/१२ | ७३,२३१ | २८/१०/११ ते २७/११/११ |
| ९ | १६६० ४/१/१२ | ७३,२३१ | २८/११/११ ते २७/१२/११ |
| १० | २१३४ १०/२/१२ | ७३,२३१ | २८/१२/११ ते २७/१/१२ |
| ११ | २४३४ १६/३/१२ | ७३,२३१ | २८/१/१२ ते २७/२/१२ |
| एकूण ९,५२,००१ | | | |

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१. सदर कामाचा ठेका श्री. राजू बबन पाटील ह्यांना सन २००९-१० मध्ये दिला आहे. मुख्याधिकारी न. पा. सातारा यांचे कामाचे आदेश क्र. सानप/पापु/१३३ दि. २८/८/०९ रोजी दिले आहे. त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे एक वर्षाकरीता आदेश दिला आहे. मुदत पूर्ण झालेवर नव्याने निविदा प्रक्रिया केलेली नाही. तसेच जुन्या निविदा प्रक्रियेला मुदतवाढ दिलेली नाही. त्यामुळे मुदतीनंतर ठेका चालू ठेवल्यामुळे नियमबाह्यता झाली आहे. सदर नियमबाह्यतेस क्षमापन घेऊन दाखवावे.

२. सदर सन ११/१२ च्या खर्चास नगरपालिका सर्वसाधारण सभेची प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही. ह्याबाबत खुलासा करावा. कार्योत्तर प्रशासकिय मान्यता घेऊन पुर्तता दाखवावी.

३. सन ११/१२ ह्या वित्तीय वर्षाकरीता संबंधीत ठेकेदाराबरोबर करारनामा केलेले नाही. त्यामुळे ठेकेदारावर जबाबदारी निश्चित करणे शक्य होत नाही. मुख्याधिकारी न. पा. सातारा ह्यांनी मक्तेदारास दिलेल्या नोटीस क्र. सानप/पापु/२५३ दि. १०/१/२०१२ नुसार ‘‘मा. सभापती पा. पु. समिती आणि अभियंता समवेत गेले असता पहाटे ३.३० ते ४.३० ह्या कालावधीत टाक्यातून पाणी वाहून गेलेले र.रु.३,३६०/- चे नुकसान झाले आहे. योजनेचा परिसर अस्वच्छ आहे. तसेच अनोळखी इसमांचा वावर आढळून आला आहे.’’ असे नमूद केले आहे. करारनामा केल्यास अनियमिततेची जबाबदारी

कायदेशीर निश्चित करणे शक्य होते. करारनामा न करणेबाबत खुलासा करावा. तसेच उपरोक्त नोटीसमध्ये नमूद केलेप्रमाणे हलगर्जीपणा झाला असतानाही सदर ठेकेदारास त्या दिवसाची संपूर्ण अदाई केलेली आहे. ह्याबाबत खुलासा करावा. तसेच र.रु. ३,३६०/- वसूल करून पूर्तता दाखवावी.

४. सदरच्या ठेकेदाराने निविदा अंदाजपत्रकापेक्षा ४.९९% जादा दराने भरलेली आहे. नगरपालिका प्रशासन संचालनालयाचे स्थायी आदेश क्र. ३६ दि. २९/१२/२००५ मधील बाब क्र. ४६ नुसार वार्षिक दर करार करण्याकरीता अंदाजपत्रकीय रक्कमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजूरी देऊ नये. तथापि अत्यावश्यक कामाकरीता वार्षिक करार न करता केवळ तीन महिन्याकरीता देण्यात यावे व उर्वरित कालावधीकरीता फेर निविदा मागविण्यात याव्यात असे आदेश असतानाही सदरचे आदेशाचा अवलंब केला नाही. ४.९९% जादा दरामुळे सन २०१०-१२ मध्ये उपरोक्त केलेल्या खर्चामध्ये र. रु. ४५,२५१/- ची अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा अदाई झाली आहे. सदरची रक्कम वसूल करून पुर्तता दाखवावी. अन्यथा नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे क्षमापन घेऊन दाखवावे.

**परिच्छेद क्र. ९ :- बयाणा रक्कम जप्त करणेबाबत.**

बांधकाम विभाग न. पा. साताराकडील सन २०११-१२ च्या लेखापरीक्षणाच्या वेळेस खालील प्रमाणे मक्तेदारांनी निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेतल्यानंतर काम करणेस असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे संबंधीत मक्तेदारांनी खालील प्रमाणे भरलेली बयाण र. रु. २९,६१०/- जप्त करणे आवश्यक होते. ठेकेदारास बयाणा रक्कम परत केलेस निविदा प्रक्रियेत घेतलेल्या बयाणा रक्कमेचा उद्देश सफल होत नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | मक्तेदाराचे नाव | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सातारा शहरातील पिण्याच्या पाण्याची १/२ इंची ते १२ इंची व्यासाची पाईप लाईन्सची लिकेज काढणे. | श्री. सचिन अ. सारस | १२,८७० |
| २. | सातारा वाढीव पाणीपुरवठा योजना कर्मचारी नेमून ठेका पद्धतीने चालविणे. | श्री. राज वि. दिक्षीत | ८,३७० |
| ३. | सातारा वाढीव पाणीपुरवठा योजना कर्मचारी नेमून ठेका पद्धतीने चालविणे. | सातारा इले. वर्क्स | ८,३७० |
| | | एकूण | २९,६१० |

सदरची बयाणा रक्कम ठेकेदारास अदा केली असलेस वसूल करावी अन्यथा सदरची रक्कम जप्त करणेत यावी.

**परिच्छेद क्र. १० :- वाहन वापरावरील जादा झालेल्या खर्चाबाबत.**

नगरपरिषद साताराकडील सन २०११/२०१२ या कालावधीत वाहन विभागाकडील लॉगबुक व हीस्ट्रीशीट नोंदवह्यांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहेत.

१. नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निदेश क्र. ३२ मधील अ. क्र. १६ नुसार अध्यक्ष व मुख्याधिकारी यांना नगरपालिकेने उपलब्ध करून दिलेल्या वाहनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी व वाहने सुस्थितीत ठेवण्यासाठी प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी र. रु. २५,०००/- पर्यंत खर्च करण्याची मर्यादा घालून दिलेली असताना नगरपालिकेने वाहन देखभाल दुरुस्तीकरीता खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | सन २०११/२०१२ देखभाल दुरुस्तीचा खर्च | खर्चाची वार्षिक मर्यादा | जादा खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | एम एच ११ अे बी १००० | ३९,२६६ | २५,००० | १४,२२६ |
| २ | एम एच ११ अे बी १००१ | २६,८११ | २५,००० | १,८११ |
| | एकूण | ६६,०७७ | ५०,००० | १६,०७७ |

तरी मर्यादेपेक्षा जादा झालेल्या खर्चाची र. रु. १६,०७७/- बाबत योग्य तो खुलासा करण्यात यावा.

२. स्थायी निदेश क्र. ३२ मधील अ. क्र. ७(२) नुसार आस्थापना खर्च ४०% पेक्षा कमी असणाऱ्या ‘अ’ वर्ग नगरपालिकेच्या अध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या अखत्यारीतील प्रत्येक वाहनासाठी इंधनाची (पेट्रोल) खर्चाची मर्यादा प्रती माह १०० लिटर इतकी ठरवून दिलेली असताना नगरपालिकेने सन २०११/२०१२ मध्ये खालील प्रमाणे इंधन वापरले आहे.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | सन २०११-१२ मध्ये खरेदी इंधन (लिटर) | इंधन वापराची वार्षिक मर्यादा | जादा वापरलेले इंधन (लिटर्स) |
|---|---|---|---|---|
| १ | एम एच ११ अे बी १००१ | ३४०४ लिटर्स | १२०० लिटर्स | २२०४ लिटर्स |
| २ | एम एच ११ अे बी १००० | २२७५ लिटर्स | १२०० लिटर्स | १०७५ लिटर्स |
| | एकूण | ५६७९ लिटर्स | २४०० लिटर्स | ३२७९ लिटर्स |

तरी उपरोक्त प्रमाणे सन २०११-१२ मध्ये विहीत मर्यादेपेक्षा एकूण ३२७९ लिटर्स जादा पेट्रोल वापरले असल्याचे दिसून येते. सबब स्थायी निर्देश क्र. ३२ अ. क्र. ७ (अ) नुसार विहीत मर्यादेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास म्हणजेच ३२७९ लिटर्स ह्व ६९.१० (दर) = २,२६,५७९/- ला मा.विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांची मान्यता घेणे आवश्यक असताना तशी मान्यता घेण्यात आलेली नाही. त्यामुळे इंधनावर जादा झालेला खर्च र. रु. २,२६,५७९/- वसुलात आणून पुर्तता दाखवावी.

३. स्थायी निदेश क्र. ३२ अ. क्र. १८ नुसार जिल्ह्याबाहेरील दौऱ्यासाठी वाहन वापरण्यात येऊ नये असे स्पष्ट नमूद केलेले असताना प्रत्यक्षात सदरचे वाहनांचा जिल्ह्याबाहेर वापर करण्यात आलेला आहे. याबाबत खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा.

४. स्थायी निदेश क्र. ३२ अ. क्र. १७ नुसार खर्च मर्यादेपेक्षा जादा होणारा खर्च वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याने स्वत: सोसावा असे नमूद असल्याने देखभाल व दुरुस्तीवरील जादा खर्च रु.१६,०७७/- व इंधनावरील जादा खर्च र. रु. २,२६,५७९/- असा एकूण र. रु. २,४२,६५६/- संबंधितांकडून वसूलात आणून पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. ११ :- करांची मागणी नोंदवही तसेच करांची पावतीपुस्तके हे अभिलेख न ठेवलेबाबत.**

न. पा. साताराचे सन २०११-२०१२ च्या लेखापरीक्षणात नगरपालिका लेखासंहिता १९७१ चे नियम ७६ प्रमाणे नमुना क्रमांक ४७ मध्ये कर मागणीपुस्तक (मागणी नोंदवही) ठेवणे आवश्यक आहे. तसेच न. पा. लेखासंहिता १९७१ चे नियम ७८ प्रमाणे नमुना क्र. ४९ मध्ये पावतीपुस्तक ठेवून पुस्तकातून दुहेरी कार्बन कागद घालून प्रतिलिपी पावती योग्य स्वाक्षरी व दिनांकासह संबंधितास दिली

पाहिजे. व नमुना ५० मध्ये संकलन पुस्तक ठेवून प्रत्येक जमा पावतीवरील तपशिल नोंदविला पाहिजे. तथापी न. पा. सातारा यांनी सन २०११/१२ मध्ये वसूली विभागाकडील काही वॉर्डाचे अभिलेखे व नोंदवह्यांचे संगणकीकरण केले असून संगणकाच्या आज्ञावलीचा वापर करून खातेदारांना कराच्या पावत्या देणे, तसेच मासिक एकूण वसुल रक्कमांचा गोषवारा तसेच वार्षिक जमा रक्कमा या प्रकारचे अहवाल संगणक आज्ञावलीच्या सहाय्याने तयार केलेले आहेत. सदर अहवाल लेखापरीक्षणाचे वेळी तपासले असता त्यात बऱ्याच प्रमाणात चुका होत असल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे नगरपालिकेच्या सर्व वॉर्डांचे संगणकीकरण एकाचवेळी होणे अपेक्षीत असताना सन २०११/१२ मध्ये सदरबझार वॉर्डाचे करांचे नोंदवह्या व अभिलेखांचे संगणकीकरण केलेले नाही. तसेच संगणक आज्ञावलीचा वापर प्रथम प्रायोगिक तत्वावर करून त्याचा वापर करून येणारे अहवाल योग्य असलेबाबत तसेच न. पा. लेखासंहिता १९७१ चे नियमाप्रमाणे कर विभागाकडील सर्व नोंदवह्याच्या सर्व नोंदी संगणक आज्ञावलीवर योग्य प्रकारे होत असलेबाबत खात्री करून त्यानंतरच संगणकीकरण करणे आवश्यक होते. तसेच संगणकीकरण करत असताना सन २०११/१२ च्या कर विभागाकडील सर्व नोंदवह्या तसेच पावतीपुस्तके ही हस्तलिखित स्वरुपात ठेवण्यात येणे आवश्यक होते. तथापी हस्तलिखित नोंदवह्या न ठेवल्यामुळे लेखापरीक्षणाचे वेळी नमुना क्र. ४९ मधील सन २०११/१२ ची पावतीपुस्तके, नमुना क्र. ४७ प्रमाणे मागणी नोंदवही व नमुना क्र. ५० प्रमाणे संकलन नोंदवही व अन्य संबंधित नोंदवह्या लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. उपरोक्त नोंदवह्या उपलब्ध करणेबाबत अर्धसमास पत्र क्र. १ दि. २३/१०/२०१२, पत्र क्र. २ दि. १/११/२०१२ व पत्र क्र. ५ दि. १८/१२/२०१२ देऊनही उपरोक्त नोंदवह्या प्राप्त झालेल्या नाहीत. उपरोक्त नमूद नोंदवह्या लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेने तसेच संगणकीकृत केलेले अभिलेख योग्य असलेबाबत खात्री करता न आल्याने नगरपालिकेच्या करांची सन २०११/१२ मधील मागणी तसेच २०११/१२ मध्ये केलेली करांची वसूली तसेच सन २०११/१२ मध्ये असलेली करांची थकबाकी योग्य असलेबाबत खात्री करता आली नाही. तसेच त्यामुळे मागणी-वसूली-थकबाकी यामध्ये चुका असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी हस्तलिखित स्वरुपात नोंदवह्या न ठेवणेबाबतचा खुलासा सादर करून नोंदवह्या ठेवून अद्ययावत नोंदी घेऊन पुर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र.१२ :- वॉर्ड क्र. २० पेठ रामाचा गोट डॉ. तांबे ते नागाचा पार अखेर रस्ता डांबरीकरण करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु.४,६८,०६०/- |
| प्रशासकीय मंजूरी | : | स्थायी समिती ठ. क्र. १२२१ दि. ४/५/२०१० |
| तांत्रिक मंजूरी | : | मा. का. अ. मजीप्रा बांध. सातारा तां. म.आदेश जा.क्र. चिशा/ ता. मं. ४३२६ दि. २५/१०/१० |
| ठेकेदाराचे नांव | : | मे. रजिया कन्स्ट्रक्शन |
| कामाचे आदेश | : | मुख्याधिकारी यांचे आदेश क्र. सानप/साबां/पा.पु./आरोग्य दि. ३१/३/११ |
| काम सुरु दिनांक | : | ३१/३/११ काम पूर्ण दि. २५/१/१२ |
| सुरक्षा ठेव | : | रु. ३०,५७० आयकर रु. ६११४ |
| कार्यकंत्राट कर | : | रु.२४,४५६ रॉयल्टी रु. ६९८ |
| कामगार कल्याण निधी | : | रु.६११४ |

प्रमाणक क्र. २४३८(२) दिनांक १६/३/१२ रक्कम रु.६,१२,०९९ प्रथम व अंतिम बील न.पा.निधी याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

१. सदर कामाचे अंदाजपत्रक हे सन २००८/०९ च्या दरसुचीनुसार तयार केले आहे. निविदा २५% जादा दराने स्विकृत केली आहे. सन २०१०/११ च्या दरसुचीशी तुलना केली असता ४.४८% जादा दराची निविदा होत आहे. त्यामुळे कामाच्या खर्चाचे अंदाजपत्रक ५,००,००० पेक्षा जादा होत आहे व प्रत्यक्ष खर्चही रु.५,००,००० पेक्षा जादा झाला आहे. सदर कामास प्रशासकिय मान्यता स्थायी समितीची घेतली आहे. वास्तविक पाहाता महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ कलम ७२ नुसार 'अ' वर्ग नगरपालिकांकरीता स्थायी समितीस वित्तीय मंजूरीची मर्यादा रु.५,००,००० ची आहे. सदरच्या कामाचे अंदाजपत्रक व खर्च रु. ५,००,००० पेक्षा जास्त असतानाही स्थायी समितीची प्रशासकीय

मान्यता घेणेबाबत खुलासा करावा. नगरपालिका सर्वसाधारण सभेची कार्योत्तर प्रशासकिय मान्यता घेऊन पुर्तता दाखवावी.

२. सदर कामाची वर्क ऑर्डर पाहाता व करारनामा पाहाता कामाची मुदत ४५ दिवस आहे. कामाचे वर्क ऑर्डर दि. ३१/३/११ रोजी दिली आहे व काम पुर्णत्वाच्या दाखल्याप्रमाणे काम दि. २५/१/१२ रोजी पुर्ण झाले आहे. म्हणजेच काम ३०० दिवसांनी पुर्ण झाले आहे. कामाची मुदत संपलेनंतर कामास पुर्ण होणेस २५५ दिवसांचा विलंब झाला आहे. कामाची मुळ मुदत संपणेपूर्वी मक्तेदाराने मुदतवाढीचा अर्ज केलेला नाही. नगरपालिकेने ठेकेदारास मुदतवाढ दिलेली नाही. विलंबाबाबत दंडाची तरतुद करारनाम्यात केलेली नाही. तसेच कामाच्या आदेशात दंडाचा उल्लेख केलेला नाही. नगरपरिषद प्रशासन संचालनालय कडील स्थायी आदेश क्र. ३६ दि. २९/१२/२००५ मधील परिशिष्ट क्र. क मधील मुद्दा क्र. ९ नुसार निविदेत दंडाचा उल्लेख करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही नगरपालिकेने केलेली नाही. ह्याबाबत खुलासा करावा. काम उशीरा पूर्ण केलेले दंडात्मक कार्यवाही करून पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. १३ :- वॉर्ड क्र. २७ पेठ रविववार सर्वोदय कॉलनी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे आणि संरक्षक भिंत बांधणे**.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु.३,४९,०२६/- |
| तांत्रिक मंजूरी | : | मा. का. अ. मजीप्रा बांधकाम विभाग, सातारा यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेश जा.क्र./चिशा/ता.मां./१५७४ दि. १८/७२११ |
| ठेकेदाराचे नाव | : | श्री. अरविंद श्रीरंग चव्हाण |
| कामाचे आदेश | : | सानप/साबां/९४६ दि.१२/९/११ |
| काम सुरु दिनांक | : | १२/९/११ काम पूर्ण दिनांक: ५/१०/११ |
| मोजमाप नोंदवही क्र. | : | ५० पान क्र. १३५ - १३६ |

सुरक्षा ठेव रु.१९,३०२ आयकर रु.३६८० कार्यकंत्राट कर रु.१५,४४१

रॉयल्टी रु.६०४२ कामगार कल्याण रु.३८६०

प्रमाणक क्र. २३२६ दि. १/३/१२ र.रु.३,८६,०३० प्रथम व अंतिम बील न. पा. निधी

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. कामाचे अंदाजपत्रक पाहाता अंदाजपत्रकाचे अ) पेव्हींग ब्लॉक बसविणे, ब) संरक्षक भिंत बांधणे असे दोन भाग केले आहेत. परंतु प्रत्यक्ष कामामध्ये फक्त पेव्हींग ब्लॉकचे काम केले आहे. संरक्षक भिंतीचे काम केलेले नाही. ह्या बाबत खुलासा करावा जर संरक्षक भिंतीचे कामाची निकड नव्हती तर अंदाजपत्रकात तरतुद का केली ह्याचा खुलासा करावा.

२. अंदाजपत्रकातील अ भाग पेव्हींग ब्लॉक बसविणेकरीता र. रु. २,७०,९४१ ची तरतुद असताना पेव्हींग ब्लॉक करीता र. रु. ३,६७,८८२ चे मुल्यांकन झाले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम क्र. १६७ (२) नुसार जेव्हा मूळ अंदाजामध्ये १० टक्क्यांपेक्षा अधिक वाढ होण्याचा संभव असेल तेव्हा सुधारित अंदाज तयार करून त्यास सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही न करणेबाबत खुलासा करावा. सुधारित अंदाजपत्रक तयार करून कार्योत्तर मान्यता घेऊन पुर्तता दाखवावी.

३. अंदाजपत्रकात पेव्हींग ब्लॉक बसविलेनंतर भिंत व पेव्हींग ब्लॉकच्या मधील राहणाऱ्या मोकळ्या जागेत सिमेंट कोपिंग करणेची तरतुद आहे. त्याप्रमाणे प्रत्यक्ष काम केले आहे. परंतु अंदाजपत्रकात पेव्हींग ब्लॉक बसविण्यापूर्वी खालील पृष्ठभागावर सिमेंट कोपिंग करणेची तरतुद नाही. प्रत्यक्ष कामात ४५१.९५ स्क्वे. मी. पेव्हींग ब्लॉक बसविले आहे व २०२ स्क्वे. मी. चे पेव्हींग ब्लॉक बसविण्यापूर्वी खालील पृष्ठभागात सिमेंट कॉंक्रीट कोपिंग केले आहे. सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेतली आहे व अंदाजपत्रकामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविण्यापूर्वी सिमेंट कॉंक्रीट कोपिंग १ : २ : ४ ची तरतुद नाही म्हणजेच तांत्रिक दृष्ट्या आवश्यकता नसताना केलेल्या सिमेंट कॉंक्रीट कोपिंगचे २५.२५ घ. मी.काम केले आहे. सदर कामावर र. रु. ८८,९३६ खर्च केला आहे. सदर रक्कम वसुल करून न. पा. निधीत भरणा करणेत यावी.

४. सदर कामाचे मोजमाप पुस्तक पाहता पान क्र. १३५ वर ४५१.९५ स्क्वे. मी. पेव्हींग ब्लॉक बसविलेची मापे नोंदवली आहेत व पान क्र. १३६ वर सदर पेव्हींग ब्लॉकच्या खाली केलेले २०२ स्क्वे. मी. सिमेंट कॉंक्रीट कोपिंगची कामे कोणतेही रेकॉर्ड एंट्री नसताना नोंदवली आहेत. पेव्हींग ब्लॉक

बसविल्यावर सदरची मापे झाकली जातात. त्यामुळे एकूण ४५१.९५ स्क्वे. मी. पेव्हींग ब्लॉकच्या खालील पृष्ठभागावर २०२ स्क्वे. मी. चे सिमेंट काँक्रीटचे काम झालेची मापे काय आधारे नोंदवली, ह्याचा खुलासा करावा. नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्थायी निर्देश क्र. ३७ दि. ३ जानेवारी २००६ मधील बाब क्र. १५ नुसार नगरपरिषदांमध्ये विकास कामाची मोजमापे एकदाच व शेवटी अभियंता यांनी घेऊ नयेत कारण झाकलेल्या मापांबाबत खात्री होत नाही. स्थायी आदेशाचे पालन संबंधित अभियंता यांनी केलेले नाही.

**परिच्छेद क्र. १४ :– वॉर्ड क्र. ३९ पेठ मंगळवार सि. स. नं. ४०६ अ येथे ओढ्यालगत भिंत बांधणे.**

अंदाजपत्रकीय रक्कम : रु.४८,९८०/–

प्रशासकीय मंजूरी : बांधकाम समिती ठ. क्र. ३२५५ दि. ४/५/२०११

ठेकेदाराचे नाव : अमृत बळवंत शिंदे

कामाचे आदेश : मुख्याधिकारी न.पा.आ.क्र.सानप/साबां/११२२ दि.१७/१०/११

काम सुरु दिनांक : १७/१०/११ काम पूर्ण दिनांक १६/११/११

मोजमाप नोंदवही क्र. : ४६ पान क्र. ६५

सुरक्षा ठेव रु.२७७७ आयकर रु. ५५५ कार्यकंत्राट कर रु. २२२२

रॉयल्टी रु. १२०८ कामगार कल्याण निधी रु.५५५

प्रमाणक क्र. २४३७ दि. १६/३/१२ र. रु. ५६७५४ प्रथम व अंतिम देयक

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. सदर कामातील बाब क्र. ३ नुसार एम–१५ चे सिमेंट कॉक्रीटच्या कामाचा दर पाहाता दर हा ब्रिजच्या कामाचा घेतला आहे. वास्तविक पाहाता सदरचे काम ब्रिजचे नसलेने नाल्याच्या कडेला संरक्षक भिंतीला बिल्डींग कामातील एम–१५ चे सिमेंट कॉक्रीटचा दर वापरणे आवश्यक आहे. बिल्डींग कामातील एम–१५ चे सिमेंट कॉक्रीटचा दर ३९५९.९५ (मूळ दर ३३२९ + लिड + १०% डोंगराळ भाग + १% कामगार कल्याण निधी + ०.७५% व्हॅट) देणे आवश्यक असता ब्रिजच्या कामाचा दर र.

रु. ४,०८४.५२ दिला आहे. जादा दर दिलेने मक्तेदारास ११.०७ घ. मी. करीता १४४८ (१३७९.१० अधिक ४.९९% जादा दराची निविदा) जादा अदाई झाली आहे. सदर रक्कमेची वसुली करून न. पा. निधीत भरणा करणेत यावी.

२. कामाचे आदेश पाहाता कामाची मुदत ६० दिवस होती. म्हणजेच काम दि. १६/१२/११ रोजी पुर्ण होणे आवश्यक होते. काम पुर्णत्वाचा दाखला पाहता काम पुर्ण दि. १०/१२/११ रोजी पुर्ण झालेले नमुद केले आहे. कामाचे मोजमाप पुस्तक पाहाता कामाची मापे अभियंता यांनी १८/२/१२ रोजी मोजमाप पुस्तकात नोंदवली आहे. म्हणजेच काम हे मुदतीत पुर्ण झालेचे दर्शविले आहे. विसंगतीबाबत खुलासा करावा. काम मुदतीत पूर्ण न केलेस दंडाबाबतच्या कारवाईचा उल्लेख कामाचा आदेश व करारनाम्यात केलेला नाही. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडील स्थायी आदेश क्र. ३६ दिनांक २९/१०/२००५ मधील परिशिष्ट 'क' मधील मुद्दा क्र. ९ नुसार निविदेत दंडाचा उल्लेख करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही नगरपालिकेने केलेली नाही. ह्याबाबत खुलासा करावा. मोजमापे पुस्तकात मापे व काम पुर्णत्वाच्या दाखल्यावर स्वाक्षरी अभियंता यांनी दि. १८/२/१२ रोजी केलेने काम दि. १०/१२/११ रोजी पुर्ण झालेचे निश्चित होत नाही. तरी काम उशीरा पुर्ण केलेने दंडात्मक कार्यवाही करून पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

३. सदर कामाची मापे दि. १८/२/१२ रोजी मोजमाप पुस्तकात नोंदवली आहेत. नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्थायी निर्देश क्र. ३७ दि. ३ जानेवारी २००६ मधील बाब क्र. १५ नुसार नगरपरिषदांमध्ये विकास कामाची मोजमापे एकदाच व शेवटी अभियंता यांनी घेऊ नयेत कारण झाकलेल्या मापाची खात्री होत नाही. स्थायी आदेशाचे पालन संबंधित अभियंता यांनी केलेले नाही.

**परिच्छेद क्र. १५ :– पेठ मंगळवार सि.स.नं. १९५ या नगरपरिषदेच्या जागेत लायब्ररी व बहुउद्देशीय हॉल बांधणे**.

अंदाजपत्रकी रक्कम : रु,९,८९,६६५/–

प्र. मंजूरी : न.पा.सर्वसाधारण सभा ठ. क्र. ४० दि. १७/२/०७

तांत्रिक मंजूरी : का. अ. मजीप्रा बांध. विभाग, सातारा जा.क्र.चिशा/ता.मं./२९४५ दि. १५/११/०८

ठेकेदाराचे नाव : श्री. कैलास प्रभाकर सांगलीकर

कामाचे आदेश : मुख्याधिकारी न. पा. सातारा यांचे आदेश क्र. सानप/सांबा/१६६४ दि. २७/२/०९

काम सुरु दिनांक : २७/२/०९ काम पूर्ण दिनांक: २०/९/११

| अ. क्र. | प्र. क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | ५६८ | २९/७/०९ | ५,८३,५९९ | प्रथम धावते देयक |
| २ | १६६७ | २७/१/१२ | २,९१,३८१ | द्वितीय धावते व अंतिम |
| एकूण ८,७४,९८० | | | | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. सदर कामाचे अंदाजपत्रक पाहाता बाहेरील व आतिल सिमेंट प्लॅस्टर व रंगकामाच्या मापातून दरवाजे व खिडक्यांची मापे वजा केली आहेत व त्याप्रमाणे निविदेसोबत शेड्युल बी आहे. सदर कामाचे मोजमाप पुस्तक पाहाता फक्त बाहेरील प्लॅस्टर व रंगाच्या कामातून दरवाजे व खिडक्यांची मापे वजा केली आहेत. मक्तेदाराने शेड्युल बी चा अभ्यास करून दर भरलेला असतो. जर शेड्युल बी मध्ये बाहेरील व आतील सिमेंट प्लॅस्टर व रंगकामाच्या मापातून दरवाजे व खिडक्यांची मापे वजा केली आहेत तर त्याप्रमाणे ठेकेदारास देयक अदा करताना सदरची मापे वजा करून देयक अदा केले पाहिजे. परंतु अशी कार्यवाही न केलेले खालीलप्रमाणे अदाई झाली आहे.

| अ. क्र. | बाब | वजा करावयाचे परिमाण | दर | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | आतील प्लॅस्टर | २५.०२ चौ. मी. | १०२.०३ | २,५५२.७९ |
| २ | निरु फिनिशिंग | २५.०२ चौ. मी. | १३.९६ | ३४९.२८ |
| ३ | व्हाईट वॉश | २५.०२ चौ. मी. | ३.६७ | ९१.८२ |
| ४ | प्रायमर कोट | २५.०२ चौ. मी. | १०.६० | २६५.२१ |
| ५ | ऑईल बाँड | २५.०२ चौ. मी. | २१.०० | ५२५.४२ |
| | | | एकूण | ३,७८४.५२ |
| | | | + ४.९९% जादा दर | १८८.८५ |
| | | | एकूण | ३,९७३.३७ |

उपरोक्त रक्कम रु. ३९७३ वसूल करून पुर्तता दाखवावी.

२. सदर कामाचे अंदाजपत्रक पाहाता फूटपाथ करणेबाबत तरतुद नाही. परंतु मोजमाप पुस्तक पाहाता फूटपाथचे काम केले आहे व पेव्हींग ब्लॉक बसविणेकरीता खर्च केला आहे. सदर बाबीवर खालील प्रमाणे खर्च केला आहे.

| अ. क्र. | बाब | परिमाण | दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | खोदाई | १०.५१ घ. मी. | ६३.०० | ६६२.१३ |
| २ | पीसीसी | २.६२ घ. मी. | १९०९.२० | ५,००२.१० |
| ३ | वीट बांधकाम | १३.१५ घ. मी. | १९५१.६९ | २५,६६४.७२ |
| ४ | प्लॅस्टर | ४.६८ स्के. मी. | १९१.९९ | ८९८.५१ |
| ५ | पेव्हींग ब्लॉक | २४.९४ स्के. मी. | ६१८.०३ | १५,४१३.६७ |
| | | | एकूण | ४७,६४१.१३ |
| | | | (+) ४.९९ जादा दर | २३७७.२५ |
| | | | एकूण | ५०,०१८.४२ |

सदरचे फूटपाथचे काम व पेव्हींग ब्लॉकचा एष्ट्रा आयटम वर एकूण ५०,०१८.४२ खर्च केला आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र. १६७ (३) नुसार बांधकामाच्या जादा बाबींचा (एष्ट्रा आयटम) चे पुरवणी अंदाजपत्रक तयार करून त्यास मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. याबाबत खुलासा करावा. आता पुरवणी अंदाजपत्रक तयार करून त्यास कार्योत्तर मान्यता घेऊन पुर्तता दाखवावी.

३. सदर कामास न. पा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३४८ दि. ८/१०/११ अन्वये ठेकेदारास दि. ३०/९/११ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. काम पुर्णत्वाच्या दाखल्यावर दि. ३०/९/११ रोजी काम पुर्ण झालेचे नमूद केले आहे. परंतु मोजमाप पुस्तक वरील दुसरे धावते बिल व अंतिम बिलाचे मोजमापे मोजमाप पुस्तकात दि. १३/१/१२ रोजी नमुद केली आहेत. जर काम दि. ३०/९/११ रोजी संपले तर मोजमाप पुस्तकात मापे १३/१/१२ रोजी इतक्या विलंबाने का नोंदवली ह्याचा खुलासा करावा. झाकलेल्या मापाची मोजमापे काय आधारे नोंदवली ह्याचा अर्थ नोंदवलेल्या झाकलेल्या मापाची खात्री व गुणवत्तेबाबत खात्री करता आली नाही. नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्थायी निर्देश ३७ दि. ३ जानेवपारी २००६ मधील बाब क्र. १५ नुसार मोजमापे कामाच्या प्रगतीनुसार (रेकॉर्ड एन्ट्री) नोंदवणे आवश्यक आहे. शेवटी एकदाच मापे घेऊ नये असे असताना संबंधित अभियंता यांनी आदेशाचे पालन केले नाही.

## मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० चे

## कलम ९(ब) खालील आक्षेप

**परिच्छेद क्र. १६ :- पाणी पुरवठा विभागाकडील तुरटी व टी. सी. एल. साठा विसंगतीबाबत.**

पाणी पुरवठा विभागाकडील तुरटी व टी. सी. एल. भांडार विभागाकडून खरेदी केल्यानंतर भांडार विभाग साठा नोंदवहीस नोंदवून पाणी पुरवठा विभागास देण्यात आली आहेत. तसेच पाणी पुरवठा विभागाने सदर साहित्याची साठा नोंदवहीत नोंद घेतलेली आहे. याबाबत खालील अनियमितता आढळल्या.

१. भांडार विभागाकडून दि. ८/१२/११ रोजी ६.५ मे. टन तुरटी पाणी पुरवठा विभागास देण्यास आली होती. परंतु पाणी पुरवठा साठा नोंदवहीला पान क्र. ३५ वर ३.५ मे. टन जमा होण्यात आलेली आहेत. तसेच भांडार विभागाकडील दि. ३०/३/१२ साठा नोंदवही पहाता १० मे. टन व ३.५ मे. टन अशी एकूण १३.५ मे. टन तुरटी भांडार विभागाकडून प्राप्त केल्याबाबत पाणी पुरवठा अभियंता यांच्या स्वाक्षरी आहे. परंतु पाणी पुरवठा साठा नोंदवही पान क्र. ५४ पहाता दि. ३०/२/२०१२ रोजी ८.५ मे. टन जमा केलेची नोंद आहे. म्हणजेच दि. ८/१२/११ रोजी ३ मे. टन तुरटी व दि. ३०/३/१२ रोजीची ५ मे. टन एकूण ८ मे. टन तुरटीची नोंद साठा नोंदवहीस कमीने घेतली आहे व त्याप्रमाणे तुरटीचा वापर केलेचे दिसून येते. त्यामुळे सदर ८ मे. टन तुरटीचा गैरवापर झालेचे स्पष्ट होत आहे. तरी ८ मे. टन तुरटीची रु.४४,०८०/- पाणी पुरवठा अभियंता यांचेकडून वसुलात आणावेत व नगरपालिका फंडात जमा केल्याची कागदोपत्री पुर्तता दाखवावी.

२. पाणी पुरवठा तुरटी साठा नोंदवही पहाता दि. ३०/३/२०१२ रोजी पूर्वीची शिल्लक ७१५८ कि. ग्रॅम व दिनांक ३०/३/२०१२ रोजीची जमा तुरटी ८५०० कि. ग्रॅम म्हणजे १५६५८ कि. ग्रॅम होणे आवश्यक असता १३६५८ कि. ग्रॅम शिल्लक दाखविण्यात आली आहेत म्हणजे २००० कि. ग्रॅम कमी दाखविण्यात आली आहे. तरी कमी जमा २००० कि. ग्रॅम तुरटीची रक्कम रुपये ११,०२०/- वसूल करून नगरपालिका फंडात जमा करावी.

३. भांडार विभागाकडून दिनांक ७/१२/११ रोजी १० मे. टन टी. सी. एल. पाणी पुरवठा विभागास देण्यात आली होती. परंतु पाणी पुरवठा साठा नोंदवहीला पान क्र. ३८ वर ५ मे. टन जमा घेण्यात आली

आहे. परंतु १० मे. टन टी. एल. एल भांडार विभागाकडून प्राप्त केल्याबाबत पाणी पुरवठा अभियंता यांची स्वाक्षरी आहे. पाणी पुरवठा साठा नोंदवहीला ५ मे. टन टी. सी. एल. कमी नोंद केली आहे. सदर कमी जमा ५ मे. टन टी. सी. एल. ची रक्कम रुपये १,११,५००/- पाणी पुरवठा अभियंता यांचेकडून वसूलात आणून नगरपालिका फंडात जमा करावे.

उपरोक्त परि. क्र. १ ते ३ ची रक्कम रुपये १,६६,६००/- संबंधितांकडून वसूलात आणून नगरपालिका फंडात जमा करावेत.

**परिच्छेद क्र. १७ :- वॉर्ड क्र. १८ अंतर्गत रस्ते पेव्हर ब्लॉक बसविणे, कॉंक्रीटीकरण करणे, गटर्स बंदिस्त करणे.**

| | | | |
|---|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु. ४,७१,७२१ | |
| प्र. मंजूरी | : | मा. जिल्हाधिकारी सातारा यांचे आदेश क्र. नियोजन/आस्थाविका/ २०११-१२/प्रमाविपस/का-५/६ ते १४ दिनांक १२/९/११ | |
| तांत्रिक मंजूरी | : | मा. कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेश जा. क्र. चिशा/ता.मां./१७८६ दिनांक ११/८/११ | |
| ठेकेदाराचे नाव | : | श्री. राजेश खाशाबा गोडे | |
| कामाचे आदेश | : | मुख्याधिकारी न. पा. यांचे आदेश क्र.सानप/साबां/११८१ दि. १२/१०/११ | |
| काम सुरु दिनांक | : | १२/१०/११ | काम पूर्ण दिनांक १/११/११ |
| मोजमाप नोंदवही क्र. | : | ४९ | पान क्र. ६१ व ६२ |
| | | ६१ | पान क्र. ७ ते ९ |
| लेशाशिर्ष | : | आमदार फंड | |
| सुरक्षा ठेव रु.२४,६४० | | आयकर रु.४९२८ | कार्यकंत्राट कर रु.१९,७११ |
| विमा रु.४९२८ | | रॉयल्टी रु.२३२० | |

| अ.क्र. | प्र. क्र. | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | | | १,३२,२७७ |
| २ | २६७३ | दि. ३१/३/१२ | ३,६२,८४१ |
| एकूण | | | |

याबाबत खालील अभिप्राय देणेत येत आहेत.

१. सदर कामाची मोजमापे पाहाता असे निदर्शनास येते कि खालीलप्रमाणे कामाच्या बाबी ह्या मुळ अंदाजपत्रकात नाहीत त्यामुळे सदरच्या बाबी एक्स्ट्रा आयटम होत आहेत.

| अ. क्र. | बाबीचा तपशील | परिमाण | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | खोदाई | २१.६१ घ.मी. | २,६१३.६० |
| २ | ३०० मी. मी. पाईप पुरविणे | ६० रनिं. मी. | ३५,५८०.०० |
| ३ | ३०० मी. मी. पाईप टाकणे | ६० रनिं. मी. | ९,१७४.०० |
| ४ | रिफीलिंग | १५.८३ घ. मी. | ८७०.६५ |
| ५ | डिस्पोजल मटेरियल | ५.७७ घ. मी. | ९०२.४३ |
| ६ | चेंबर | १७ चेंबर | ७३,६५९.३० |
| | | एकूण | १,२२,७९९.९८ |
| | | जादा (+) ४.९९% | ६,१२७.७२ |
| | | एकूण | १,२८,९२७.७० |

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र. १६७ (३) नुसार बांधकामाच्या जादा बाबींचा (एक्स्ट्रा आयटेम) चे पुरवणी अंदाजपत्रक तयार करून त्यास मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. याबाबत खुलासा करावा. आता पुरवणी अंदाजपत्रक तयार करून त्यास कार्योत्तर मान्यता घेऊन पुर्तता दाखवावी.

२. कामाचे देयक आदा करताना रॉयल्टीची रक्कम रु.२,३२० देयकातून कपात केली आहे. परंतु अद्यापपर्यंत सदरची रक्कम शासनाकडे भरणा केलेली नाही. ह्याबाबत खुलासा करावा व रक्कम त्वरीत शासन निधीत भरणा करून पुर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. १८ :– वॉर्ड क्र. ३२ पेठ शनिवार संकपाळ बोळ जवळ श्री. कुलकर्णी घर ते नाला अखेर पाईप ड्रेन करणे**.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु. ४९,९३४/- |
| प्र. मंजूरी | : | सार्व. बांध. समिती ठराव क्रमांक ३१२७ दि. २३/२/११ |
| ठेकेदाराचे नाव | : | तुषार बाळासाहेब पवार |
| कामाचे आदेश | : | मुख्याधिकारी न. पा. सातारा यांचे आदेश क्र. सानप/साबां/३०७ दि. ५/७/११ |
| काम सुरू दिनांक | : | ५/७/२०११ काम पूर्ण दिनांक १८/७/११ |
| मोजमाप नोंदवही | : | क्र. ५९ पान क्र. २ |

प्रमाणक क्र. ५२७ दि. ३/८/११ रक्कम रु. ५४,५८२/- प्रथम व अंतिम देयक

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. सदर कामाचे अंदाजपत्रक व निविदेसोबतचे शेड्युल बी नुसार कामातील बाबींचा दर व मक्तेदारास अदा केलेल्या देयकातील दर ह्यामध्ये खालीलप्रमाणे तफावत दिसून येते. शेड्युल बी चा अभ्यास करून ठेकेदाराने ४.९९% जादा दराची निविदा भरली आहे व त्यानुसार रक्कम अदा करणे आवश्यक असता खालीलप्रमाणे जादा दरावर ४.९९% अधिक करून अदा केलेले रक्कम रुपये मक्तेदारास जादा अदाई झाली आहे.

| अ. क्र. | बाब क्र. | बाब | परिमाण | शेड्युल बी व अंदाजपत्रकानुसार | देयकातील दर | दरातील तफावत | वसुलपात्र रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | मातीतील खोदाई | ८.६४ घ.मी | १०४.५० | १२१.०० | १६.५० | १४२.५६ |
| २ | ३ | ३०० एम.एम. आरसीसी पाईप पुरविणे. | ३२ मी. | ५३९.०० | ५९३.०० | ५४.०० | १७२८.०० |
| ३ | ४ | पाईप जोडणे | ३२ मी. | १०५.६० | १५२.९० | ४७.३० | १५१३.६० |
| ४ | ५ | रिफिलिंग मटेरियल | ५.५६ घ. मी | ४२.९० | ५५.०० | १२.१० | ६७.२८ |
| ५ | ६ | डिस्पोझल मटेरियल | ३.०८ घ. मी. | १४४.१४ | २५०.३७ | १०६.२३ | ३२७.१९ |
| ६ | ७ | चेंबर बांधकाम | ६ | ३९२२.६० | ४३३२.९० | ४१०.३० | २४६१.८० |
| | | | | | | एकूण | ६२४०.४३ |
| | | | | | | + ४.९९% जादा | ३११.४० |
| | | | | | | एकूण | ६५५१.८३ |

उपरोक्त प्रमाणे जादा अदाईची र. रु. ६,५५२/- संबंधीतांकडून वसुल करून न. पा. निधीत भरणा करून पूर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. १९ :- वॉर्ड क्र. ३८ पेठ चिमणपुरा सि. स. नं. १६ प्रताप कांबळे ते विनायक कांबळे ते माने घर अखेर रस्ता डांबरीकरण करणे**.

अंदाजपत्रकीय रक्कम : रु. ५,८८,९००/-

प्र. मंजूरी : ठराव क्र. ८२५ दिनांक १/१२/२००९

तांत्रिक मंजूरी : मा. कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेश जा. क्र./चिशा/ता. मां./२४२३/ दिनांक ११/६/२०१०

ठेकेदाराचे नाव : मे. पुनम कन्स्ट्रक्शन, सातारा

कामाचे आदेश : जा. क्र. सानप/साबां/४६४ दिनांक ११/८/२०११

काम सुरु दिनांक : ११/८/२०११ काम पूर्ण दिनांक १७/११/२०११

मोजमाप नोंदवहीक्र. : ५३ पान क्र. १४९ ते १५१ मोजमाप दिनांक २८/११/२०११

लेखाशिर्ष : दलित वस्ती सुधार

करारपत्र : रक्कम रु. १५२० दिनांक २५/३/२०११

सुरक्षा ठेव रु. ३३,२६३/- आयकर रु. ६,६५२/- कार्यकंत्राट कर रु. १३,३०५/-

विमा रु. ६,६५३/-

प्रमाणक क्र. १८४० दि. ६/१/१२ र. रु.६,६५,२५४/- प्रथम व अंतिम

निधी : दलित वस्ती सुधार योजना

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. काम सुरू दिनांक ११/८/२०११ व काम पूर्ण दिनांक १७/११/२०११ या कालावधीत झालेले आहे. संबंधित ठेकेदाराने २६/४/२०११ रोजी शासकीय कोषागारात रॉयल्टीपोटी भरलेल्या रकमेची चलने सादर केलेली आहेत. कामाचा आदेश ११/८/२०११ रोजी दिलेला असून सदर चलने कामापूर्वी ४ महिने अगोदरची सादर केल्याने सदर खनिज इतर साईटवर वापरलेचे ले.प.चे मत आहे. सबब सदरची चलने लेखापरीक्षणासाठी मान्य करता येत नाहीत. तरी रॉयल्टीची रक्कम रु.२१,६५६/- संबंधित ठेकेदारांकडून वसूल करून शासनास भरणेत यावी.

२. नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्थायी आदेश क्र. ३६ दि. २९/१२/२००५ मधील परिशिष्ट ‘क’ मधील मुद्दा क्र. ९ नुसार निविदेत दंडाचा उल्लेख करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नगरपालिकेने केलेली नाही. कामाच्या मुदतीपेक्षा जादा कालावधीची दंडनीय कार्यवाही करून पुर्तता दाखवावी.

३. दलित वस्ती सुधार योजनेतून कामे घेताना मा. जिल्हाधिकारी सातारा यांचे प्रशासकीय मान्यता क्र. साशा/नपा/कावि-९२१ दि. २६/५/२०११ मधील अटीनुसार निवडलेली कामे ही अनुसूचित जातीची लोकसंख्या ज्या भागात ५०% पेक्षा जास्त आहे त्याच भागात मुख्याधिकारी यांनी खात्री करावयाची आहे. कार्यालयीन टिपणी, विभागप्रमुखांचे छाननी व अभिप्राय तसेच ठराव यामध्ये याबाबत तपशील नोंदलेला नाही.

वसुलपात्र रक्कम रु.२१,६५६/- बांधकाम विभाग, सातारा नगरपरिषद सन २०११-१२

**परिच्छेद क्र. २० :- करंजे येथील उद्यानात वॉचमन केबीन व मल्टीपर्पज हॉल बांधणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु.५,००,०००/- |
| प्र. मंजूरी | : | ठराव क्र. १५५१ दिनांक १७/२/२०११ |
| तांत्रिक मंजूरी | : | मा. कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेश जा. क्र./चिशा/ता.मां./११४४ दिनांक २५/५/२०११ |
| ठेकेदाराचे नाव | : | सुजीत व्यंकटराव भोसले ५% जादा दराने. |
| कामाचे आदेश | : | सानप/सा.बां./४०६/ दि. २६/७/२०११ |
| मोजमाप नोंदवही क्र. | : | ५९ पान क्र. ७२ ते ७४ मोजमाप दि. १३/११/२०११ |
| लेखाशिर्ष | : | न. पा. निधी |
| करारपत्र | : | र. रु. १,२००/- दिनांक १५/७/२०११ |

सुरक्षा ठेव रु. २०,३१४/- आयकर रु.४,०६३/- कार्यकंत्राट कर रु.१६,२५१/-

विमा रु. ४,०६३/- रॉयल्टी रु.६,६०८/-

प्रमाणक क्र.२४३० दि. १६/३/२०१२ र. रु. ४,२६,५९८/- प्रथम बिल न. पा.निधी

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

१. मोजमाप पुस्तक क्र. ५९ पान ७४ वर रॉयल्टीची रक्कम रुपये ६,६०८/- ठेकेदाराच्या बिलातुन कपात केलेली आहे. तथापि सदर रक्कम शासनाकडे भरणा करण्यात आलेली नाही. तसेच लेखा शाखेकडे शासनास भरणा करावयाच्या रक्कमामध्ये सदर रकमेचा समावेश नाही. सबब रॉयल्टीची रक्कम वसुल करूनही शासनाकडे भरणा न करणे हे नियमबाह्य असून याबाबत लेखा शाखेने कार्यवाही न करण्याची कारणे नमूद करावीत.

२. उपरोक्त देयकात शासकीय वजाती खालीलप्रमाणे कमी करण्यात आलेल्या आहेत. आयकर रु.२०३/-, विक्रीकर रु.८१७/-, सु. ठेव रु. १,०१६/-, विमा २०३/- असे एकूण २,२३९/- ची वसुली करणेत यावी.

३. अंदाजपत्रकीय रक्कमेपैकी ८५% रक्कम ठेकेदारास आदा करणेत आलेली आहे. परंतु अद्याप वॉचमन केबीनचे काम करणेत आलेले नाही. त्यामुळे ठेकेदारास जादा रक्कम आदा झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत समर्थनीय खुलासा करावा.

४. अंदाजपत्रकात बाब क्र. ७ व ८ अन्वये फ्लश दरवाजा व अॅल्युमिनियम खिडक्यांची तरतूद केलेली आहे. तथापि सदरचे काम मल्टीपर्पज हॉलसाठी करणेत आलेले नाही. खुलासा करावा.

५. कामाची मुदत ६० दिवस असून अद्याप काम अपूर्ण आहे. विलंब कालावधीची परिगणना करून दंडनीय कार्यववाही करणेत यावी व दंडाची रक्कम वसूल करून पुर्तता दाखवावी.

६. सदर कामाचा गुण नियंत्रक यांचेकडील गुणवत्ता चाचणी अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही. पुर्तता दाखवावी.

वरील १ ते ६ ची पुर्तता दाखवावी.

| | | |
|---|---|---|
| अ) | शासनास भरणा रक्कम (उप. परि.१) | ६,६०८/- |
| ब) | वसुलपात्र रक्कम | २,२३९/- |
| | एकूण | ८,८४७/- |

बांधकाम विभाग, न. प. सातारा २०११/१२

**परिच्छेद क्र. २१ :- वॉर्ड क्र. ७ सदरबझार कॅप्टन देसाई कॉलनी येथे पाईप ड्रेन करणे**.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु. २,२४,१९५/- |
| प्र. मंजूरी | : | स्थायी समिती ठ. क्र. १५८८ दि. ४/३/११ |
| तांत्रिक मंजूरी | : | मा. कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेश जा. क्र./चिशा/तामां/२०८१ दि. १६/६/११ |
| ठेकेदाराचे नाव | : | अजित वसंतराव पाटील |
| कामाचे आदेश | : | मुख्याधिकारी न.पा.तारा यांचे पत्र क्र. सानप/बांध/११८९ दि.२४/१०/११ |

काम सुरु दिनांक : २४/१०/११ काम पूर्ण दिनांक: ५/१२/११

मोजमाप नोंदवही क्र. : ५४ पान क्र. ९२ ते ५३

सुरक्षा ठेव रु.१३,३९७/- आयकर रु.२,७४०/- कार्यकंत्राट कर रु. १०,९४८/-

रॉयल्टी रु. ९९०/- उपकर रु.२,७४०/-

प्रमाणक क्र.२४२५ दि. १६/३/१२ र. रु. २,७३,९५५/- प्रथम व अंतिम

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. सदर कामाचे मोजमाप पाहाता कामामध्ये जुन्या सिमेंट कॉक्रीटमध्ये खोदाईचा जादा बाब (एक्स्ट्रा आयटम) म्हणून नमूद केली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्र.१६७(३) नुसार बांधकामाच्या जादा बाबींचा पुरवणी अंदाजपत्रक तयार करून त्यास मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. याबाबत खुलासा करावा. आता पुरवणी अंदाजपत्रक तयार करून त्यास कार्योत्तर मान्यता घेऊन पुर्तता दाखवावी.

२. सदर कामातील मोजमापे पाहता खोदाईतून एकूण ६८.७३ घ. मी. इतका माल निघाला आहे. त्यापैकी १०.४० घ. मी. रिफिलिंग (पुर्नभराई) करीता दर्शवून उर्वरित ५८.३३ घ. मी. माल दीड किलोमीटर अंतरावर टाकलेबाबत नोंदवले आहे व त्याप्रमाणे आदाई झाली आहे. वास्तविक पाहाता एकूण खोदाई केलेल्या ६८.७३ घ. मी. च्या भागात पाईप लाईन करीता १७.६८ घ. मी. व चेंबर करीता ६.८१ घ. मी. चे काम झालेने उर्वरित ४४.२४ घ. मी. चे रिफिलिंग व २४.४९ घ. मी. मालाचे दीड किलोमीटर अंतरावर नेऊन डिस्पोझलची मापे नमुद करणे आवश्यक होते. उपरोक्तप्रमाणे विसंगत मापे नमुद केलेने ठेकेदारास खालीलप्रमाणे जादा अदाई झाली आहे.

| अ.क्र. | बाब | देय | दिलेले | कमी / जादा |
|---|---|---|---|---|
| १ | रिफिलिंग | ४४.२४ घ.मी. | १०.४० घ.मी. | रु.१४५२ कमी अदा |
| २ | डिस्पोझल | २४.४९ घ.मी. | ५८.३३ घ.मी. | रु.४८७८ जादा अदा |
| | | | | ३४२६ जादा अदा |
| | | (+) २०% जादा दराची निविदा | | ६८५ |
| | | | | ४१११ ची जादा अदा. |

उपरोक्तप्रमाणे ठेकेदारास झालेली जादा अदाईची रक्कम रु.४,१११/- ची वसुली करून पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. २२ :- पाणी पुरवठा योजना तोट्यात असलेबाबत.**

नगरपरिषद साताराचे पाणी पुरवठा विभागाचे जमाखर्च पत्रक सन २०११/१२ पहाता (विवरण क्र. २) त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१. सन २०११/१२ ह्या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा योजनेचे उत्पन्न रु.१,९१,२१,७४१ आहे. खर्च रु.२,८६,७७,५५७ आहे. त्यामुळे नगरपालिकेस पाणी पुरवठा योजनेवर र. रु. ९५,५५,८१६ एवढा तोटा सहन करावा लागला आहे. त्यासाठी उत्पन्न वाढणेबाबत व खर्च कमी करणेबाबत नियोजन करणे आवश्यक आहे. असे नियोजन केलेचे दिसून येत नाही. याबाबत खुलासा करावा.

२. नगरपरिषद क्षेत्रात एकूण २८,९१८ इतके करपात्र मिळकतधारक आहेत. त्यापैकी ६४८३ करदात्यांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पाणी उपलब्ध आहे. उर्वरित २२४३५ मालमत्ता धारकांपैकी फक्त १२९८३ इतकेच मिळकतदार नळ कनेक्शन धारक आहेत. उर्वरित ९४५२ मालमत्ताधारक नळ जोडणी विना पाणी वापर करतात असे दिसते. सदर मिळकतधारकांना पाणीपट्टीच्या कक्षेत आणणे आवश्यक वाटते. त्याशिवाय अवैध नळ जोडणी, पंपाद्वारे नळाच्या तोटीतून पाणी खेचणे इत्यादी बाबींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. सदर बाबत काय कार्यवाही केली? ह्याबाबत खुलासा करावा.

३. वर्ष २०११/१२ मध्ये पाणी करापेटी मागणी र. रु. ३,४१,८०,२८५ एवढी होती. त्यापैकी रुपये १,८४,०२,२५२ वसुली झाली. वर्षाअंती रुपये १,५७,७८,०३३ इतकी थकबाकी येणे आहे. वसुलीची टक्केवारी ४६% इतकीच आहे. सदर बाब गंभीर असून पाणी पुरवठा योजनेचा तोटा पाहाता १००% पाणी पट्टी वसूल होणे आवश्यक वाटते.

४. लेखापरीक्षण कालावधीमध्ये वर्ष २०११-१२ साठी रुपये २,१९,३४०/- इतकी रक्कम पाणीपुरवठा डिपॉझिट पोटी जमा झाली आहे. सदर रक्कम व त्यापूर्वी वर्ष २०१०-११ अखेर जमा झालेली डिपॉझिटची रक्कम परिगणित करण्यात येऊनती एकत्रितपणे गुंतवणूक करणे आवश्यक असता अशी कार्यवाही केलेची दिसून येत नाही. याबाबत खुलासा करावा.

वरीलप्रमाणे मुद्दा क्र. १ ते ४ बाबत दक्षता घेण्यात येऊन पाणी पुरवठा योजनेमध्ये तोटा होणार नाही याची दक्षता घेवून पूर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. २३ :– पेठ गुरुवार सि.स.नं. ३४४ येथील न. पा. ची जुनी इमारत पाडणे**.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु.३४,२०२ |
| प्र. मंजुरी | : | स्थायी समिती ठराव क्र.१४११ दि. २१/९/१० |
| ठेकेदाराचे नाव | : | श्री. तुषार बाळासाहेब पवार |
| कामाचे आदेश | : | मुख्याधिकारी न.पा.सातारा/साबां/३३२ दि. ७/७/११ |
| काम सुरु दिनांक | : | ७/७/११ काम पूर्ण दिनांक : १८/७/११ |
| मोजमाप नोंदवही क्र. | : | ५९ पान क्र. १० |

सुरक्षा ठेव रु.१,७९६ आयकर रु.३६० कार्यकंत्राट कर रु.१,४३७

विमा रु. ३६०

प्रमाणक क्र. ५२७ दि. ३/८/११ र. रु.३५,९०९ प्रथम व अंतिम देयक

याखालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. सदर कामाचे अंदाजपत्रक पाहाता डिस्मेटलिंग वीट बांधकामाचे बाब क्र. ४ नुसार करावयाचे आहे व सदर मालाचे बाब क्र. ५ अन्वये डिस्पोझल १.५ कि. मी. अंतरापर्यंत करावयाचे आहे. सदर बाब क्र. ५ चे दर पाहाता सदरचा बिल्डींगचे रबिश मटेरिअलचे १.५ कि. मी. पर्यंतचे लिड चार्जेस ९४.५० (८४.४२ + १०% डोंगराळ भाग + ०.७५% व्हॅट + १% लेबर वेलफेअर सेस) प्रति घ. मी. करीता देय असताना १७६.७२ घ. मी. दर दिला आहे. त्यामुळे ठेकेदारास १०४.४० घ. मी. करीता ९०१२ (१०४.४० घ. मी. ह्न ८२.२२ + ४.९९% जादा दराची निविदा) ची जादा अदाई झाली आहे. सदर रक्कमेची वसुली करून पुर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. २४ :– वॉर्ड क्र. १० येथील भैरवनाथ मंदीर लगतचे ओढ्यास रिटेनिंग वॉल बांधणे**.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु.१,००,७७४/– |
| प्र. मंजूरी | : | स्थायी समिती ठ. क्र. २०३२ दिनांक २१/७/२०११ |

तांत्रिक मंजूरी : मा. कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचे कडील तांत्रिक मंजूरी आदेश जा.क्र./चिशा/ता.मां./१९३८ दिनांक ३०/८/२०११

ठेकेदाराचे नाव : श्री. विनायक साहेबराव साळुंखे

कामाचे आदेश : मुख्याधिकारी यांचे आदेश क्र. सानप/साबां/११८३ दि.२४/१०/११

काम सुरु दिनांक : २४/१०/११ काम पूर्ण दिनांक : २०/११/११

सुरक्षा ठेव रु. ५८९१ आयकर रु.११७८ कार्यकंत्राट कर रु.२३५४

रॉयल्टी रु.२५३२ सेस रु.११७८

प्रमाणक क्र. १९८५ दि.२७/१/१२ र. रु. १,१७,८१२/- प्रथम व अंतिम देयक.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. सदर कामातील बाब क्र. ४ नुसार एम-१५ चे सिमेंट कॉक्रीटच्या कामाचा दर पाहाता दर हा ब्रिजच्या कामाचा घेतला आहे. वास्तविक पाहाता सदरचे काम ब्रिजचे नसलेने ओढ्याच्या कडेला संरक्षक भिंत बांधलेने बिल्डींग कामातील एम-१५ चे सिमेंट कॉक्रीटचा दर वापरणे आवश्यक आहे. बिल्डींग कामातील एम-१५ चे सिमेंट कॉक्रीटचा दर ३९५९.९४ (मुळ दर ३३२९ + लिड + १०% डोंगराळ भाग + १% कामगार कल्याण निधी + ०.७५ व्हॅट) देणे आवश्यक असता ब्रिजच्या कामाचा दर र.रु.४,०८४.५२ दिला आहे. जादा दर दिलेने मक्तेदारास २०.२१ घ. मी. करीता र. रु. २६०९ (२४८५ अधिक ५% जादा दराची निविदा) जादा अदाई झाली आहे. सदर रक्कमेची वसुली करून न. पा. निधीत भरणेत यावी.

**परिच्छेद क्र. २५ :- वॉर्ड क्र. ७ रेळेकर घर ते सोळके घर सदरबझार येथील रस्ता डांबरीकरण करणे.**

अंदाजपत्रकीय रक्कम : रु.७५,०००/

प्र. मंजूरी : ठराव क्र. १२९ दिनांक २१/१०/२०१०

ठेकेदाराचे नाव : रजिया कन्स्ट्रक्शन सातारा. २०% जादा दराने.

कामाचे आदेश : जा. क्र. सानप/साबां/ दि. १३/५/२०११

मोजमाप नोंदवही क्र. : ५२ पान क्र. १०२ ते १०३

लेखाशिर्ष : मा. वर्गीय कल्याण निधी.

करारपत्र : रक्कम रु.२८०/- दिनांक १३/५/२०११

सुरक्षा ठेव रु.८१८४/- आयकर रु.८३७/- कार्यकंत्राट कर रु.१६७४/-

विमा रु.८३७/-

प्रमाणक क्र.२६६७ दि.३१/३/१२ र.रु.८३,६७५/- पहिले व अंतिम देयक न. पा. निधी

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करून निविदा मागविण्यात आल्या व कमीत कमी दराची निविदा २०% जादा दराची रजिया कन्स्ट्रक्शन सातारा यांची निविदा मंजुर करणेत आली. तद्नंतर सन २०१०-११ दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार करुन सदर निविदा २०% जादा ऐवजी ३.९६% कमी दराची असल्याची परिगणना करणेत येऊन रजिया कन्स्ट्रक्शन यांना सदरचे काम देण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र. जीईएन १०९३/२३६५/ प्र.क्र.१२६/९३ नवि-१४ दि. २०/१०/९३ मधील मार्गदर्शक सूचनांचे पालन केलेले नाही. सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार रजिया कन्स्ट्रक्शन यांनी इतर कामे केलेली आहेत. त्यामुळे सदरचे काम मंजुर करताना नगरपालिकेने स्वत:चे हित पाहिलेले नाही. खुलासा करावा.

२. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम १९६२ नुसार अंदाजपत्रकीय रक्कमेत १०% किंवा त्यापेक्षा अधिक वाढ असलेस त्या त्या प्राधिकाऱ्याकडून मंजूरी घेणे आवश्यक असून तशी कार्यवाही केलेली नाही.

३. ओपन ग्रेड कारपेट व सिलकोटचे काम सारखेच करावयाचे असून अंदाजपत्रकात तशी तरतूद करण्यात आलेली आहे. तरी देखील कारपेट ३९.१२ घ. मी. जादा करणेत आलेले आहे. कारपेट वर सिलकोट न केल्याने झालेला खर्च वाया गेलेला आहे. तरी ३९.१२ ह्र १२८.३८ ह्र २०% = ६०२७/- संबंधिताकडून वसूल करून पुर्तता दाखवावी.

४) गुणनियंत्रक यांचेकडील गुणवत्ता चाचणी अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही. पुर्तता दाखवावी.

वसुलपात्र रक्कम रु.६,०२७/- बांधकाम विभाग न. प. सातारा २०११/१२

**परिच्छेद क्र. २६ :- गौण खनिज (रॉयल्टी) शासकीय भरणा रक्कमेबाबत.**

महसुल व वनविभाग अधिसुचना दि. ११/२/२०१० नुसार प्रति घ. मी. ७०.८८ (प्रति ब्रास रु.२००/- ) प्रमाणे रॉयल्टीची रक्कम आकारून शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

मोजमाप पुस्तकात नगरपरिषद अभियंता यांनी रॉयल्टीची रक्कम वसुल करून देय रक्कम दर्शविलेली आहे. तथापि वसूल केलेल्या रकमेचा परिणाम रोखनोंदवहीस दर्शविलेला नाही. तसेच सदरची रक्कम शासनास भरली गेलेली नाही. याबाबत वेळीच मेळ घेण्याची लेखा शाखेने कार्यवाही केलेली नाही.

खालील तपशीलाप्रमाणे रॉयल्टीची रक्कम शासनास भरणा केलेबाबत कागदोपत्री पुर्तता दाखवावी.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | कामाचा तपशील | मोजमाप पुस्तक देयकातून वजावट रक्कम | रोखनोंदवहीत नमूद वजावट | शासनास भरणा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २५८१/ २२/३/१२ | पेठ व्यंकटपुरा पंडीत घर ते जाधव घर कुलकर्णी घर पाईप ड्रेन करणे. | ७००/- | - | ७००/- |
| २ | २६६८/ ३१/३/१२ | वार्ड २० पेठ व्यंकटपुरा वाकनीस घराजवळ पाईप ड्रेन करणे. | १७८३/- | - | १७८३/- |
| | | एकूण | २४८३/- | - | २४८३/- |

**परिच्छेद क्र. २७ :- सोमण स्मारक ते राजवाडा बस स्टॉप गार्डन लॅम्प बसविणेबाबत.**

अंदाजपत्रकीय रक्कम : रु. १,९०,०००/-

प्र. मंजूरी : ठराव क्र. १२८५ दिनांक ४/५/२०१०

तांत्रिक मंजूरी : मा. कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचे कडील तांत्रिक मंजूरी आदेश जा.क्र. चिशा/ता.मां/७५/ दिनांक ऑगस्ट २०१०.

ठेकेदाराचे नाव : श्री. मनोज शेंडे

कामाचे आदेश : जा.क्र. वशि–६/८५/२०१०–२०११ दिनांक १/१०/२०१०

मोजमाप नोंदवही क्र. १३६ पान क्र. ६८ ते ७० मोजमाप तारीख ३/१२/२०१०

प्रमाणक क्र.०४ दि. १५/४/२०११ र.रु. अंतिम देयक न. पा. निधी

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

१. सदर कामाचे नगरपालिकेने र. रु. १,३२,०००/– चे अंदाजपत्रक तयार करून निविदा प्रक्रिया राबविली आहे. निविदा प्राप्त झालेनंतर नव्याने र. रु.१,९०,०००/– चे अंदाजपत्रक तयार करून त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतली आहे. अंदाजपत्रकाच्या रक्कमेत वाढ झालेने पेपर निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही न केलेने नगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही. याबाबत खुलासा करावा.

२. अंदाजपत्रकामध्ये बाब क्र. ४ अन्वये जमीन लेवलच्या वरती खांबाला ५० एम एम जी आय पाईप प्रति खांबास १ मीटर याप्रमाणे बसविणेची तरतुद आहे. परंतु मोजमाप पुस्तक पहाता प्रती खांबास १.५ मीटरचा पाईप बसविलेचा नोंदविला आहे. अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेतली असल्याने तांत्रिकदृष्ट्या १ मीटरची आवश्यक असताना १.५ मीटरचा पाईप ३६ खांबाला बसविलेने आवश्यक ते पेक्षा जादा पाईपचे ६,३००/– ठेकेदारास आदा झाले आहे. त्याची वसूली करून नगरपालिका निधीत भरणा करावी.

उपरोक्त परिच्छेदांची पूर्तता होईपर्यंत खर्चाची रक्कम रुपये १,९४,१२२/– आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. २८ :– वॉर्ड क्र. ३६ पेठ मंगळवार कला वाणिज्य कॉलेज ते शब्दतरंग अपार्टमेंट अखेर रस्त्याची दुरुस्ती करणे**.

अंदाजपत्रकीय रक्कम : रु.१,६२,६८५/–

प्र. मंजूरी : स्थायी समिती ठराव क्र. १३५४ दि. ३/९/१०

| | | |
|---|---|---|
| तांत्रिक मंजूरी | : | मा. कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचे कडील तांत्रिक मंजूरी आदेश जा.क्र./चिशा/ता.मं./४३२६ दि. २५/१०/१० |
| ठेकेदाराचे नाव | : | मे. रजिया कन्स्ट्रक्शन |
| कामाचे आदेश | : | मुख्याधिकारी यांचे आदेश क्र.सानप/बाधा/१२२१ दि.३१/३/११ |
| काम सुरु दिनांक | : | ३१/३/११ काम पूर्ण दिनांक १५/४/११ |
| मोमाप नोंवदही क्र. | : | ४६ पान क्र. ६७ ते ७१ |

सुरक्षा ठेव रु.१०,३४८/- आयकर रु.२,०७०/- कार्यकंत्राट कर रु.८,२७८/-

रॉयल्टी रु.९,१९९/- कल्याण निधी रु.२,०७०/-

प्रमाणक क्र. २४३८ दि. १६/३/१२ र.रु.२,०६,९६१/- पहिले व अंतिम न. पा. फंड

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. सदर कामाचे आदेश पहाता कामाची मुदत ३० दिवस आहे. त्यामुळे काम दि. ३०/४/११ पर्यंत पुर्ण होणे आवश्यक आहे. नगर अभियंता यांनी काम पुर्णत्वाचा दाखला दिल्याप्रमाणे काम दिनांक १५/४/११ रोजी पुर्ण झाले आहे. तसेच सदर मक्तेदारास काम सुरू न केलेबाबत तसेच विलंब झालेस दंडाची कार्यववाही करणेत येईल याबाबत पत्र क्र. सानप/साबां/४२ दि. २०/४/११ अन्वये लेखी कळविले आहे. सदर कामातील डांबरीकरणाचे चाचणी करणेबाबत प्रयोगशाळेस पत्र क्र. सानप/साबा/ १३५२ दिनांक १०/२/१२ अन्वये कळविले आहे व प्रयोगशाळेने पत्र क्र. लॅब/सेट/२०९२ दिनांक २७/२/१२ अन्वये चाचणी अहवाल दिला आहे. जर काम मुदतीत पुर्ण झाले नाही तरी अभियंता यांनी दि. १५/४/२०११ रोजी काम पुर्ण झालेचा दाखला दिला आहे. विलंबाबाबत दंडाची तरतुद करारनाम्यात केलेली नाही. तसेच कामाच्या आदेशात दंडाचा उल्लेख केलेला नाही. नगरपरिषद प्रशासन संचालनालय कडील स्थायी आदेश क्र. ३६ दि. २९/१२/०५ मधील परिशिष्ट क्र. क मधील मुद्दा क्र.९ नुसार निविदेत दंडाचा उल्लेख करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही नगरपालिकेने केलेली नाही. ह्याबाबत खुलासा करावा. काम उशिरा पूर्ण केलेने दंडात्मक कार्यवाही करून पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. २९ :- वॉर्ड क्र. २० पेठ रामाचा गोट सि.स.नं. ८९ टंकसाळे घर ते सि.स.नं. ७५ अखेर पाईप ड्रेन करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु. १,३३,७९६/- |
| प्र. मंजूरी | : | स्थायी समिती ठ. क्र. १८५१ दि. २४/६/११ |
| तांत्रिक मंजूरी | : | मा. कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचे कडील तांत्रिक मंजूरी आदेख जा. क्र./चिशा/ता.मं./१७२० दि. २/८/११ |
| ठेकेदाराचे नाव | : | श्री. रविंद्र वसंतराव सोनवणे |
| कामाचे आदेश | : | मुख्याधिकारी न. पा. सातारा ह्यांचे आदेश क्र.सानप/साबां./१०२२ दि. २०/९/११. |
| काम सुरू दिनांक | : | २०/९/११ काम पूर्ण दिनांक १५/११/११ |

मोजमाप नोंदवही क्र. ४६ पान क्र. ७८ ते ८० मोजमाप तारीख ६/३/१२

सुरक्षा ठेव रु.७,२९६/- आयकर रु.१,४९६/- कार्यकंत्राट कर रु.५,८३६/-

रॉयल्टी रु. ९००/- कामगार कल्याण रु.१,४५९/-

प्रमाणक क्र. २६६८ दि. ३१/३/१२ र.रु.१,४५,९१२/- प्रथम व अंतिम

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

१. कामाचे मोजमाप पहाता कामाची मापे दि. ६/३/२०१२ रोजी नोंदवली आहेत. काम पुर्णत्वाच्या दाखल्यावर नगर अभियंता ह्यांनी दि. ६/३/१२ रोजी स्वाक्षरी केली आहे. मात्र काम पूर्णत्वाचा दिनांक १५/११/११ नमुद केली आहे. कामाची मुदत १८/११/११ पर्यंत आहे. जर कामाची मापे अभियंता ह्यांनी मोजमाप पुस्तकात दि. ६/३/१२ रोजी नमूद केली तर काम दि. १५/११/११ रोजी पुर्ण झाले. हे फक्त काम मुदतीत पुर्ण झालेचे दर्शविले आहे. काम मुदतीत पुर्ण न केलेस दंडाबाबतच्या कारवाईचा उल्लेख कामाचा आदेश व करारनाम्यात केलेला नाही. नगरपरिषद प्रशासन संचालनालय कडील स्थायी

आदेश क्र. ३६ दि. २९/१२/२००५ मधील परिशिष्ट ‘क’ मधील मुद्दा क्र. ९ नुसार निविदेत दंडाचा उल्लेख करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही नगर पालिकेने केलेली नाही. ह्याबाबत खुलासा करावा. मोजमाप पुस्तकात मापे व काम पुर्णत्वाच्या दाखल्यावर स्वाक्षरी अभियंता यांनी दि.६/३/१२ रोजी केलेले काम दि. १५/११/११ रोजी पूर्ण झालेचे निश्चित होत नाही. तरी काम उशीरा पूर्ण केलेने दंडात्मक कार्यवाही करून पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

२. सदर कामातील बाब क्र. ५ खोदाईतून निघालेला माल १.५० कि. मी. अंतरावर नेऊन टाकणे ह्याचा दर अंदाजपत्रकात रु.२५०.३७ प्रति घ. मी. दर्शविला आहे. प्रत्यक्षात सदर बाबीचा दर हा ११८.११ (१०५.५२ दर सुचीनुसार दीड किलोमीटर करीता लिड चार्ज + १०% डोंगराळ भाग + ०.७५% + १% लेबर सेस) असणे आवश्यक आहे. एकूण १.७७ घ. मी. करीता र. रु. २४६ (१.७७ (२५०.३७ – ११८.११ + ४.९०% जादा)) अदा केले आहे. सदर रक्कमेची वसुली करून पुर्तता दाखवावी.

३. सदर कामाची मापे दि. ६/३/१२ रोजी मोजमाप पुस्तकात नोंदवली आहेत. नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्थायी निर्देश क्र. ३७ दि. ३ जानेवारी २००६ मधील बाब क्र. १५ नुसार नगरपरिषदांमध्ये विकास कामाची मोजमापे एकदाच व शेवटी अभियंता यांनी घेऊ नयेत कारण झाकलेल्या मापाची खात्री होत नाही. स्थायी आदेशाचे पालन संबंधित अभियंता यांनी केलेले नाही.

**परिच्छेद क्र. ३० :– संगणक प्रशिक्षण खर्च व प्रोत्साहनात्मक अनुदान अदाईबाबत**.

नगरपालिका साताराचे सन २०११–१२ आस्थापना विभागाचे लेखा परीक्षण करीत असताना कर्मचाऱ्यांना संगणक प्रशिक्षण खर्च व प्रोत्साहनात्मक अनुदान अदाई करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१. सातारा नगरपरिषद त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी सन ९७–९८ व ९८–९९ या दरम्यान संगणक प्रशिक्षण खर्च व प्रोत्साहनात्मक अनुदान प्रती कर्मचारी रु.७,५००/– प्रमाणे अदा करण्यात आले आहेत. सदर कर्मचाऱ्यांपैकी ३७ कर्मचाऱ्यांनी अद्यापपर्यंत एम. एस. सी. आय. टी. परीक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत. शासन निर्णय क्र. प्रशिक्षण १००२/प्र. क्र. २६०/२००२/३९ दि. ३०/१०/२००२

नुसार एम. एस. सी. आय. टी. अथवा चाचणी परीक्षा अनुत्तीर्ण झाल्यास रक्कम वसूल करून जमा करण्याबाबत आदेश आहेत. तसेच शासन निर्णय क्र. मातंस/नस्ती ०४/२२४/३९ दि. २६ मे २००४ मधील क्र. २ नुसार ५० वर्षावरील ज्या कर्मचाऱ्यांना उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आली आहे. तथापी वरील दि. ३०/१०/२००२ शासन निर्णयाप्रमाणे परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही. त्यांचेकडून प्रोत्साहनपर रक्कम वसूल करणेचे आदेश आहेत. उपरोक्त दोन्ही शासन निर्णयाप्रमाणे ३७ कर्मचाऱ्यांबाबतीत नगरपरिषदेने वसूलीची कार्यवाही केलेली नाही.

२. सन ९६-९७-९८ लेखा परीक्षण अहवालामधील परि. क्र. ५८ नुसार नियमबाह्य संगणक प्रशिक्षण अदाईबाबत कार्यवाही करून वसूली करण्याबाबत सूचित केलेले आहे. अद्यापपर्यंत नगरपालिकेने पूर्णत: कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त उप. परि. क्र. १ व २ मध्ये नमूद केलेप्रमाणे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. १ मध्ये नमूद केलेल्या ३७ कर्मचाऱ्यांची रक्कम रुपये २,७७,५००/- वसूल करून नगरपालिका फंडात जमा करावी.

**परिच्छेद क्र. ३१ :- रजा रोखीकरणाची रक्कम जादा आदा केलेबाबत**.

न. प. सातारा कडील सन २०११/१२ चे लेखा परीक्षणात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्त वेतन व कुटुंब निवृत्ती वेतन नस्तीची तपासणी केली असता कमल यशवंत कोळी (झाडू कामगार) ह्या दि. ३१/८/२०११ रोजी सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांचे सेवापुस्तकातील रजा लेख्यांची तपासणी केली असता त्यांना निवृत्ती दिनांकाअखेर शिल्लक २३७ अर्जित रजेचे रजा रोखीकरणाची रक्कम आदा करणेत आलेली आहे. परंतु सेवा पुस्तकातील रजा लेखा पहाता खाली नमुद केलेल्या पंधरा दिवस परावर्तीत रजा उपभोगल्याची नोंद सेवा पुस्तकात घेणेत आलेली आहे. परंतु रजा लेख्यामध्ये सदर १५ दिवसाची रजा कमी करणेत आलेली नाही. तसेच निवृत्त दिनांकाअखेर त्यांच्या रजा लेखे खाती परावर्तीत रजा निरंक शिल्लक असलेची नोंद आहे. त्यामुळे त्यांना १५ दिवस रजा रोखीकरणाची रक्कम जादा झालेली आहे. ती खालील प्रमाणे -

| | |
|---|---|
| वेतन | ७००० ह्व १५ ÷ ३० = ३,५००/- |
| ग्रेड पे | १३०० ह्व १५ ÷ ३० = ६५०/- |
| महागाई भत्ता (५१%) | ४२३३ ह्व १५ ÷ ३० = २,११७/- |
| रजा रोखीकरण रक्कम जादा आदा रक्कम रु. | = ६,२६७/- |

रजा रोखीकरणाची वर नमुद केलेप्रमाणे जादा आदा रक्कम रुपये ६,२६७/- संबंधितांकडून वसुल करून भरणा केल्याची पुर्तता लेखा परीक्षणात दाखवावी.

वसूल पात्र रक्कम रुपये ६,२६७/-

पेन्शन विभाग, न. प. सातारा.

**परिच्छेद क्र. ३२ :- सेवा उपदानाची रक्कम जादा आदा केलेबाबत.**

नगरपरिषद साताराकडील सन २०११/१२ चे लेखा परीक्षणात सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची निवृत्त वेतन व कुटुंब निवृत्ती वेतन नस्तीची तपासणी केली असता श्रीमती हमिदा करीम शेख (कामाठी) यांना सेवा उपदानाची रक्कम जादा आदा केले आहे. ती खालीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| सेवा निवृत्तीचा दिनांक | ३०/०४/२०११ |
| सेवेत नियुक्ती दिनांक | १४/११/१९८३ |
| सेवा उपदानासाठी देय कालावधी | १६/०५/२७ वर्षे |

**सेवा उपदानाची परिगणना** -

शेवटचे मूळ वेतन + ग्रेड पे ह्व अर्हताकारी सेवेचा सहामाही कालावधी ÷ ४

| **दिलेला सेवा उपदान** | **देय सेवा उपदान** |
|---|---|
| ९८८० ह्व ५७ ÷ ४ = १,४०,७९०/- | ९८८० ह्व ५५ ÷ ४ = १,३५,८५०/- |

दिलेले सेवा उपदान रुपये १,४०,७९० (-) देय सेवा उपदान १,३५,८५० = जादा दिलेले सेवा उपदान रक्कम रुपये ४,९४०/-

जादा दिलेले सेवा उपदानाची रक्कम रुपये ४,९४०/- संबंधितांकडून वसुल करुन भरणा केल्याची पुर्तता दाखवावी.

पेन्शन विभाग, न. प. सातारा

**परिच्छेद क्र. ३३ :- सेवा उपदानाची रक्कम जादा आदा केलेबाबत.**

नगरपरिषद साताराकडील सन ११/१२ चे लेखा परीक्षणांत निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याची निवृत्ती वेतन व कुटुंब निवृत्ती वेतन नस्तीची तपासणी केली असता श्री. सुरेश लक्ष्मण कांबळे (आरोग्य बिगारी) हे सेवेत असताना दि. २२/१२/२०११ रोजी मृत्यू झाल्याने त्यांचे वारसाला मृत्यू नि सेवा उपदान आदा करताना रक्कम जादा आदा केली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| | सेवेत असताना मृत्यू दिनांक | २२/१२/२०११ |
| | सेवेत नियुक्ती दिनांक | ०१/०६/१९९० |
| | | २१/०६/२१ वर्षे |
| (-) | सेवेतील अनहर्तकाली सेवाकाल | ००/०१/०० |
| मृत्यू-नि-सेवा उपदानासाठी देय कालावधी | | २१/०५/२१ |
| | | दिवस/महिने/वर्षे |

**मृत्यू-नि-सेवा उपदानाची परिगणना - २० वर्षांपेक्षा जास्त सेवा झाल्याने**

शेवटचे मुळ वेतन + ग्रेड पे ह्न अर्हताकारी सेवेचा सहामाही कालावधी ÷ २

| **दिलेले मृत्यू-नि-सेवा उपदान** | **देय मृत्यू-नि-सेवा उपदान** |
|---|---|
| ८७०० ह्न ४५ ÷ २ = १,९५,७५०/- | ८७०० ह्न ४३ ÷ २ = १,८७,०५०/- |

दिलेले मृत्यू-नि-सेवा उपदान रुपये १,९५,७५० (-) देय मृत्यू-नि-सेवा उपदान रुपये १,८७,०५० = जादा दिलेले मृत्यू-नि-सेवा उपदान रुपये ८,७००/-.

मृत्यू-नि-सेवा उपदानाची जादा आदा रक्कम रुपये ८,७००/- संबंधितांकडून वसूल करुन भरणा केल्याची पुर्तता दाखवावी.

वसूल पात्र रक्कम रुपये ८,७००/-          पेन्शन विभाग, न. पा. सातारा

**परिच्छेद क्र. ३४ :– रजा रोखीकरणाची रक्कम जादा आदा केलेबाबत.**

नगर परिषद साताराकडील सन २०११/१२ चे लेखा परीक्षणात सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची निवृत्त वेतन व कुटुंब निवृत्ती वेतन नस्तीची तपासणी केली असता श्री. हणमंत आण्णा वायदंडे (झाडू कामगार) यांच्या सेवा पुस्तकातील रजा लेख्यांची तपासणी केली असता दि. २९/९/०६ ते ११/१०/०६ एकूण १३ दिवस अर्जित रजा उपभोगल्याची नोंद सेवा पुस्तकात घेतली आहे. परंतु रजा लेख्यामध्ये अर्जित रजा १३ दिवस कमी करणेत आलेली नाही. त्यामुळे त्यांना अंतिम रजेचे रोखीकरणाची रक्कम देताना १३ दिवसाची रक्कम जादा आदा झालेली आहे. ती खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| वेतन | ५९३० ह्व १३ ÷ ३० | = २,५७०/- |
| ग्रेड पे | १३०० ह्व १३ ÷ ३० | = ५६३/- |
| महागाई भत्ता (५१%) | ३६८७ ह्व १३ ÷ ३० | = १,५९८/- |
| रजा रोखीकरण जादा आदा रक्कम रुपये | | = ४,७३१/- |

रजा रोखीकरणाची वर नमूद केलेप्रमाणे जादा आदा रक्कम रुपये ४,७३१/- संबंधिताकडून वसुल करून भरणा केल्याची पुर्तता लेखा परीक्षणांस दाखवावी.

वसुलपात्र रक्कम रुपये ४,७३१/- पेन्शन विभाग, न. प. सातारा

**परिच्छेद क्र. ३५ :– सेवा उपदानाची रक्कम जादा आदा केलेबाबत.**

नगर परिषद साताराकडील सन २०११/१२ चे लेखा परीक्षणात निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची निवृत्ती वेतन व कुटुंब निवृत्ती वेतन नस्तीची तपासणी केली असता सौ. शालन शांताराम कांबळे (झाडू कामगार) यांना सेवा उपदानाची रक्कम जादा आदा केले बाबतीचा तपशिल खालील प्रमाणे –

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सेवा निवृत्त दिनांक | | ३१/०५/२०११ | |
| | सेवा नियुक्ती दिनांक | | ०१/०३/१९७९ | |
| | | = | ३०/०२/३२ | वर्षे |
| (–) | सेवेतील अनहर्तकारी सेवा काल | = | ११/०६/०१ | वर्षे |
| | सेवा उपदानासाठी देय कालावधी | = | १९/०८/३० | |
| | | | दिवस/महिने/वर्षे | |

सेवा उपदानाची परिगणना =

शेवटचे मुळ वेतन + ग्रेड पे ह्र अहर्ताकारी सेवेचा सहामाही कालावधी ÷ ४

| दिलेले सेवा उपदान | देय सेवा उपदान |
| --- | --- |
| ९८६० ह्र ६४ ÷ ४ = १,५५,२९५/- | ९८६० ह्र ६२ ÷ ४ = १,५२,८३०/- |

दिलेले सेवा उपदान रुपये १,५५,२९५ (-) देय सेवा उपदान १,५२,८३० = जादा दिलेले सेवा उपदान रक्कम रुपये २,४६५/-

सेवा उपदानाची जादा आदा रक्कम रुपये २,४६५/- संबंधितांकडून वसुल करुन भरणा केल्याची पुर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. ३६ :- चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना रेनकोट साहित्य पुरविणेबाबत.**

प्र. क्र. १०८४ दि. २१/१०/२०११ र. रु. २४,७२०/- मे. दिप गिफ्टस्

१. नगरपालिकेने सन २०११-१२ आर्थिक वर्षात चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना रेनकोट वाटप करण्यात आलेले आहे. सदर खर्चास स्थायी समिती ठराव क्र. २०२६ दि. २१/७/२०११ अन्वये पावसाळी रेनकोटसाठी सन २००९-१० या आर्थिक वर्षात मंजूर असणारे ठेकेदार यांच्याकडून मंजूर दराने खरेदी करून घेणेस मान्यता देण्यात आलेली आहे. सन २०११-१२ मध्ये रेनकोट खरेदी करताना सन २००९-१० मधील मंजूर दराने करणे आवश्यक होते. परंतु नगरपालिकेने सन २०११-१२ मध्ये रेनकोट खरेदी करताना प्रति नग ९५०/- प्रमाणे खरेदी करण्यात आलेली आहे. परंतु सन २००९-१० मध्ये दिप गिफ्टस यांचे रेनकोटचे मंजूर दर प्रति नग ७३८/- असा असताना प्रति नग ९५०/- दराने काय आधारे खरेदी केली याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे. मंजूर दरापेक्षा जादा दर २१२ ह्र २४ = ५,०८८/- संबंधीतांकडून वसूलात आणून नगरपालिका फंडात जमा करावी.

२. नगरपरिषदेस लागणाऱ्या रेनकोट शासनमान्य लघु उद्योजकाकडून का खरेदी करण्यात आल्या नाहीत याचा खुलासा लेखा परीक्षणास करण्यात यावा.

३. कर्मचाऱ्यांना दिलेल्या साहित्याचा विनियोग अहवाल उपलब्ध झाला नाही. तरी विनियोग अहवाल उपलब्ध करून द्यावा.

वरील आक्षेपांची पूर्तता होईपर्यंत र. रु. २४,७२०/- लेखा परीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ३७ :- प्रलंबित तसलमात व त्या संदर्भातील नोंदवहीबाबत.**

नगरपरिषद सातारा सन २०११-१२ लेखा परीक्षणा दरम्यान तसलमात (अग्रीम) रक्कमांच्या व्यवहाराबाबत पडताळणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. न. पा. प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निदेश क्र. ३५ मध्ये नमूद अ. क्र. ८ प्रमाणे फक्त निकडीच्या परिस्थितीत अग्रीम रक्कमा अटी शर्तीसह द्यावयाच्धया असून अन्य बाबी अ. क्र. ९ ते १४ या करीताच अग्रीम रक्कमा देता येतील असे असताना न. पा. ने वेळोवेळी अत्यावश्यक नसलेल्या बाबींकरीता देखील अग्रीम रक्कमा आदा केल्याचे तसलमात नोंदवही पाहता आढळले आहे. उदा. प्र. क्र. ९३१ दि. २३/९/११ रोजी रु.१५,०००/- पाणी गळती काढणेकरीता ठेकेदारास आदा केले आहेत. मात्र अद्याप समायोजन केले नाही.

२. कर्मचारी/मक्तेदार यांना दिलेल्या तसलमात रक्कमांचे त्या वर्षा अखेरीस खर्च रक्कमेप्रमाणे समायोजन तथा वसूली करणे आवश्यक आहे. स्थायी निदेश ३५ मधील अ. क्र. १५ अन्वये अग्रीम समायोजनाकरीता सर्वोच्च प्राधान्य देऊन त्याची जबाबदारी निश्चित करावी असे नमूद आहे. याबाबत अ. क्र. १७ व १९ प्रमाणे थकीत तसलमात सव्याज वसूल करणेबाबत निर्देश आहेत. अग्रीम रक्कमेच्या समायोजनाद्वारे वित्तीय शिस्त लागण्यासाठी अ. क्र. १८ मधील बाबींचे पालन करणे आवश्यक आहे. तथापि नगरपरिषदेने या बाबींचा अवलंब केल्याचे आढळले नाही.

३. आदा तसलमात रक्कम ही न. पा. ची येणे रक्कम असलेने मुदतीत समायोजन न झाल्यास अधिनियम १९६५ चे कलम ९६ नुसार न. पा. ची आर्थिक हानी समजण्यात यावी व त्यानुसार वसूलीसाठी सक्तीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक असताना न. पा. ने अशी कार्यवाही केल्याचे आढळले नाही. सोबत जोडलेले विवरणपत्र क्र.४ नुसार सन १९५१ पासून सन

२०११-१२ अखेर एकूण रु.१८,५३,४९१.७५ इतकी तसलमात रक्कम प्रलंबित आहे. हा एक प्रकारे न. प. निधीचा तात्पुरता अपहार आहे. सदर रक्कम वसूल न झाल्यास कायमस्वरुपी अपहार रक्कमेत रुपांतरीत होईल. याबाबीस संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करावी व इत:पर स्थायी निर्देशामध्ये नमूद बाबीं करीताच अत्यावश्यक असल्यासच तसलमात रक्कमा आदा करण्याबाबत दक्षता घ्यावी. अन्य नोंदीबाबत खालील प्रमाणे उदाहरणे आहेत.

४. तसलमात नोंदवही न. नं. १४७ पृष्ठ क्र. ४८ वरील नोंदीनुसासर दि. २४/१०/११ रोजी रु.५,०००/- व्ही. जे. मोहिते यांना निवडणूक कामी आदा तसलमात माहे मार्च २०१२ मध्ये समायोजित/ वसूल केल्याचे दर्शविले आहे. मात्र त्याबाबत प्रमाणक क्र. व दिनांक नमूद नाही. त्यामुळे रक्कम समायोजनाची खात्री होत नाही.

५. पृष्ठ क्र. ४४ दि. २६/९/०८ रोजी पी. एन. साठे रु.६,८६०/- व दि. २०/१०/०८ रोजी पी. एस. निकम रु.५,०००/- अग्रीम आदा केले बाबत नोंद आहे. मात्र कोणत्या बाबीकरीता आदा केले ते नमूद नाही व अद्याप समायोजन नाही.

६. पृष्ठ क्र. ४३ दि. १८/१०/२००४ रोजी शिवदास साखरे यांना रु.४,९६०/- वैद्यकीय तसलमात दिले आहे. अद्याप समायोजन नाही.

उपरोक्त १ ते ६ बाबत बाबनिहाय खुलाशासह पूर्तता सादर करावी.

**परिच्छेद क्र. ३८ :- कर्मचाऱ्यांचे भ. नि. नि. खातेवर शिल्लक रक्कमा कमी/जादा नोंदविलेबाबत**.

नगरपरिषद साताराकडील सन २०११/१२ चे लेखापरीक्षणात बृहतपत्रक व खाते नोंदवहीची तपासणी केली असता खाली नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांच्या खातेवर अखेर शिल्लकेपेक्षा कमी/जादा रक्कमा नोंदविणेत आलेल्या आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | गट क्रमांक | खाते क्रमांक | सन २०१०-११ ची अखेर शिल्लक | सन २०११/१२ ची घेतलेली सुरुवातीची शिल्लक रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीकांत ग. गोडसे | २ | २३ | ९९,४५० | १,००,७०२ |
| २ | रंजना अ. घडचिरे | ३ | ४६ | १६,१६८ | ११,१६८ |
| ३ | सलीम र. शेख | ३ | ६० | १०,२६४ | १०,४८० |
| ४ | अशोक ह. अडागळे | ५ | १३ | १०,९९० | ११,३८४ |
| ५ | राजेंद्र द. देशमाने | ५ | १६ | १७,२६६ | १७,४६६ |
| ६ | दिलीप बा. वायदंडे | ३ | ४३ | - | २०,२२५ |

वरील कमी /जादा घेतलेल्या शिल्लकांबाबत कर्मचाऱ्यांचे भ. नि. नि. खाते अद्यावत करून झालेल्या अनियमिततेबाबत साधार खुलासा करावा.

**परिच्छेद क्र. ३९ :- भविष्यनिर्वाह निधी अग्रीमाबाबत**.

नगरपरिषद साताराकडील सन २०११/१२ चे लेखा परीक्षणांत भ. नि. नि. खाते नोंदवहीची पडताळणी केली असता खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहेत.

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम ४ नुसार वर्षातून दोनदा सहा महिन्याचे कालावधीने रक्कमा आपले खात्यातून काढता येतात. तथापि खालील उदाहरणादाखल कर्मचाऱ्यांना वर्षातुन तीन वेळ खात्यातून अग्रीम दिले आहे. नियमबाह्यतेबाबत खुलासा करावा.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | गट क्रमांक | खाते क्रमांक | रक्कम रुपये | महिना |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. संतोष प्र. अवघडे | ४ | ६४ | १०,००० | मे २०११ |
| | | | | ८,००० | जुलै २०११ |
| | | | | २,००० | आक्टोबर २०११ |
| २ | श्री. राजीव मा. बडेकर | ४ | ६५ | ५,००० | जुन २०११ |
| | | | | ५,००० | नोव्हेंबर २०११ |
| | | | | ५,००० | फेब्रुवारी २०१२ |

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | गट क्रमांक | खाते क्रमांक | रक्कम रुपये | महिना |
|---|---|---|---|---|---|
| ३ | श्री. सुरेश र. गाडे | ४ | ६७ | ७,००० | जुन २०११ |
| | | | | ५,००० | आक्टोबर २०११ |
| | | | | ७,००० | नोव्हेंबर २०११ |
| ४ | श्री. शाम ना. वायदंडे | ४ | ४२ | ५,००० | जुलै २०११ |
| | | | | ५,००० | आक्टोबर २०११ |
| | | | | ३,००० | फेब्रुवारी २०१२ |
| ५ | श्री. तुकाराम गु.गायकवाड | ४ | १८ | ६,००० | एप्रिल २०११ |
| | | | | ५,००० | आक्टोबर २०११ |
| | | | | ६,००० | फेब्रुवारी २०१२ |

**परिच्छेद क्र. ४० :- जादा वेतन आदाईबाबत**.

नगरपरिषद साताराचे सन २०११/१२ चे लेखापरीक्षणात कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके व वेतन देयकांची तपासणी केली असता कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती चुकीची केलेमुळे खाली नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांना जादा वेतन आदाई झालेली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | देय वेतन | दिलेले वेतन | जादा आदा | जादा आदा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | अशोक शंकर वायदंडे | ६,३१० | ६,३२० | १० | १/२/०६ पासून |
| २ | विजय हनुमंत भोसले | ६,३१० | ६,३२० | १० | १/२/०६ पासून |
| ३ | चांगदेव बंडू कांबळे | ६,३१० | ६,३२० | १० | १/२/०६ पासून |
| ४ | शिवाजी मल्हारी माने | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |
| ५ | संदिप लक्ष्मण पाटसुते | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |
| ६ | जितेंद्र बजरंग चौधरी | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |
| ७ | प्रकाश मारुती घाडगे | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |
| ८ | सुर्यकांत प्रभाकर इंदापूरे | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |
| ९ | राम दादू लोखंडे | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | देय वेतन | दिलेले वेतन | जादा आदा | जादा आदा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १० | सतिश काळू कांबळे | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |
| ११ | शामराव भिमराव खरात | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |
| १२ | पोपट भैय्यासाहेब तारळेकर | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |
| १३ | राजेंद्र बाबुराव देडगे | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |
| १४ | किरण आप्पा गाडे | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |
| १५ | मुकुंद सदाशिव मराठे | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |
| १६ | अमोल विलास आष्टेकर | ६,२७० | ६,२८० | १० | १/७/०८ पासून |
| १७ | मिलिंद जगन्नाथ कांबळे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| १८ | गोपाळ यशवंत इंगवळे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| १९ | लियाकत उस्मान मुजावर | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| २० | सुनिल निवृत्ती कांबळे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| २१ | युसुफ इस्माईल शेख | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| २२ | अनिल रामचंद्र कांबळे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| २३ | रमेश हिरा वायदंडे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| २४ | मच्छिंद्र शंकर घडचिरे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| २५ | भिमराव मोहन खंडूझोडे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| २६ | मिलिंद रामचंद्र धडचिरे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| २७ | विलास आण्णा वायदंडे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| २८ | चंद्रकांत दिनकर वायदंडे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| २९ | रमेश शंकर वायदंडे | ५,८४० | ५,८५० | १० | १/७/०६ पासून |
| ३० | बाळू सखाराम रामुगडे | ५,९३० | ५,९४० | १० | १/७/०७ पासून |
| ३१ | पांडुरंग तुळशीराम चव्हाण | ५,९३० | ५,९४० | १० | १/७/०७ पासून |
| ३२ | शरद बाबुराव वाघमारे | ५,९३० | ५,९४० | १० | १/७/०७ पासून |
| ३३ | रामचंद्र राजाराम गायकवाड | ५,९३० | ५,९४० | १० | १/७/०७ पासून |
| ३४ | सतिश दादा कुचेकर | ५,९४० | ५,९५० | १० | १/७/०६ पासून |
| ३५ | जितेंद्र बाबू वाघमारे | ५,९४० | ५,९५० | १० | १/७/०६ पासून |

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | देय वेतन | दिलेले वेतन | जादा आदा | जादा आदा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ३६ | मंगल अशोक सारस | ५,९४० | ५,९५० | १० | १/७/०६ पासून |
| ३७ | सुलोचना उत्तम तुपे | ५,९४० | ५,९५० | १० | १/७/०६ पासून |
| ३८ | सारंगा अशोक कडाळे | ५,९४० | ५,९५० | १० | १/७/०६ पासून |
| ३९ | जनाबाई अशोक साठे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| ४० | आनंदी अरुण लाड | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| ४१ | कल्पना भिमा कांबळे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| ४२ | भारत आनंदा चौधरी | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| ४३ | सिंधू एकनाथ केसरे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| ४४ | सिमा सुलतान ढोणे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| ४५ | सुनिता अनिल किरपा | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| ४६ | निर्मला हरी कांबळे | ५,८४० | ५,८५० | १० | १/१/०६ पासून |
| ४७ | महंमद रफिक राजमहंमद | ७,८१० | ७,८३० | २० | १/७/११ पासून |

वरील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आक्षेपात नमुद केलेल्या दिनांकापासून जादा आदाई झालेली रक्कम परिगणित करून वसुल करून पुर्तता लेखा परीक्षणांस दाखवावी.

**परिच्छेद क्र. ४१ :- भांडार विभागाकडील शिल्लक साहित्याच्या विसंगतीबाबत.**

नगरपालिका सातारा भांडार विभागाकडील सन २०११-१२ या वित्तीय वर्षाकरीता साठा नोंदवहीतील आरंभीच्या शिल्लका या सन २०१०-११ च्या साठा नोंदवहीतील अखेरच्या शिल्लकेशी पडताळणी केली असता असे निदर्शनास आले की खालील नमूद केलेप्रमाणे वस्तूंचे शिल्लकातूनच परस्पर परिमाण कमी केलेने र. रु. २६,३४६/- चा गैरवापर झाला आहे. सदरची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | बाब | सन १०-११, अ. शिल्लक | ११-१२ सु. शि. | फरक | प्रति नग दर | फरक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बादली | ०२ | - | ०२ | १५०/- | ३००/- |
| २ | रेनकोट | ५५ | ४० | १५ | ७३८/- | ११,०७०/- |
| ३ | टू फॅल्प फाईल | २१७ | १०६ | १११ | १६/- | १,७७६/- |
| ४ | ए४ कागद रिम | १७० | ११० | ६० | २२०/- | १३,२००/- |
| | | | | | एकूण | २६,३४६/- |

२. सन २०११-१२ मध्ये २४ नगर रेनकोट खरेदी केले आहेत. त्यापैकी २२ नग रेनकोट वाटप केले आहेत. त्यामुळे शिल्लक २ नग असणे आवश्यक असताना प्रत्यक्षात शिल्लक निरंक दर्शविली आहे. त्यामुळे २ रेनकोटचा वाटप न करताच साठा कमी केलेने सदर रेनकोटचा गैरवापर झाला आहे. र.रु.१,९००/- वसूल करणे आवश्यक आहे.

३. कॉम्प्युटर कागदाची सन २०११/१२ ची सु. शिल्लक ७५ रिम आहे. दि. २८/५/११ ते १५/११/११ या कालावधीत एकूण ५ रिमचे वाटप केले आहे. त्यामुळे दिनांक १५/११/११ रोजी शिल्लक ७० रिम दाखविणे आवश्यक असताना ६० रिम दर्शविली आहे. त्यामुळे १० रिमचे वाटप न करताच साठा कमी केलेने सदर रिमचा गैरवापर झाला आहे. र. रु. २,२००/- वसूल करणे आवश्यक आहे.

४. गमबूटच्या संदर्भामध्ये सन ०९/१० साठा नोंदवही पहाता अ. शिल्लक ४१ नग दर्शविली आहे. सन १०/११ व सन ११/१२ या आर्थिक वर्षाच्या साठा नोंदवही पहाता सु. शिल्लक व अ. शिल्लक निरंक दर्शविली आहे. सन ११/१२ साठा नोंदवही पहाता सन ११/१२ मध्ये सु. शिल्लक निरंक दर्शविली आहे. खरेदी निरंक आहे. मात्र दि. १४/७/११ रोजी श्री. नितीन बाळू चौधरी यांना १ गम बूट वाटप केल्याची नोंद आहे. त्यामुळे उर्वरित ४० नगाबाबत खुलासा करावा. सदरच्या नगांची नोंद साठा नोंदवहीत शिलकेत नोंद नसल्याने सदर नगाचा गैरवापर झाला आहे. र. रु. ९,२००/- वसूल करून पूर्तता दाखवावी.

उपरोक्त प्रमाणे  उप परि. १ ते ४ प्रमाणे र. रु. ३९,६४६/- वसूल करून पुर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. ४२ : - रजा रोखीकरणाची रक्कम जादा आदा केलेबाबत.**

नगरपरिषद साताराकडील सन २०११/१२ चे लेखा परीक्षणांत निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची निवृत्ती वेतन व कुटुंब निवृत्ती वेतन नस्तीची तपासणी केली असता सौ. धोंडुबाई मोहन चौधरी (झाडू कामगार) ह्या दि. ३१/७/२०११ रोजी सेवा निवृत्त झाल्या आहेत. त्यांचे सेवापुस्तकातील रजा लेख्यांची तपासणी केली असता दि. ५/८/०९ ते दि. २४/८/०९ एकूण २० दिवस अर्जित रजा उपभोगल्याची सेवा पुस्तकात नोंद केलेली आहे. परंतु रजा लेख्यांमध्ये अर्जित रजा एकूण २० दिवसकमी करणेत आलेली नाही. त्यामुळे त्यांना अंतिम रजेचे रोखीकरणाची रक्कम देताना २० दिवसाची रक्कम जादा आदा झाली आहे. ती खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| वेतन | ८,४४० ह्न २० ÷ ३० = | ५,६२७/- |
| ग्रेड-पे | १,६०० ह्न २० ÷ ३० = | १,०६७/- |
| महागाई भत्ता (५१%) | ५,१२० ह्न २० ÷ ३० = | ३,४१३/- |
| रजा रोखीकरण जादा आदा रक्कम रुपये = | | १०,१०७/- |

रजा रोखीकरणाची वर नमुद केलेप्रमाणे रक्कम रुपये १०,१०७/- संबंधितांकडून वसुल करून भरणा केलेची पुर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

वसूल पात्र रक्कम रुपये १०,१०७/-                    पेन्शन विभाग, न. प. सातारा

**परिच्छेद क्र. ४३ :- वॉर्ड क्र. ७ सदरबझार पारशी अग्यारी ते भोसले घर रस्ता डांबरीकरण करणे.**

अंदाजपत्रकीय रक्कम : रु. ५,००,०००/-

प्र. मंजूरी : ठराव क्र. १७०४ दिनांक २९/३/२०११

तांत्रिक मंजूरी : मा. कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचे कडील तांत्रिक मंजूरी आदेश जा. क्र. /चिशा/ता.मां./८८५/११ दिनांक २९/४/२०११

ठेकेदाराचे नाव : मे. रजिया कन्स्ट्रक्शन, सातारा

कामाचे आदेश : जा. क्र. सानप/सा.बां./१०५ दिनांक १३/५/२०११

काम सुरू दिनांक : १३/५/२०११ काम पूर्ण दिनांक ५/११/२०११

कामाची मुदत : ६० दिवस

मोजमाप नोंदवही क्रमांक : ५४ पान क्र. ९७ ते ९९ मोजमाप तारीख - नमूद नाही.

करारपत्र : रक्कम रु. १,३००/- दि. ८/५/२०११

वजाती : सुरक्षा ठेव रु.२६,३४४/- आयकर रु. ५,२६९/-

कार्यकंत्राट कर रु. १०,५३८/- विमा रु. ५,२६९/-

प्रमाणक क्र. २६६७ दि. ३१/३/१२ र. रु. ४,७९,४६८/- प्रथम व अंतिम न. पा. निधी

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. खडी दबाई २८८ घ. मी. असून डांबरीकरण करताना २८८ घ. मी. ऐवजी ३३६/०० घ. मी. ची परिगणना करणेत आलेली आहे. सबब ४८ घ. मी. ची जादा आदाई (४८ ह्न १७९ ह्न ४.९९%) रुपये ९,०२१/- संबंधित जबाबदार इसमाकडून वसूलात आणावी.

२. पान ९७ बाब क्र. ३ ओपन ग्रेड कारपेटसाठी १ ह्न ५.४० ह्न १.७० = ९.१८ ऐवजी ९.८१ ची परिगणना केल्याने (.६३ ह्न१७०.२३ ह्न४.९९% = ११२) रु. ११२/- संबंधित जबाबदार इसमांकडून वसूल करून पुर्तता दाखवावी.

३. कामाची मुदत ६० दिवस असून काम विहीत मुदतीत पूर्ण न केल्याने दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. दंड वसुलीची कार्यवाही करून पुर्तता दाखवावी.

४. मोजमाप पुस्तकातील नोंदीमध्ये खाडाखोड झालेल्या नोंदी साक्षांकित केलेल्या नाहीत.

वसुलपात्र रक्कम उप परि. १ रु.९०२१/- + उप परि. २ रु.११२ /- = एकूण ९,१३३/-

बांधकाम विभाग, न. प. सातारा २०११/१२

**परिच्छेद क्र. ४४ :- वॉर्ड क्र. २१ पेठ रामाचा गोट तारळेकर चौक ते महाडिक घर ते कुरेशी घर अखेर रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकी रक्कम | : | रु. ४,९८,६५०/- |
| प्र. मंजूरी | : | ठराव क्रमांक २००७ दि. २१/७/२०११ |
| तांत्रिक मंजूरी | : | मा. कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचे कडील तांत्रिक मंजूरी आदेश जा.क्र./चिशा/ता.मां./१८४० दि. १६/८/२०११. |
| ठेकेदाराचे नाव | : | मे. पुनम कन्स्ट्रक्शन, सातारा. |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/साबां/११२१ दिनांक १७/१०/२०११ |
| काम सुरु दिनांक | : | १७/१०/२०११ काम पूर्ण दिनांक २१/११/२०११ |
| मोजमाप नोंदवही क्र. | : | ५३ पान क्र. १५३ ते १५६ मोजमाप तारीख २८/११/२०११ |
| लेखाशिर्ष | : | सदस्य वॉर्ड निधी. |
| करारपत्र | : | रक्कम रु. १,३००/- दिनांक २३/९/२०११ |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु.२७,९२०/- आयकर रु. ५,५८४/-<br>कार्यकंत्राट कर रु. ११,१६८/- विमा रु. ५,५८४/- |

प्रमाणक क्र. २४५२ दि. १६/३/२०१२ र. रु. ५,५८,४०५/- प्रथम व अंतिम

याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. उपरोक्त कामासाठी अनुक्रमे ३२, ३० व २५% जादा दराच्या निविदा प्राप्त असून २५% जादा दराची निविदा मे. पुनम कन्स्ट्रक्शन यांची आहे. सदर ठेकेदाराने दि. ७/९/२०११ रोजी १५% जादा दराने नगरपालिकेच्या विनंतीनुसार करणेची संमती दर्शविली आहे. सदर कामासाठी सन २०१०/११ ची दरसूची वापरणेत आली असून निविदा उघडलेनंतर विभाग प्रमुखांनी केलेल्या छाननीनुसार चालू दरसूची नुसार ४.९५% जादा असलेने सदरचे काम पुनम कन्स्ट्रक्शन यांना देणेबाबत शिफारस केलेली आहे.

वास्तविक चालू दरसूची १/१२/२०११ पासून पुढे परिणामकारक असून तत्पूर्वीच काम पुर्ण झालेले आहे. सबब सदरची छाननी करताना नियमांचे पालन केलेले नाही. त्यामुळे १०% पेक्षा जास्त वाढ असल्यास त्या त्या प्राधिकाऱ्याकडून मंजूरी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे ५% जादा अदाई रु.२७,९२०/- ले. प. स अमान्य करणेत येत असून सदरची रक्कम रु.२७,९२०/- संबंधितांकडून वसूलात आणावी.

२. देयकातील बाब क्र. १ नुसार खुदाईपासून माती व मऊ मुरुम १३२ घ. मी. निघालेला असून त्याची वहातूक करणेत आलेली आहे. तथापि बाब क्र. ७ नुसार मऊ मुरुम गोळा करणे व पसरविणेसाठी १० घ. मी. चे बिल आदा केलेले आहे. खुदाईमधून मऊ मुरुम उपलब्ध असताना १० घ. मी. मुरुमाची रक्कम आदा केलेली आहे. सदरची रक्कम ले. प. स अमान्य करणेत येत असून त्याची रक्कम १० घ. मी. ह्न २५१.८८ = २,५१९/- संबंधिताकडून वसूलात आणावी.

३. रॉयल्टीचा भरणा दि. २६/४/२०११ रोजी शासकीय कोषगारात केल्याचे चलन सोबत जोडलेले आहे. परंतु काम सुरु दि. २७/१०/११ रोजी करण्यात आलेले असून काम मंजूरीपूर्वी ६ महिने अगोदर रॉयल्टी भरणा केल्याने सदरचे साहित्य दुसऱ्या/वेगळ्या कामावर वापरल्याचे ले. प. चे मत आहे.

तरी मोजमाप पुस्तक क्र.५३ पान नं. १५५ नुसार स्वामित्वधनाची रक्कम २३८.३५ ह्न ७०.६८ = १६,८४७/- वसूलात आणावी.

वसूलपात्र रक्कम = उप परि. १ रु. २७,९२० + उप परि. २ रु.२,५१९ + उप परि. ३ रु. १६,८४७ = एकूण रु.४७,२८६/-

बांधकाम विभाग, न. प. सातारा २०११/१२

**परिच्छेद क्र. ४५ :- न. पा. वाहनांना स्पेअर पार्टस पुरविणे निविदेबाबत व पुनर्प्रत्ययी (Repeat Order) आदेशा बाबत.**

न. पा. सातारा सन २०११/२०१२ च्या लेखापरीक्षणात वाहन विभागाकडील वाहनांना स्पेअर पार्टस पुरविणे कामी मागविलेल्या निविदांची नस्ती तपासली असता त्यावर खालीलप्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहेत.

१.	न. पा. ने वाहनांना स्पेअर पार्टस पुरविणे कामासाठी सन २००९-२०१० मध्ये निविदा मागविल्या आहेत. सदर निविदा नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालील नमुद केलेप्रमाणे निविदाकारांनी दोन लिफाफा पद्धतीने निविदा सादर केल्या आहेत.

१.	मे. हिंदूस्तान मोटर्स, सातारा		२.	मे. न्यू इंडिया मोटर्स, सातारा

३.	मे. महाराष्ट्र ऑटोमोबाईल्स, सातारा

उपरोक्त निविदातील अटी व शर्ती क्र. १ प्रमाणे निविदाधारक यांचे नावे स्वतंत्र गॅरेज, त्याचा परवाना, वाहन स्पेअर पार्टस पुरविणेबाबत कंपनीचे अधिकृत विक्रेते असलेबाबत प्रमाणपत्र तसेच फर्म रजिस्टर्ड असणे बाबत पुरावा, वाहन दुरुस्ती करणेचा तीन वर्षाचा अनुभव असलेबाबत दाखला इ. कागदपत्रे निविदे सोबतच्या लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाची आहेत. महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस-१०८८/(२५१२)/उद्योग-६ मंत्रालय मुंबईच्या शासन निर्णयाप्रमाणे दोन लिफाफा पद्धतीच्या निविदा उघडताना प्रथम लिफाफा क्र. १ उघडून त्यातील आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली आहे काय याची खात्री करून कागदपत्रांची पुर्तता केली नसल्यास लिफाफा क्र. २ उघडण्यात येत नाही व निविदाकाराची निविदा रद्द समजण्यात येते. असे असताना न. पा. ने निविदेतील अटी व शर्तीत नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली नसतानाही लिफाफा क्र. २ उघडून मक्तेदाराची नेमणुक केली आहे. शासन आदेशाचे पालन न करता निविदा प्रक्रिया राबविली असल्याने सदर निविदा प्रक्रिया विधीग्राह्य झालेली नाही. ही बाब गंभीर स्वरुपाची अनियमितता असून त्यास शासनाचे क्षमापन घेऊन पुर्तता दाखवावी.

प्राप्त झालेल्या तीन निविदातील लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रे तपासली असता मे. महाराष्ट्र ऑटोमोबाईल्स यांनी दुकानाच्या नोंदणीचे (संस्थेची नोंदणी) प्रमाणपत्र सादर केले आहे. सदर प्रमाणपत्रात मे. महाराष्ट्र ऑटोमोबाईल्स हे दुचाकी स्पेअर पार्टस व ऑईल विक्री व्यवसायिक आहेत असे नमूद केले आहे. असे असताना न. पा. ने सदर निविदाकारांची निविदा रद्द करुन फेर निविदा मागविणे आवश्यक होते. तरी नगरपालिकेने अशी कार्यवाही केलेली नाही. ही बाब गंभीर स्वरुपाची अनियमितता असून त्यास शासनाचे क्षमापन घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

२. नगरपालिकेने सन २००९/२०१० करीता मे. हिंदुस्तान मोटर्स, सातारा यांचेबरोबर वाहनाचे स्पेअर पुरविणे बाबत करार केला असून सन २०१०/२०११ व २०११/२०१२ करताही मे. हिंदुस्तान मोटर्स यांनाच वाहनाचे स्पेअर्स पुरविणेचे काम दिले आहे. महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि. २/१/१९९२ सोबतचे परिशिष्ट ७ नुसार पुर्नप्रत्ययी आदेश (Repeat Orders) देताना ते मूळ आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या अवधीतच देण्यात यावे असे नमूद केले आहे. असे असताना न. पा. ने हिंदुस्तान मोटर्स यांना सन २०१०/२०११ व २०११/२०१२ करीता वाहनाचे स्पेअर्स पुरविणेचे कार्यादेश शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न करता दिलेबाबत खुलासा करून झालेल्या अनियमिततेस शासनाचे क्षमापन घेऊन पुर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. ४६ :- विना निविदा केलेल्या खरेदीबाबत.**

सन २०११/२०१२ करीता मे. हिंदुस्तान मोटर्स सातारा यांचेकडून सन २००९/२०१० च्या मंजूर निविदेप्रमाणे वाहनांचे स्पेअर्स पुरविणे व बसविणे साहित्य खरेदी केले आहे. सन २०११/२०१२ मध्ये खरेदी केलेले स्पेअर्स/वाहनाचे दुरुस्ती केलेल्या कामाचे दरसन २००९/१० च्या मंजूर दरपत्रकाबरोबर तपासले असता खालीलप्रमाणे खर्च हा मंजूर निविदेतील बाबी व्यतिरिक्त इतर बाबीवर केलेला आहे.

| अ.क्र. | बील क्रमांक/दिनांक | दुरुस्ती खर्च रक्कम | वाहन क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | ११९ १२/७/११ | ११,०१५ | एम एच ११ एफ ४९९९ |
| २ | १३९ २४/११/११ | ४,००० | एम एच ११ एफ ४९९९ |
| ३ | १४६ ३/१२/११ | ३१,५१० | एम एच ११ अे ५७६८ |
| ४ | १८५ १८/४/११ | २६,१८० | एम एच ११ जी ७०११ |
| ५ | १८६ १८/४/११ | | |
| ६ | १९६, ९/५/११ | ८६,७२० | एम एच ११ जी ७०११ |
| | १९८ | | |
| ७ | १९३ २४/४/११ | १०,२०० | एम एच ११ जी ७०११ |

| अ.क्र. | बील क्रमांक/दिनांक | दुरुस्ती खर्च रक्कम | वाहन क्रमांक |
|---|---|---|---|
| ८ | १९५ २४/४/११ | ९,०१३ | एम एच ११ जी ७०११ |
| ९ | ११० १३/६/११ | १,६०० | एम एच ११ जी ७०११ |
| १० | १४६ ३/१२/११ | ३१,५१० | एम एच ११ अे ५७६८ |
| ११ | १५४ २१/१/१२ | ३५,१७० | एम एच ११ एफ ४९९९ |
| १२ | १५५ २१/१/१२ | १२,०१५ | एम एच ११ एफ ४९९९ |
| १३ | १६६ १/२/१२ | ३६,९०० | एम एच ११ अे ५७२८ |
| १४ | १६७ १/२/१२ | १२,९४० | एम एच ११ अे ५७६८ |
| एकूण खर्च ३,०८,७७३/- | | | |

महाराष्ट्र शासन निर्णय दि. २/१/९२ नुसार साहित्य खरेदी करताना दरपत्रके मागविणे बंधनकारक असताना शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न करता उपरोक्त खर्च हा दरपत्रके न मागविता केलेला आहे. त्यामुळे नगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ घेता आला नाही. तरी उपरोक्तप्रमाणे नियमबाह्य खर्च रक्कम रुपये ३,०८,७७३/- ला शासनाचे क्षमापन घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

तसेच उपरोक्तप्रमाणे वाहनांना स्पेअर पुरविणे व बसविणे खर्चाची प्रमाणके तपासली असता, वाहन दुरुस्तीबाबत वाहन चालक यांचा अहवाल, सुपरवायझर यांचा रिपोर्ट, कामाचा आदेश, पुरवठादार यांची बीलाची मागणी ह्या क्रमाने तारखा असणे आवश्यक असताना त्यात तफावत दिसून येते. उदा. दिनांक ११/११/११ रोजी वाहन क्रमांक एम एच ११ अे ५७३८ चे चालक यांचा गाडी दुरुस्ती करणे बाबतचा रिपोर्ट व त्याच दिनांकास सुपरवायझर यांचा अहवाल आहे. असे असताना गाडी दुरुस्ती करणे आधीच दि. २९/१०/११ रोजी मे. हिंदुस्तान मोटर्स यांनी काम केलेबद्दलच्या बीलाची मागणी केली आहे. सदर कामाचा आदेश सानप/वावि/५६/दि. २/१२/१२ चा असून सदर कामाचे बील कामाचा आदेश देण्यापूर्वीचा म्हणजे दि. ३०/११/११ चे आहे. अशा प्रकारच्या विसंगती ह्या बहुतेक सर्वच बीलात आढळून आल्या आहेत. तरी याबाबत समर्पक खुलासा करून यापुढे आवश्यक दक्षता घेण्यात यावी.

**परिशिष्ट क्र. ४७ :– वाहन दुरुस्ती खर्चाबाबत.**

न. पा. साताराचे सन २०११/१२ च्या लेखापरीक्षणात वाहन विभागाने देखभाल व दुरुस्तीकरीता खर्च केला आहे. सदर खर्चाचे लेखापरीक्षण केले असता, न. पा. संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.३२ मधील अ. क्र. ३५ मध्ये नमूद केलेप्रमाणे जी वाहने मैल अंतर कमी देत असतील व ज्यांच्यावरील दुरुस्तीचा खर्च जादा आहे, अशी वाहने निर्लेखीत करावीत. तसेच अशा वाहनावर मोठ्या स्वरुपाची दुरुस्ती करणेकामी खर्च करण्यात येऊ नये असे शासन आदेश असताना न. पा. ने खालील नमूद वाहनाच्या दुरुस्तीवर वारंवार खर्च केल्याचे दिसून आले.

| अ. क्र. | वाहन क्रमांक | सन २०११/१२ मध्ये केलेला खर्च |
|---|---|---|
| १ | एम एच ११ जी ७००१ | रु.१,०५,३७३/– |
| २ | एम एच ११ जी ७००२ | रु.१,८१,८४१/– |
| ३ | एम एच ११ जी ७०११ | रु.१,३४,२३७/– |
| ४ | एम एच ११ अे बी ८००४ | रु.१,४६,२३४/– |

उपरोक्त वाहनांच्या इतिहास नोंदवह्यांचे लेखा परीक्षण केले असता उपरोक्त वाहनांवर सन २०१०/२०११ मध्येही देखभाल व दुरुस्तीसाठी खर्च करण्यात आलेला आहे. असे असतानाही नगरपालिकेने स्थायी निदेशाप्रमाणे कार्यवाही न करणेबाबत खुलासा करून स्थायी निदेशाप्रमाणे कार्यवाही करून पूर्तता दाखवावी.

२. वाहन विभागाने सन २०११/१२ मध्ये सर्व वाहनांकरीता नवीन स्पेअर पार्टस बसविणे कामी खर्च केला आहे. नवीन पार्टस बसवून काढलेले जुने पार्टस न. पा. कडे जमा करावयाचे आहेत. असे असताना जमा केलेल्या जुन्या पार्टची नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे जुने पार्टस संबंधित ठेकेदार यांनी न. पा. कडे जमा केले असलेबाबत खात्री करता आली नाही. तसेच लेखा परीक्षण कालावधी सन २०११/१२ मध्ये वाहनांच्या जुन्या पार्टसचा लिलाव केल्याचे दिसून आले नाही. तरी जुन्या पार्टस बाबत न. पा. ने काय कार्यवाही केली याबाबतचा खुलासा लेखा परीक्षणास सादर करावा. तसेच जुने पार्टसची

नोंदवही ठेवून अद्ययावत नोंदी घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी. न. पा. ने स्पेअर पार्टस संबंधित ठेकेदाराकडून जमा करून घेऊन सदर पार्टसची लिलावाने विक्री करून लिलावापोटी जमा होणारी रक्कम न. पा. कडे जमा करणे आवश्यक होते. तथापी अशी कार्यवाही न केल्यामुळे न. पा. चे आर्थिक नुकसान झाले आहे. तरी सदर नुकसानीची जबाबदारी संबंधितांवर निश्चित करून पूर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

३. वाहन विभागाकडील सर्व वाहनांच्या विमा पॉलिसीची मागणी अर्धसमास पत्र क्र. २ दिनांक १/ ११/२०१२ व अर्धसमास पत्र क्र. ७ दि. ३१/१२/२०१२ प्रमाणे करूनही लेखापरीक्षणास वाहनांच्या विमा पॉलिसी प्राप्त झाल्या नाहीत. त्यामुळे सर्व वाहनांचा विमा उतरविला असलेबाबत लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही. तरी विमा न उतरविल्यामुळे वाहनांचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधितावर निश्चित करून केलेली पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. ४८ :- शहरातील रस्ते, गटारे, नाले, ओढे व १ ते ३९ प्रभागातील सार्व. शौचालये, मुताऱ्या यांची दैनंदिन स्वच्छता व सफाई करणे.**

१. निविदा - दै. पुण्यनगरी दिनांक ४/६/२००८

२. मंजूरी - जन. कौ. ठराव क्र. ४३५ दि. २९/७/०८

३. अंदाजपत्रकीय तरतूद - रु.१०,००,०००/-

४. प्रत्यक्ष खर्च रुपये १८,८९,२००/-

याबाबत खालील अभिप्रायांची पुर्तता दाखवावी.

अ) उपरोक्त कामाबाबत सोबतच्या तक्त्याप्रमाणे मक्तेदारांना ठेका देणेत आलेला आहे. सदरच्या ठेकेदारांना २००८-०९ पासून वेळोवेळी मुदत वाढ देऊन ठेका देण्याबाबतचे प्रयोजन स्पष्ट करावे. तसेच राजवाडा परिसर, गुरुवार परज, सदरबझार इ. ठिकाणी ठेका देताना आरोग्य विभागाने प्राथमिक अंदाजीत खर्चाबाबत आढावा घेतलेला नाही.

ब) मक्तेदारांना रक्कम आदा करताना आरोग्य विभागाकडील टिप्पणीमध्ये दै. ग्रामोद्धार या वर्तमानपत्रात दि. ८/४/२०१० रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु त्यामध्ये अनुभवाचा दाखला नसलेने

फेरनिविदा मागविणेबाबत निर्णय झालेला आहे. परंतु तरी देखील पुढील दोन वर्षात निविदा मागविण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे केवळ मक्तेदारांना रकमा आदा करताना टिपणी सादर करून त्यावर कार्यवाही न करणे याबाबत खुलासा करावा. तसेच जुन्या मक्तेदारांना त्यांचा मक्ता नियमित चालु ठेवणेसाठी निविदा प्रक्रिया वेळीच केलेली नसलेबाबत लेखा परीक्षणाचे मत आहे. याबाबत साधार खुलासा करावा.

क) केदारबाजी कन्स्ट्रक्शन तर्फे सचिन शिवाजीराव राजेशिर्के यांना गुरुवार परज भागातील गटारे, नाले, ओढे सफाईबाबत ठेका देण्यात आलेला आहे. तथापि नस्तीचे अवलोकन करता कामाबाबत नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले नाही. पुर्तता दाखवावी.

ड) सदर कामासाठी मोघम तरतूद केल्याने अंदाजित रक्कमेपेक्षा जादा खर्च करणेत आलेला आहे. तरी याबाबत वास्तववादी तरतूद करणेची दक्षता घ्यावी.

वरील पुर्तता होणेचे अधिन राहून एकूण खर्च रक्कम रुपये १८,८९,२००/- आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु. १८,८९,२००/- सोबत परिशिष्ट क्र. २

आरोग्य विभाग, सातारा नगरपरिषद, २०११/१२

**परिच्छेद क्र. ४९ :- एम. एस. सी. आय. टी. परीक्षा उत्तीर्ण नसणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढी वसूलीबाबत**.

नगरपालिका साताराचे सन २०११/१२ आस्थापना विभागाचे लेखा परीक्षण करीत असताना सेवापुस्तक नोंदी पडताळणी दरम्यान अद्याप एम. एस. सी. आय. टी. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या नसतानाही काही कर्मचाऱ्यांच्या नियमित वेतनवाढी काढून त्याप्रमाणे वेतन अदा केले आहे.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. मांतम/नस्ती ०४/२२४/३९ दि. ५ मे २००७ अन्वये संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत दिनांक ३१ डिसेंबर २००७ पर्यंत वाढविण्यात आली होती. सदर शासन निर्णयाप्रमाणे ही अंतिम मुदतवाढ समजण्यात यावी असे स्पष्ट नमूद आहे. सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. ३ मध्ये नमूद केलेप्रमाणे ४४ कर्मचाऱ्यांची नावासमोर

नमूद तपशिलाप्रमाणे त्या त्या महिन्यापर्यंत वेतनवाढी अदा करण्यात आलेल्या आहेत. सदर अदा केलेल्या वेतनवाढी व त्यावरील भत्ते यासह रक्कम परिगणित करून संबंधित कर्मचाऱ्यांकडून वसूल करून नगरपालिका फंडात जमा करावे.

**परिच्छेद क्र. ५० :– आरोग्य विभागाकडील जंतुनाशके साठा विसंगती/तफावतीबाबत.**

जंतुनाशके खरेदी स्टोअर विभागाकडून केलेनंतर स्टोअर विभाग साठा नोंदवहीस नोंदवून आरोग्य विभागास देण्यात आलेली आहेत. तसेच आरोग्य विभागाने सदरची जंतुनाशके साठा नोंदवहीस नोंदवून आरोग्य निरीक्षक यांना आदा केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे गंभीर स्वरुपाच्या अनियमितता आढळल्या.

१. एस आर बी क्लीनर आरोग्य विभाग साठा नोंदवही पान ९२ वर दि. १९/७/२०११ रोजी १०० लि. शिल्लक असून सदर शिल्लक पुढील प्राप्त साहित्यात जमा घेतलेली नाही. तसेच १०० लि. चा विनियोग देखील नोंदलेला नाही. त्यामुळे १०० लि. चे निविदाकार यांचे दरानुसार (१०० लि ह्न १११) रु. ११,१००/– आरोग्य प्रमुख यांचेकडून वसुलात आणावेत व न. पा. फंडात जमा केल्याची कागदोपत्री पुर्तता दाखवावी.

२. फिनोलीन सुपरफोर्ट आरोग्य विभाग साठा नोंदवहीस दि. १९/७/२०११ रोजी १०० लि. शिल्लक असून दि. १५/०९/२०११ रोजी प्राप्त झालेल्या साठ्यात मागील १०० लि. ची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे १०० लि. चा विनियोग देखील नोंदलेला नाही. सबब (१०० लि ह्न १७१) रु.१७,१००/– आरोग्य प्रमुख यांचेकडून वसूल करून न. पा. फंडात रक्कम जमा करणेत आल्याची कागदोपत्री पूर्तता दाखवावी.

३. हार्बोस्प्रे डिलक्स आरोग्य विभाग साठा नोंदवहीस ३० लि. शिल्लक दिनांक २२/३/२०१२ अखेर असून त्याचा विनियोग सन २०१२/१२ या वित्तीय वर्षात झाल्याची खात्री पटवावी. तसेच हार्बोस्प्रे डिलक्स च्या गुरुवार परज–१ च्या नोंदी अपूर्ण असल्याने विनियोगाबाबत खात्री पटवावी.

४. एस आर बी क्लीनरच्या आरोग्य निरीक्षक यांचेकडील साठा नोंदवही दि. ३०/१२/२०११ पासून पुढील नोंदी नोंदलेल्या नाहीत. त्यामुळे प्राप्त जंतुनाशके, वापर/विनियोग यांच्या नोंदी घेतलेल्या

नाहीत. सबब गुरुवर परज-१ यांना वाटप केलेले व विनियोग केलेली जंतु नाशकांचा विनियोग पडताळता आला नाही.

५. सॅनिटोलीन लिक्वीड गुरुवार परज-१ चे आरोग्य निरीक्षकाकडील साठा नोंदवही दि.१५/१२/२०११ पासून अपूर्ण आहे.

६. गुरुवार परज १ आरोग्य निरीक्षक साठा नोंदवही फिनोलीन सुपर फोर्टचा विनियोग दिनांक ५/०२/२०१२ पासून अपूर्ण आहे. तसेच सॅनिटॉक्स कल्चर पावडर साठा १५/९/२०११ पासून अपूर्ण आहे. मलेरिया (पी) आईलचा विनियोग दि. १५/९/२०११ पासून अपूर्ण आहे.

७. गुरुवार परज-१ कडील आरोग्य निरीक्षक यांचा जंतुनाशकांचा साठा अपूर्ण असून याबाबत आरोग्य प्रमुख यांनी वेळोवेळी लेख्यांची तपासणी व निरीक्षण करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही न करण्याची कारणे द्यावीत. तसेच नियमित साठा न लिहिणेबाबत वरिष्ठांचे निदर्शनास सदर बाब वेळीच न आणण्याचा हेतु स्पष्ट करावा. सदर अनियमिततेबाबत संबंधितावर योग्य ती कार्यवाही केल्याची पुर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. ५१ :- शिवजयंती उत्सव साजरा करणेकरीता केलेल्या खर्चाबाबत**.

न. पा. सभा मंजूरी : ठराव क्र. ३३ दि. १३/२/२०१२

अंदाजित खर्चास मंजूरी : उप विभागीय अधि. क्र. नपा/सा/कावि-२/१२ दि.१५/३/१२

र. रु. ५,००,०००/-

प्रत्यक्ष केलेला खर्च पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | २३५५ | ६/३/१२ | ३६,००० | रथ/देखावे/बक्षीस मानधन |
| २ | २३५६ | ६/३/१२ | २४,९२० | फ्लेक्स बोर्ड लावणे - अथर्व |
| ३ | २३५७ | ६/३/१२ | ८,४०० | घोडे पुरविणे - राजेंद्र घोरगे |
| ४ | २३५८ | ६/३/१२ | ११,००० | झांजपथक - प्रशांत पोतेकर |

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशील |
|---|---|---|---|---|
| ५ | २३५९ | ६/३/१२ | ३४,९७५ | बॉक्स कमान, झेंडे, पताके, राजकमल मांडववाले |
| ६ | २३६० | ६/३/१२ | ३,५०० | शिंग, सनई – लक्ष्मण गुरव |
| ७ | २३६१ | ६/३/१२ | १५,००० | गौरवचिन्ह वाटप – यशकमल कॉम्प्युटर्स |
| ८ | २३६२ | ६/३/१२ | १,२३,३४४ | स्टेज, खुर्च्या – चंद्रकांत मंडप |
| एकूण २,५७,१९९ | | | | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. उप विभागीय अधिकारी यांचे मंजूरी आदेशात पुढीलप्रमाणे अटींचा उल्लेख आहे.

१) सदर कार्यक्रमाचा खर्च काटकसरीने करण्यात येऊन कमीत कमी रक्कम खर्च करण्यात यावी.

२) सदर खर्चाची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात यावी.

३) कार्यक्रमाचे खर्चाकामी आदा करण्यात आलेल्या रक्कमेचा तपशील या कार्यालयास सादर करण्यात यावा.

तथापि नगरपरिषदेने खर्चाचा अहवाल सादर केल्याचे आढळले नाही. त्यामुळे प्रत्यक्ष खर्च योग्य झाल्याबाबत मंजूरी नसल्याने नियमबाह्यता झाली आहे.

२. खर्च करावयाच्या बाबींचे दर मंजूर नसलेने ठराव क्र. ३३ अन्वये स्पॉट कोटेशन मागविण्याचा निर्णय घेतला गेला. मात्र शासनाने शिवजयंती दिनांक १९ फेब्रुवारी हा कित्येक वर्षापूर्वीच दरसालाकरीता निश्चित केला आहे व अंदाजपत्रकात रु.५,००,०००/– इतक्या रक्कमेची तरतूद आहे व खर्च होणाऱ्या बाबी स्वयंस्पष्ट व वर्षानुवर्षे आवर्ती आहेत. तर विहीत वेळेत वृत्तपत्रात विस्तृत प्रसिद्धीद्वारे निविदा एकत्रित अथवा बाबनिहाय का मागविल्या नाहीत? त्यामुळे नगरपालिका स्पर्धात्मक दर लाभास व दर्जेदार वस्तू तसेच सेवापुरवठ्यास मुकली आहे.

३.	निविदा स्थानिकरित्या कशाप्रमारे मागविल्या याचा तपशील सोबत नाही. प्रत्येक बाबनिहाय टिपणीमध्ये अधिनियम १९६५ चे कलम ९३ (६) अन्वये स्पॉट कोटेशन मागविणेचे नमूद केले आहे. मात्र सदर कलमात याकरीता सात दिवसांचा कालावधी आवश्यक आहे. तथापी टिपणीवरील दिनांक १४/२/२०१२ आहे. म्हणजेच चार दिवसांपेक्षा कमी कालावधीत मागणी केली आहे. सदर बाबीमुळे निविदा नियमांचे उल्लंघन झाले आहे.

४.	खर्च प्रमाणके पाहता अ. क्र. १ अन्वये प्रा. शाळा सुंदर चित्ररथ देखावा रु.६,०००/- व चित्ररथ भाडे रु.३०,०००/- आदा केलेचे नमूद आहे. मात्र बक्षीसपात्र शाळा व चित्ररथ पुरवठादार यांचा तपशील, उल्लेख नाही.

५.	काही बाबी तरतूद करून निव्वळ खर्च केल्याचे दिसून येते. उदा. खेळामधील प्राविण्याबाबत मुलींना ३० नग स्मृति चिन्ह रु.५००/- प्रमाणे रु.१५,०००/- यशकमल कॉम्प्युटर्स यांना आदा केले. मात्र सदर पुरवठादाराचे बील पाहता ते डी. टी. पी., सेमिनार रिपोर्ट, स्क्रीन, ऑफसेट इ. संगणकविषयक व मुद्रणाचे काम करतात. असे असता त्यांनी स्मृतिचिन्ह कोणत्या प्रकारे बनवून काय आधारे पुरविले याची खात्री होत नाही.

६.	अ. क्र. झांजपथक, घोडे इ. बाबत सेवा पुरवठा कालावधी नमूद नाही. बॉक्स, कमान, झेंडे यांचे आकार, लावणेचे स्थळ इ. तपशील नमूद नाही. स्टेज, खुर्च्या यांची संख्या प्रति तास प्रमाणे एकूण भाडे इ. तपशील नाही. त्यामुळे झालेला खर्च उपविभागीय अधिकारी यांचे निर्देशानुसार योग्य व मंजुरीच्या उद्दिष्टाप्रमाणेच झाल्याचे प्रमाणित होत नाही.

उपरोक्त १ ते ६ बाबत खुलाशासह पूर्तता सादर करावी. तोपर्यंत खर्च रक्कम रु.२,५७,१९९/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ५२ :- पाणी पुरवठा व अग्नीशमन व्यवस्थापनाबाबत**.

नगरपालिका क्षेत्रात मागणीप्रमाणे पाणीपुरवठा करणेकरीता पाणी टँकर ट्रॉली तसेच अग्नीशमन वाहनांचा वापर करण्यात येतो. लेखापरीक्षण कालावधीत खालीलप्रमाणे वाहने पाणीपुरवठा करणेकरीता वापरण्यात आली होती.

| अ. क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | पाणीपुरवठा करणे करीता सन २०११/१२ मध्ये केलेल्या खेपा |
|---|---|---|---|
| १ | एम एच ११ जी २०२२ | पाणी वाटप ट्रॅक्टर | ३३८३ खेपा |
| २ | एम एच ११ एबी ८००४ | अग्नीशमन वाहन | ३८४१ खेपा |
| ३ | एम एच ११ जी ७०११ | अग्नीशमन वाहन | १०९४ खेपा |

उपरोक्त वाहनांची लॉगबुक तपासली असता सन २०११/१२ मध्ये वर नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक वाहनाने पाणी पुरवठा करणेकामी खेपा केल्या आहेत. नगरपालिकेने न. पा. हद्दीमध्ये पाणी पुरवठा करणेकामी अग्नीशमन वाहनास प्रतिखेप रु.१५०/- व ट्रॅक्टरसाठी रु.१६०/- तसेच न. पा. हद्दीबाहेर अग्नीशमन वाहनास रु.३००/- व ट्रॅक्टरसाठी रु.३१०/- असे दर निश्चित केले आहेत.

सन २०११/२०१२ मध्ये उपरोक्त पाणीपुरवठा वाहनाद्वारे केलेल्या पाणी पुरवठ्यातून ट्रॅक्टरने पाणी वाटपापोटी र. रु. ८५,२७०/- व अग्नीशमन वाहनांनी पाणी वाटपापोटी रु.१७,५६०/- असे एकूण र. रु. १,०२,८३०/- न. पा. कडे जमा झाले आहेत. उपरोक्त नमूद केलेल्या तक्त्यातील वाहनांच्या लॉंगबुकावरून पृष्ठनिहाय बेरीज करून प्रत्येक वाहनांनी पाणीपुरवठा करणेकामी केलेल्या खेपांची संख्या वर नमुद केली आहे.

वरील तक्त्यात नमुद केलेल्या वाहनांच्या खेपा व त्यापोटी जमा झालेली पाणीपुरवठ्याची रक्कम यात तफावत असल्याचे दिसून येते. यामुळे नगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. तरी पाणीपुरवठा करणेकरीता केलेल्या प्रत्यक्ष खेपा व जमा झालेली रक्कम यांचा मेळ घेऊन कमी जमा रकमेची संबंधितावर जबाबदारी निश्चित करावी व कमी जमा रक्कम वसूलात आणून पूर्तता दाखवावी.

## मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० चे

## कलम ९(क) खालील आक्षेप

**-- निरंक --**

## मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम १९३० चे

## कलम ९(ड) खालील आक्षेप

**परिच्छेद क्र. ५३ :- करातील वाढ व घट नोंदवहीबाबत.**

नगरपालिका साताराचे सन २००१-१२ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण कालावधीत नगरपालिकेने महाराष्ट्र नगरपरिषद/नागरी औद्योगिक अधिनियम १९६५चे कलम १२३ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही कारणाने मागणीमध्ये झालेल्या प्रत्येक बदल महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ चे नियम ७५ (७) अन्वये विहित नमुना क्रमांक ४६ प्रमाणे ठेवलेल्या वाढ किंवा घट दर्शविणाऱ्या नोंदवहीत नमूद करणे आवश्यक असताना तशी नोंदवही संकलीत कर विभागाने ठेवलेली नाही. त्यामुळे सन २०११-१२ या कालावधीत वाढ किंवा घट किती झाली याची लेखा परीक्षणास पडताळणी करता आली नाही. याबाबत खुलासा करून आता नोंदवही ठेवून अद्यावत करून लेखापरीक्षणास दाखवून पुर्तता करावी.

**परिच्छेद क्र. ५४ :- नळ जोडणी गणना करणेबाबत.**

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ मधील नियम ९३ नुसार जलदाय व्यवस्थापन अभियंत्याने कुठलीही नळ जोडणी पाणीपट्टी आकारातून सुटली नाही हे पाहण्यासाठी नळ जोडणीची वर्षातून किमान एकदा मोजणी करणे आवश्यक आहे. तथापी तशी कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे अनधिकृत नळ जोडणी संख्या व नगरपरिषदेने करावयाची दंडात्मक कार्यवाहीचा तपशिल लेखा परीक्षणास उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे उपरोक्त नियमातील तरतुदीनुसारी नळ जोडणीची मोजणी करून अनधिकृत नळ कनेक्शन नसल्याची खात्री पटवावी व अनाधिकृत नळ कनेक्शन आढळलेल्या नळ कनेक्शन धारकांवर दंडात्मक कार्यवाही करून पुर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. ५५ :- मुद्रांक लेखा नोंदवहीबाबत.**

न. पा. साताराकडील मुद्रांक लेखा सन २०११/१२ करीता तपासणी केली असता महाराष्ट्र लेखा संहिता १९७३ मधील नियम १४३ नुसार -

१. तिकीटांची खरेदी व त्याचा वापर यांचा हिशेब नमुना क्र. ११३ प्रमाणे ठेवला पाहिजे. प्रत्येक आठवड्याच्या शेवटी हाती शिल्लक राहिलेल्या प्रत्येक किंमतीच्या तिकीटांचा तपशिल 'अभिप्राय' स्तंभात दर्शविला पाहिजे.

२. हाती शिल्लक उरलेली तिकीटे, प्राधिकृत अधिकाऱ्याने महिन्यातून एकदा पडताळून पाहिली पाहिजे व त्यांनी स्वाक्षरीनिशी अशा पडताळणीची नोंद पुस्तकात केली पाहिजे. असे असताना उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही का केली नाही. उपरोक्त नियमानुसार कार्यवाही करून पुर्तता सादर करावी.

**परिच्छेद क्र. ५६ :– अंध/अपंग कल्याणकारी योजनेवर खर्च न केलेबाबत**.

१. शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०९०/प्र. क्र. १४६/२०१०/नवि–६ दि. ३० ऑक्टोबर २०१० नुसार मागील वर्षाच्या महसुली उत्पन्नावर ३% खर्च करणे बंधनकारक आहे. सन २०१०/११ चे महसूली उत्पन्न रुपये ३३,३१,४४,५८५/– वर ३% प्रमाणे रुपये ९९,९४,३३८/– अंध/अपंग कल्याणकारी योजनेवर खर्च होणे आवश्यक होते. तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.

२. सदर बाबीवर अंदाजपत्रकीय तरतूद रु. १०,००,०००/– असून तसेच याबाबत शासनाचे आदेश असताना खर्च न केलेमुळे सदर घटकास लाभापासून वंचित राहावे लागलेबाबत ले. प. ची धारणा आहे. याबाबत समर्थनीय खुलासा करावा.

**परिच्छेद क्र. ५७ :– छपाई खर्चातील अनियमितताबाबत**.

प्र. क्र. ९०४ दि. २३/९/२०११ र. रु. ७६,११५/– कोहिनूर प्रिंटींग प्रेस.

१. नगरपालिकेने सन २०११/१२ या आर्थिक वर्षात छपाई करून घेतलेली आहे. २०० पानी टपाल वह्या १० नग छापून घेण्यात आलेल्या आहेत. सदर टपाल वह्याचा मंजूर दर ६७/– असताना नगरपालिकेने सन २०११/१२ मध्ये २०० पानी टपाल वह्या खरेदी करताना प्रति नगर ९९/– दर अदा केला आहे. तरी जादा अदा दर ३२ ह्न १० नग = ३२०/– संबंधितांकडून वसूलात आणून नगरपालिका फंडात जमा करावे.

२. नगरपालिका समिती सभापती व नगराध्यक्ष लेटर पॅड एकूण ४५ नग प्राप्त होणे आवश्यक असताना नगरपालिकेस प्रत्यक्षात ३५ नग लेटर पॅड प्राप्त झाले आहेत. तरी कमी प्राप्त १० नग लेटर पॅडची रक्कम रुपये १,७१०/- संबंधितांकडून वसूलात आणून नगरपालिका फंडात जमा करावी.

उपरोक्त उप. परि. क्र. १ व २ मधील रक्कम रुपये २,०४०/- संबंधितांकडून वसूलात आणून नगरपालिका फंडात जमा करावी.

**परिच्छेद क्र. ५८ :- संगणकीकरणाद्वारे कर जमा होत असता पावतीपुस्तके दिल्याबाबत.**

सातारा नगरपरिषदेने सन २०११/१२ मध्ये जमा रक्कमांबाबत माहे सप्टेंबर २०११ ते नोव्हेंबर २०११ या दरम्यान पावतीपुस्तकांचा वापर पूर्णत: बंद करून संगणकीकरणाद्वारे रक्कमा स्विकारण्याची पद्धत सुरु केली आहे. तथापी त्यानंतर देखील मिळकत कर वसुलीसाठी काही प्रभागांना छापीत पुस्तके खालीलप्रमाणे दिली असल्याचे पुस्तके साठा नोंदवही न. नं.) १ वरील नोंदीप्रमाणे दिसून येते.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | पुस्तकातील पावती क्रमांक | पुस्तक दिलेचा दिनांक | परत केलेचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | नमूद नाही. | १३३३०१/१३४०० | १०/२/२०१२ | ----- | जे. डी. गवळी यांना दिलेचे नमूद आहे. |
| २ | सदरबझार | १३४०१/१३५०० | १६/२/२०१२ | ----- | ----- |
| ३ | कॅम्प ऑफीस | १३५०१/१३६०० | १७/२/२०१२ | ----- | ----- |
| ४ | यादोगोपाळ पेठ | १३६०१/१३७०० | १७/२/२०१२ | ३१/३/२०१२ | रद्द केल्या असे नमूद आहे. |
| ५ | गोडोली - २ | १३७०१/१३८०० | १७/२/२०१२ | ----- | ----- |
| ६ | सदरबझार | १३८०१/१३९०० | २७/२/२०१२ | ----- | ----- |
| ७ | सदरबझार | १३९०१/१४००० | ९/३/२०१२ | ----- | ----- |
| ८ | सदरबझार | १४००१/१४१०० | २७/३/२०१२ | ----- | ----- |
| ९ | सदरबझझर | १४१०१/१४२०० | ३१/३/२०१२ | ----- | ----- |

यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. नगरपरिषदेने मिळकत कराच्या रक्कमा माहे नोव्हेंबर २०११ अखेर संपूर्ण शहरात संगणकाद्वारे स्विकारण्याची पद्धत अवलंबिली असताना काही प्रभागात वरीलप्रमाणे माहे फेब्रुवारी व मार्च २०१२ म्हणजे वर्षाअखेरीस छापील पावतीपुस्तके वसुलीसाठी देण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

२. उपरोक्त अ. क्र. १ अन्वये पा. क्र. १३३०१ ते १३४०० हे पुस्तक प्रभाग नमूद न करता जे. डी. गवळी यांना दिलेचे नमूद आहे. ते कोणत्या प्रभागासाठी दिले हे नमूद न करता दिल्याने त्याचा वापर योग्य होत असल्याबाबत पूर्तता सादर करावी.

३. खाली नमूद प्रभागांमध्ये संपूर्णत: संगणकाद्वारे कर वसूल केला जात असताना फक्त पुढील मिळकतींचा कर छापील पावत्यांद्वारे वसूल केला आहे.

| अ.क्र. | प्रभाग | पावती क्र./दिनांक | मिळकत क्रमांक | नाव | वसूल र.रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | करंजे १ | १२७५२/२-११-११ | ४२९ | रामचंद्र य. मोहिते | २०,००० | एकत्रित कर |
| २ | रविवार | १२७७७/१-२-१२ | ९०/९१ | शाहू शिक्षण संस्था | १,५०० | पाणी कर |
| ३ | रविवार | १२७७८/६-२-१२ | १४७/७ | चंद्रशेखर क्षीरसागर | १,५०० | पाणी कर |
| ४ | मंगळवार १ | १२७७९/१४-२-१२ | ३२३ | मिलिंद कुलकर्णी | १,५०० | पाणी कर |
| ५ | चिमणपुरा | १२७८२/२२-२-१२ | ५७ | सतीश घोरपडे | १,५०० | पाणी कर |
| ६ | करंजे-२ | १२७९७/३१-३-१२ | २८८/२८९ | सुधीर घारगे | ९,५८० | एकत्रित कर |
| ७ | करंजे-२ | १२७९८/३१-३-१२ | २८८/२८९ | सुधीर घारगे | ९,५८० | एकत्रित कर |
| ८ | करंजे-२ | १२७९९/३१-३-१२ | २८८/२८९ | सुधीर घारगे | ९,५८० | एकत्रित कर |
| ९ | शुक्रवार | १२७८४/३१-३-१२ | २४ क | संजय गुजर | ९,५८० | एकत्रित कर |

उपरोक्त प्रभागातील इतर मिळकतधारकांना करांच्या रक्कमा संगणकाद्वारे वसूल केल्या असताना अ. क्र. १ ते ९ बाबत छापील पावत्याद्वारे वसूल करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

उपरोक्त १ ते ३ बाबत खुलाशासह पूर्तता सादर करावी.

**परिच्छेद क्र. ५९ :- वॉर्ड क्र. १७ मध्ये सिमेंटच्या कुंड्या शोभिवंत रोपासहित खरेदी करणे**.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु.१,५२,०००/- |
| प्र. मंजूरी | : | ठराव क्र. १७७६ दिनांक ११/५/२००१ |
| तांत्रिक मंजूरी | : | मा. कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचे कडील तांत्रिक मंजूरी आदेश जा. क्र./चिशा/तां.मां./१३८४ दिनांक २४/६/२०११ |
| ठेकेदाराचे नाव | : | श्री. अमोल हेमंत गिरीगोसावी |
| कामाचे आदेश | : | जा.क्र.सानप/सा.बां.-५६/ दिनांक ९/९/२०११ |
| काम सुरु दिनांक | : | ३/१०/०११ काम पूर्ण दिनांक : ८/१०/०१२ |
| मोजमाप नोंदवही क्र. | : | ५१ पान क्र. १६८ |
| करारपत्र | : | र. रु. ५००/- दिनांक ९/८/२०११ |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु. ८,००५/- आयकर रु.१,६०१/-<br>कार्यकंत्राट कर रु.६,४०४/- विमा रु. १,६०१/- |

प्रमाणक क्र. ११४२ दि. २१/१०/११ र.रु.१,६२,२६९/- प्रथम व अंतिम

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

१. मक्तेदारांकडून प्राप्त झालेल्या निविदांमध्ये निविदा क्र. २ श्री. योगेश अशोक गोसावी यांच्या निविदेसोबत पॅनकार्डची प्रत जोडलेली नाही. सबब सदरची निविदा स्विकारणेबाबत खुलासा करावा. तसेच फेरनिविदा न मागविणेबाबत खुलासा करावा.

२. शोभिवंत रोपासहित सिमेंट कुंड्या नग ५० ची नोंद मोजमाप पुस्तकात नमूद असून सदरच्या कुंड्या वॉर्ड क्र. १७ मध्ये कोठे वापरात आणल्या याबाबतचा तपशील नोंद करून साठा नोंदवहीस नोंद केलेची पूर्तता दाखवावी.

३. ४' ह्व ३' सिमेंट कुंडी शोभिवंत झाडासह पुरविणेबाबत बाजारदराने अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. बाजारदराने सदरचे मूल्य काय आधारे ठरविण्यात आले याबाबत खुलासा करावा. केवळ साधी ३ कोटेशन घेऊन मार्केट दर ठरविण्यापूर्वी याबाबत जिल्हा दरसूचीमध्ये दर नसलेची खात्री केली किंवा कसे याबाबत खुलासा करावा.

नस्तीसोबत जोडलेल्या फोटोवरून सदरच्या कुंडीची प्रती नग किंमत रु.३,०५०/- ही वास्तववादी वाटत नाही, अशी ले. प. ची धारणा आहे.

४. मोजमाप पुस्तकात मोजमाप दिनांक नमूद नाही. त्यामुळे काम वेळीच व मुदतीत पूर्ण केलेबाबत खात्री करता आली नाही.

**परिच्छेद क्र. ६० :- निविदा फॉर्म विक्रीबाबत**.

नगरपालिका सातारा सन २०११/१२ मध्ये विविध विभागासाठी टेंडर फॉर्म विक्री करून रक्कम नगरपालिका निधीत जमा केली आहे. याबाबत पुढील अभिप्रायांची पुर्तता करावी.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चा नियम १५० (१) नुसार निविदा विक्रीबाबतची नोंदवही नमुना १११ मध्ये ठेवणे आवश्यक आहे. त्याबाबत नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे लेखा परीक्षण वर्षात नगरपरिषदेने किती निविदा फॉर्म छापले त्यापैकी किती विक्री करण्यात आले तसेच लेखा परीक्षण कालावधी अखेर किती फॉर्म शिल्लक राहिले याबाबतची पडताळणी नोंदवही अभावी करता आली नाही. तसेच निविदा विक्रीची किंमत शासन निर्णय क्रमांक भाखंस/१०८८/२५१२/उद्योग ९ दिनांक २/१/१९९२ मधील तरतुदी आकारण्यात आल्याविषयी खात्री करता आली नाही. तरी उपरोक्त शासन निर्णयानुसार कार्यवाही करून पूर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. ६१ :- छ. शाहू कला मंदीर येथे अंतर्गत रस्ते करणे, पत्रा बदलणे, उद्यान विकसित करणे इ. कामे करणे.**

| | | | |
|---|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | : | रु.३३,००,०००/- | |
| प्र. मंजूरी | : | ठराव क्र.११६६ | दिनांक ६/४/०११ |

| | | |
|---|---|---|
| तांत्रिक मंजूरी | : | मा. कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा. बांधकाम विभाग, सातारा यांचे कडील मंजूरी आदेश जा.क्र./चिशा/ता.मां/९५७/११ दिनांक ३/५/२०११ |
| ठेकेदाराचे नाव | : | मे. बालाजी कन्स्ट्रक्शन, पुणे |
| कामाचे आदेश | : | जा. क्र. सानप/साबां/४६१७ दि. ५/९/२०११ |
| काम सुरु दिनांक | : | ५/९/२०११ काम पूर्ण दिनांक - अपूर्ण |
| मोजमाप नोंदवही | : | क्र. ४९ पान क्र. ७७ ते ७९ |
| लेखाशिर्ष | : | वैशिष्ट्यपूर्ण योजना अनुदान. |
| करारपत्र | : | रक्कम रु. ८,५००/- दिनांक २६/७/११ |
| वजाती | : | सुरक्षा ठेव रु. ९३,८८८/- आयकर रु.१८,७७०/- कार्यकंत्राट कर रु.३७,५३९/- विमा रु. १८,७७०/- रॉयल्टी रु. २८,९०५/- |

प्रमाणक क्र. २४०७ दि.१२/३/२०१२ र.रु.१८,७६,९५७/- पहिले रनिंग बील

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. उपरोक्त कामांसाठी करारनाम्यातील अटी/शर्तीनुसार मुदत १२० दिवसांची होती. कामाचे आदेश ५/९/२०११ रोजी देण्यात आलेले आहेत. सदरचे काम ४/१/२०१२ पर्यंत होणे अभिप्रेत होते. तथापि सदरचे काम वेळीच पूर्ण झालेले नाही. तसेच मुदतवाढीसाठी मक्तेदाराने अर्ज दिलेला नाही. सबब लेखापरीक्षण कालावधीनंतरही दि. २९/६/१२ रोजी संबंधित ठेकेदारास गार्डन विकसित करण्याचे कामास अद्याप सुरुवात न केलेबाबत नोटीस दिलेली आहे. त्यामुळे स्थायी निर्देश क्र. ३६ दि.२९/१२/०५ मधील परिशिष्ट क्र. 'क' मधील मुद्दा क्र. ९ नुसार निविदेत दंडाचा उल्लेख करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

२. नगर विकास विभाग शा. नि. क्र. संकीर्ण २००८/१३३८/प्र. क्र. १७१/०८/नवि २० दिनांक २ मार्च २००९ अन्वये नगरपालिकांनी त्यांच्यातर्फे राबविण्यात येणाऱ्या विकासकामांची गुणवत्ता/दर्जा तपासणीसाठी त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करून घेणे अनिवार्य असलेने संबंधित संस्थेने मा. प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन सातारा यांचेकडे रु.१३,२००/- ऑडीट फी भरलेली आहे. तथापि अद्याप सदर कामाचे तांत्रिक लेखापरीक्षण झालेले नाही. काम चालू असताना अथवा प्रगतीपथावर असताना तांत्रिक लेखापरीक्षणाची कार्यवाही झालेली नाही.

३. सदर कामाच्या गुणवत्तेबाबत गुणनियंत्रक यांचेकडील चाचणी अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही. गुणनियंत्रक यांचेकडील चाचणी अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

**परिच्छेद क्र. ६२ :- विकासकामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करून घेणेबाबत**.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २००८/१३३८/प्र. क्र. १७१/ ०८/नवि-२० दि. २ मार्च २००९ अन्वये विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करून घेणे अनिवार्य असून नगरपरिषदेने याबाबत खालील कामांचे तांत्रिक लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षण फी कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन सातारा यांचेकडे भरलेले आहेत. तथापि सदर संस्थेने अद्याप तांत्रिक लेखापरीक्षण केलेले नाही. तरी मा. प्राचार्य, के. बी. पी. इंजिनिअरिंग कॉलेज, सातारा यांचेकडे लेखापरीक्षणासाठी पाठपुरावा करून तांत्रिक लेखापरीक्षण करून घेऊन त्यातील उणिवांची पुर्तता करण्यात यावी अन्यथा तांत्रिक लेखापरीक्षणापोटी भरलेल्या रक्कमेची मागणी करून दुसऱ्या सक्षम संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करून पुर्तता दाखवावी.

खालील कामांसाठी तांत्रिक लेखापरीक्षण फी भरणा करणेत आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | भरणा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सोनगाव कचरा डेपो येथे संरक्षक भिंत, रस्ता विकसित व गेट करणे. | ६९,१२८ | तांत्रिक ले.प.होणे बाकी |
| २ | आ. क्र. ७५ सि.स.नं.२७१, २७२ पेठ भवानी शॉपिंग सेंटर, वहातूक कार्यालय. | ५२,४७४ | तांत्रिक ले.प.होणे बाकी |

| अ.क्र. | कामाचे नाव | भरणा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ३. | शाहू कला मंदीर, पार्किंग, रस्ते व पत्रा बदलणे. | १३,२०० | तांत्रिक ले.प.होणे बाकी |
| ४. | पोवई नाका ते जरंडेश्वर नाका अखरे रस्ता डांबरीकरण करणे. | ५७,४०८ | तांत्रिक ले.प.होणे बाकी |
| ५. | आ. क्र. ३५ अ ब क येथे शॉपिंग सेंटर बांधणे. | २२,९५० | तांत्रिक ले.प.होणे बाकी |
| ६. | सि. स. नं. २७३ आ. क्र. ५३ प्रा. शाळा, खेळाचे मैदान विकसीत व संरक्षक भिंत. | ९,४६७ | तांत्रिक ले.प.होणे बाकी |
| | एकूण | २,२४,६२७ | |

आक्षेपाधीन रुपये २,२४,६२७/-

**परिच्छेद क्र. ६३ :- बांधकामाच्या कागदपत्रांबाबत**.

लेखा परीक्षण कालावधीत सातारा नगरपरिषदेतील बांधकाम विभागातील विकास कामाची प्रमाणके, मोजमाप पुस्तके इत्यादींची तपासणी केली असता त्यामध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे उणिवा आढळून आल्या.

१. नगरपरिषद अंतर्गत बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग अंतर्गत मक्त्याने विकास कामे करण्यात आली आहेत. मात्र त्यातील बहुतांश कामाच्या कामगार विम्याची रक्कम कपात करून विमा संचालनालय, मुंबई येथे भरणा करण्यात आलेल्या नाहीत.

तरी शा. नि. वित्त विभाग क्र. विकास-१०९८/प्र.क्र./२८८९/शासन हमी दिनांक १९/८/९८ विमा संचालक म. रा. मुंबई यांचे पत्र क्र. प्राविनि/२३०० सह विमा/सा. बा. वि./संकीर्ण/फ/दिनांक २०/४/०१ व सम क्रमांकाचे शासन परिपत्रक दि. ८ मे २००२ अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये का कार्यवाही करण्यात आली नाही.

२. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बी सी ए २००९/प्र. क्र. १०८/कामगार-७अ/मंत्रालय मुंबई दिनांक १७/६/२०१० व दि. ३/७/२०१० व त्यातील दिनांक

१७ जून २०१० च्या शासन आदेशामधील मुद्दा क्र. ५ व ६ अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर या खाती १% उपकराची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. तसेच त्याच आदेशातील परिशिष्ट १ मधील मुद्दा क्र. ४ नुसार कपात केलेल्या उपकराच्या रक्कमेचा धनाकर्ष महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचेकडे चलनाद्वारे जमा करणे बाबत निर्देशित केलेला आहे. मात्र या प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

३. मेजरमेंटवर रेकॉर्ड एंट्रीच्या ठिकाणी तारखा नमूद केलेल्या नाहीत. त्यामुळे सदरचे काम कधी सुरू व पूर्ण झाले याबाबतची खात्री लेखापरीक्षणात करता आली नाही. त्याचप्रमाणे वेळेत काम झाले नसल्यास दंड आकारणी आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केलेली दिसून येत नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

४. मेजरमेंटवरील मापे मान्य म्हणून मक्तेदाराची सही घेण्यात आली नाही. तसेच रक्कम अदा केल्यानंतर मेजरमेंटवर कर्ण रेषा मारणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे दुबार प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

५. बिल संमत करण्यात आले त्याचा प्रमाणक क्रमांक मोजमाप पुस्तकाच्या गोषवाऱ्याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्यक आहे. मात्र या बाबीकडे पुर्णत: दुर्लक्ष झाले आहे.

६. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता १९७१ नियम क्र. १७१ नगर परिषद अभियंता अथवा मुख्याधिकारी यांनी तपासणी केलेले बांधकामाचे निरीक्षण अहवाल दप्तरी नाही.

७. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता १९७१ नियम क्र. १७६ अन्वये नमुना १३२ कामाच्या परि पूर्तीचा अहवाल प्रत्येक विकास कामाच्या नस्तीस असून त्यावर नगर अभियंता यांची सही आहे. मात्र सदर नमुन्यातील कॉलम मधील माहिती भरण्यात आलेली नाही. तो कोरा असताना त्यामध्ये माहिती न भरता नगर अभियंता यांनी सही कशी काय केली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

८. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता १९७१ नियम क्र. १७२ अन्वये नमुना नं. १३३ कामाचे परिपूर्ती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे विकास कामाच्या नस्तीस नमुना क्र. १३३

जोडण्यात आले आहेत. मात्र त्यावर मुख्याधिकारी, न. पा. सातारा यांची सही नाही. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त बाबीबाबत साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र. ६४ :- बांधकाम नोंदवहीबाबत**.

सातारा नगरपरिषदेने हाती घेतलेल्या बांधकामाबाबत हिशोब ठेवण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता नियम १८१ व १८२ मधील तरतुदीनुसार नोंदवही नमुना नंबर १३८ व १३९ मध्ये विहीत नोंदवह्या ठेवलेल्या नाहीत. नियमबाह्यतेबाबत खुलासा करावा. तसेच बांधकामाचा हिशोबाबतचा सर्व तपशील अद्ययावत नोंदवून नोंदवही ले. प. स अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र. ६५ :- स्ट्रीट लाईट वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे ठेक्याबाबत**.

नगरपरिषद हद्दीतील स्ट्रीट लाईट योजनेची वार्षिक देखभाल व दुरुस्तीबाबतचे अभिलेख पडताळणी केली असता खालील अभिप्राय आहेत.

१. देखभाल दुरुस्ती ठेका पद्धतीने करणेकरीता जाहीर निविदा सूचना दै. पुण्यनगरी वर्तमानपत्रात दि. १८/९/१० अन्वये सन २०१०/११ या वर्षाकरीता प्रसिद्ध केली असून ३ निविदांपैकी श्री. मनोज सुरेश शेंडे यांची निविदा ठराव क्र. ११४३ दि. १४/२/२०११ अन्वये १ ते ७ बाबींकरीता मंजूर केली. निविदा प्रसिद्धीपासून मंजूरीचा कालावधी जवळपास ५ महिने इतका विलंबाचा आहे. उशीराने निविदा मंजूरीचे प्रयोजन स्पष्ट करावे व या दरम्यान देखभाली अभावी दुरुस्तीचा खर्च नाहक वाढला नसल्याची व नागरिकांची गैरसोय झाली नसल्याची खात्री पटवावी.

२. दि. १४/२/२०११ रोजी निविदा मंजूर केली असली तरी करारनामा दि. ३१/३/११ व कार्यादेश जा. क्र. सानप/विद्युत/३० दि. २४/६/२०११ अन्वये विलंबाने मंजूरी दिली. या दरम्यानच्या निविदा ते कार्यादेश या सर्व कागदपत्रांवर सन २०१०/११ या कालावधीकरीताच सदरचा ठेका असल्याचे नमूद आहे. सन २०१०/११ हे वर्ष संपल्यानंतर देखील ठेका मंजूर व कार्यान्वित न होता त्याच वर्षाचा उल्लेख केला जाणे यामुळे अक्षम्य निष्काळजीपणा दृष्टीस येतो. सदर ठेका सन २०११/१२ मध्ये सुरू

आहे. मात्र सन २०१०/११ करीता मंजूर ठेक्यास पुढे मुदतवाढ देण्याबाबत कोणताही ठराव दप्तरी नाही. यामुळे सन २०११/१२ मधील ठेक्याचे काम नियमबाह्यरीत्या सुरू ठेवण्यात आले आहे.

३. बाब क्र. १ अन्वये दरमहा रु. १,५४,३५०/- या रक्कमेस देखभाल दुरुस्तीचा ठेका मंजूर केला आहे. सदर दर निश्चितीचा तांत्रिक आधार नमूद नाही. वास्तविक विद्युत वितरण कंपनीकडून शहरातील स्ट्रीट लाईटचे पोल व त्यावरील डी.पी.ची संख्या, विद्युतवहनाचा दाब, वारंवारिता इ. तांत्रिक माहिती व ठेकेदार वापरणार असलेले विद्युत साहित्याचा दर्जा इ. याच्या आधारे सूत्र तयार करुन सरासरी दुरुस्ती कालावधी ठरवून त्या आधारे दर निश्चित करणे आवश्यक असता मोघमपणे रु.१,५४,३५०/- दरमहा काय आधारे ठेका रक्कम ठरविली याबाबत खुलासा करावा.

४. श्री. शेंडे यांची विद्युत ठेकेदार अनुज्ञप्ती क्र. २१९३० ही दि. १/१/२०१० ते ३१/१२/२०१० पर्यंतच वैध आहे. त्यानंतर नवीकरण केलेचे प्रमाणपत्र दप्तरी नाही. त्यांचेकडील कर्मचारी हे अधि. अभियंता, सा. बां. विभाग यांचेकडील सेवानियुक्त पर्यवेक्षक, तारतंत्री व शिकाऊ उमेदवार यांच्या नोंदवहीत नोंदणीकृत व नवीकरण असलेबाबत उतारा दप्तरी नाही. त्यामुळे कुशल व पात्र कर्मचारी ठेकेदाराकडे कार्यरत असलेबाबत प्रमाणित होत नाही. त्यामुळे देखभाल दुरुस्ती योग्य होत असलेची खात्री होत नाही.

५. जाहीराती सोबतच्या तसेच करारनाम्यातील अटी, शर्तीप्रमाणे सदर कामास विद्युत वितरण कंपनीची मंजूरी आवश्यक आहे. तसेच कार्यरत कर्मचाऱ्यांचा विमा उतरविलेबाबत व अटीप्रमाणे विक्रीकराबाबत सत्य प्रती निविदा सोबत असणे आवश्यक असता, सदर कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

६. ठेकेदाराने केलेल्या कामाबाबत नियंत्रणाची न. पा. ने विहीत पद्धत अवलंबली नाही. उदा. ठेकेदार व त्याचे कर्मचारी यांची दैनंदिनी अथवा दैनिक कामांचा अहवाल, नागरिकांच्या तक्रार अर्जावर निश्चित काळात कार्यवाही केलेचा अहवाल इ. बाबत नोंदवह्या, तत्सम कागदपत्रे दप्तरी नाहीत. त्यामुळे देखभाल दुरुस्तीचे काम यथायोग्य व ठेका देण्या बाबतच्या उद्दिष्टाप्रमाणेच होत असल्याचे प्रमाणित होत नाहीत.

उपरोक्त १ ते ६ मध्ये नमूद बाबनिहाय, तपशील वार खुलाशासह पूर्तता होईतो ठेक्याची रक्कम प्रतिमाह प्रमाणे सन २०११/१२ करीता आदा रु. २४,६६,४२२/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ६६ :- संगणक विभागाकरीता गोदरेज तिजोरी कपाट पुरविणेबाबत.**

नगरपालिकेने सन २०११/२०१२ मध्ये संगणक विभागाकरीता गोदरेज तिजोरी कपाट खरेदी करणे कामी प्र. क्र. १३८० दि. २५/११/२०११ अन्वये र. रु. २८,४००/- खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात येत आहेत.

उपरोक्त प्रमाणे तिजोरी कपाट खरेदी करणे कामी न. पा. चे जा. क्र./सानप/भांडार/५९ दिनांक २४/८/२०११ अन्वये दरपत्रके मागविण्यात आली होती. सदर दरपत्रके मागविण्याच्या जाहीरातीत पुरवठादारांनी आपली दरपत्रके दि. ३०/८/२०११ अखेर देण्यात यावीत असे नमूद केले आहे. सदर कामासाठी (१) श्री. दिप गिफ्टस (२) श्री. शिंदे स्टील फर्निचर, (३) झुटींग स्टील फर्निचर यांनी दरपत्रके दि. ३०/८/२०११ रोजी न. पा. कडे सादर केलेचे दरपत्रकाच्या लिफाफ्यावरील आवक क्रमांक व दिनांकावरून दिसून येते. तथापी उपरोक्त तीनही पुरवठादारांची दरपत्रके तपासली असता सर्व दरपत्रकावर दरपत्रक दिल्याचा दि. २/९/२०११ नमूद केला आहे. तीनही पुरवठादारांच्या दरपत्रकांचे लिफाफे दि. ३०/८/२०११ रोजी प्राप्त झालेबाबत न. पा. कडील आवक क्रमांक व दिनांक नमूद केले असताना लिफाफ्यांच्या आत असणाऱ्या तीनही दरपत्रकांवर दि. २/९/२०११ असा दिनांक नमूद कसा म्हणजेच सदर निविदा प्रक्रिया व खरेदी ही नगरपालिकेने पुरवठादार पूर्वनिश्चित करून फक्त कागदोपत्री राबविली आहे असे लेखापरीक्षणाचे मत आहे. तरी उपरोक्त बाबत समर्थनीय खुलासा सादर करून केलेल्या खर्चाच्या योग्यतेबाबत पूर्तता दाखवावी. तोपर्यंत खर्चाची र. रु. २८,४००/- लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ६७ :- पोहणे तलाव कडून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा खर्च जादा केल्याबाबत.**

नगरपालिका साताराकडील पोहणे तलावाकडून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा खालीलप्रमाणे जादा खर्च केला आहे.

| सन | उत्पन्न | खर्च | जादा |
|---|---|---|---|
| २०११-१२ | ६८,५००/- | १,०७,८२०/- | ३९,३२०/- |

तरी सदरचा खर्च हा उत्पन्नापेक्षा जास्त असल्याने तोटा सहन करावा लागत आहे. तरी उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करून उत्पन्न वाढविणेबाबत प्रयत्न करावा व केलेली कार्यवाही लेखा परीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. ६८ :- नगरपालिका मालकीच्या शॉपिंग सेंटरमधील रिकाम्या गाळ्यांबाबत**.

नगरपालिका साताराकडील सन २०११/१२ मध्ये खालीलप्रमाणे गाळे रिकामे होते.

| अ. क्र. | शॉपिंग सेंटरचे नाव | रिकामे गाळे संख्या |
|---|---|---|
| १ | सदर बझार शॉपिंग सेंटर | ०५ |
| २ | श्री. छ. सुमित्राराजे भोसले व्यापारी संकुल | १२ |
| ३ | श्री. छ. अभयसिंहराजे भोसले व्यापारी संकुल | १० |
| ४ | प्रतापसिंह महाराज भोसले व्यापारी संकुल | ०३ |
| ५ | सदाशिव पेठ मच्छी मार्केट | ०२ |
| | | एकूण ३२ |

सदर एकूण ३२ गाळे रिकामे असल्याने नगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. रिकामे गाळे भाड्याने देण्याबाबत योग्य ती कार्यवाही केल्याबाबतची खात्री लेखापरीक्षणास पटवून द्यावी.

**परिच्छेद क्र. ६९ :- वृक्ष विभागाकडील वित्तीय लेख्यांबाबत**.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण सहानुसार नागरी स्थानिक प्राधिकरण, वृक्ष प्राधिकरण निधी नावाचा स्वतंत्र निधी ठेवावयाचा आहे व प्राधिकरणास मिळणाऱ्या सर्व रक्कमा जमा करावयाच्या आहेत. याबाबत पुढील अभिप्रायाची पूर्तता दाखवावी.

१. नागरी स्थानिक प्राधिकरणाने प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी तुटीची रक्कम वृक्ष प्राधिकरण निधी कडे जमा करावयाची आहे. तशी अर्थसंकल्पात तरतूद करून निधी जमा करण्याची कार्यवाही केलेली नाही.

२. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ अन्वये रोख नोंदवहीतील नोंदीवर लेखापरीक्षक व मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या प्रत्येक व्यवहारावर घेतलेल्या नाहीत. तसेच रोख नोंदवहीवरील प्रत्येक पाने मुद्रांकित व मोहरबंद करून रोखवहीवर प्रमाणपत्र नोंदलेले नाही.

३. वृक्ष विभागाकडील रोखवही व बँक खाते पुस्तिका यांचे अवलोकन करता खालीलप्रमाणे तफावत आढळली.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | बँक खाते वरील ३१/३/१२ अखेरची शिल्लक रु.<br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्र. २००५२७३२२३० | | ९,६१.१८०.०७ |
| २. | रोख नोंदवहीनुसार १/४/११ ची आरंभिची शिल्लक | रु. ८१०४२६ (-) | |
| | सन २०११/१२ मधील जमा | रु. १०२००० | ९,१२,४२६.०० |
| | एकूण | रु.९,१२,४२६/- | तफावत रु. ४८,७५४.०७ |

उपरोक्त तफावत रु.४८,७५४.०७ चा मेळ दाखवावा. तसेच बँक खात्यातील व्याजाच्या नोंदी रोखवहीस घेण्याची दक्षता घ्यावी.

४. झाडे जगविणे/संवर्धनासाठी रु.५००/- घेतलेली रक्कम ही तसलमात ह्या शिर्षाखाली जमा घेण्यात येते. तसलमात/अनामत ह्या सदराखाली जमा रक्कम घेण्याच्या प्रयोजनाबाबत खुलासा करावा.

५. वृक्ष अधिकारी म्हणून दिनांक १३/११/२००९ पासून ७ कर्मचारी यांना प्रभाग निहाय कार्यभार देण्यात आलेला आहे. तथापी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण ५ मधील तरतूदींनुसार वृक्ष संवर्धन व वृक्ष गणना नोंदवही अद्याप ठेवलेली नाही. तसेच याबाबत कार्यवाही करणेत आलेली नाही.

**परिच्छेद क्र. ७० :- वृक्षकर निधी जमा बाबत**.

लेखापरीक्षण कालावधी सन २०११/२०१२ ची नगरपालिकेची वृक्षकराची थकबाकी रु.२८,८१,३१९/- होती व सन २०११/१२ ची मागणी रु.२७,४४,१६३/- होती. म्हणजे एकूण मागणी रक्कम रुपये ५६,२५,४८२/- होती. सन २०११/२०१२ मध्ये वृक्षकर थकबाकी पैकी

रु.८,३१,८२३/- व सन २०११/१२ चालू मागणी पैकी रु.१५,३४,५५९/- असा एकूण रु.२३,६६,३८२/- वृक्षकर वसूल केलेला आहे. तथापी सन २०११/२०१२ मध्ये वसूल केलेला वृक्षकर स्वतंत्र वृक्षकर निधीत जमा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. तरी वृक्षकराची एकूण वसुल रक्कम रु.२३,६६,३८२/- वृक्षकर निधीत जमा करून पूर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. ७१ :- जाहीरात कर वसुलीबाबत**.

सन २०११/१२ लेखा परीक्षणा दरम्यान नगरपरिषदेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीराती खेरीज इतर जाहीरातीवरील कर आकारणीबाबत पडताळणी केली असता खालील अभिप्राय आहेत.

१. नगरपरिषद (जाहीरातीवर कर) नियम १९७० चे कलम १२ (१) (अ) ते (ह) प्रमाणे तपशीलवार व वर्गवारीप्रमाणे जाहीरातींच्या बाबींप्रमाणे नोंदवहीत नोंद घेणे आवश्यक आहे. तथापि जाहीरात नोंदवही नमुना ५७ मधील नोंदी पाहता याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळते नाही. उदा. अ. क्र. १ ते ११० अन्वये विक्रम अॅड व डिलाईट अॅड यांना २०’ ह्न २०’, ३०’ ह्न १५’, ४०’ ह्न २०’, ३’ ह्न ४’ इ. वेगवेगळ्या आकाराचे जाहीरात बोर्डाकरीता कर आकारले आहे. तथापि वरीलप्रमाणे तपशीलवार वर्णानासह नोंद नसल्याने त्याच मापाचे बोर्ड असून कर आकारणी योग्य असलेची खात्री होत नाही.

२. जाहीरात कर मागणी नोंदवही न. नं. ५८ नुसार एकूण ४१५ जाहीरातदार आहेत. मात्र जाहीरात नोंदवही न. नं. ५७ अंतीम नोंद पृष्ठ क्र. ४१ नुसार २३० जाहीरातदारांचीच नोंद आहे. तफावतीबाबत खुलासा करून नोंदी अद्ययावत कराव्यात.

जाहीरातदारांची कायम व तात्पुरती अशी वर्गवारी केलेली नसल्याने त्यांची संख्या व केलेली कर आकारणी योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही. अनधिकृत जाहीरात बोर्डामुळे उपरोक्त तफावत पडत आहे किंवा कसे याबाबत खुलासा करून कर आकारणी करून दंडासह वसुली केलेची पूर्तता दाखवावी.

३. जाहीरातीवरील कर नियम १९७० कलम ७ व ८ प्रमाणे अनधिकृत जाहीरातदारांवर कार्यवाही केल्याचे आढळले नाही. याबाबत नस्ती, नोंदवही इ. अभिलेख ठेवल्याचे आढळले नाही. अनधिकृत जाहीरातींमुळे न. पा. च्या उत्पन्नावर परिणाम होत असल्याने याबाबत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

४. थकीत जाहीरात कर रु.८३,५१२/- बाबत जाहीरात कर नियम १९७० चे कलम १४ प्रमाणे तडजोडीसह वसूलीची कार्यवाही करावी. अथवा न. पा. अधिनियम १९६५ चे कलम १४८ ल(१)(ह) व (२) अन्वये थकीत रक्कमा वसूलीबाबत कार्यवाही करावी.

उपरोक्त १ ते ४ बाबत खुलासा करून जाहीरात कर आकारणी योग्य होत असलेबाबत पूर्तता सादर करावी.

**परिच्छेद क्र. ७२ :- मृत्यू-नि-सेवा उपदानाची रक्कम कमी आदा केलेबाबत.**

न. प. साताराकडील सन २०११/१२ चे लेखा परीक्षणात निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची निवृत्ती वेतन व कुटुंब निवृत्ती नस्तीची तपासणी केली असता नारायण आबासोा घोरपडे (वसुली लिपिक) हे दिनांक १०/८/२०१० रोजी सेवेत असताना निधन झालेने त्यांची वारस पत्नी श्रीमती धनलक्ष्मी नारायण घोरपडे यांना मृत्यू-नि-सेवा उपदानाची रक्कम आदा करणेत आलेली आहे.

शासन नियमाप्रमाणे सेवेत असताना मृत्यू झाला तर मृत्यू-नि-सेवा उपदानाची परिगणना करताना सेवा २० वर्षांपेक्षा जास्त झाल्यास त्याच्या वारस पत्नीस अहर्तकाली सेवेच्या पुर्ण केलेल्या प्रत्येकाच्या सहामाही कालावधीसाठी वेतनाचे निम्मे मृत्यू-नि-सेवा उपदान देय होते. असे असताना खाली नमूद केलेप्रमाणे त्यांचे वारस पत्नीला मृत्यू-नि-सेवा उपदानाची कमी रक्कम आदा करणेत आलेली आहे.

| | |
|---|---|
| सेवेत असताना मृत्यू दिनांक | १०/०८/२०१० |
| सेवेत नियुक्तीचा दिनांक | ०१/०५/१९८४ |
| निवृत्ती वेतनार्ह सेवाकाल | ०९/०३/२६ वर्षे |

| दिलेले मृत्यू-नि-सेवा उपदान | देय मृत्यू-नि-सेवा उपदान |
|---|---|
| १३७८० ह्व ५२ ÷ ४ = १,७९,१४०/- | १३७८० ह्व ५३ ÷ २ = ३,६५,१७०/- |

दिलेले मृत्यू-नि-सेवा उपदानाची रक्कम रु.१,७९,१४० (-) देय मृत्यू-नि-सेवा उपदान रक्कम रु.३,६५,१७०/- = कमी दिलेले मृत्यू-नि-सेवा उपदान रक्कम रुपये १,८६,०३०/-

कमी आदा केलेले मृत्यू-नि-सेवा उपदान रुपये १,८६,०३०/- संबंधितांना आदा करून पूर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. ७३ :- किमान रोख शिल्लक ठेवणेबाबत**.

म. न. प. लेखासंहिता १९७१ मधील नियम २७ प्रमाणे वित्तीय वर्षाच्या शेवटी खालीलप्रमाणे किमान रोख रक्कम शिल्लक ठेवली पाहिजे. त्यानुसार रुपये ५ लाखापेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या नगरपरिषदेसाठी रुपये ३०,०००/- अथवा मागील वित्तीय वर्षावरील उत्पन्नाच्या ४% यापैकी जी कमी रक्कम असेल ती रक्कम रोख स्वरूपात शिल्लक ठेवली पाहिजे. न. पा. कडे किमान शिल्लक याचा अर्थ, सर्व सामान्य हेतूसाठी विनियोग न करता येणाऱ्या सर्व संवैधानिक निधीमधील शिल्लकी, ठेवी, अनुदाने व विनिर्दिष्ट उद्दिष्टांसाठीची कर्जे यामधील अखर्चीत शिल्लकी, चिन्हांकित/पृथकरक्षीत निधीच्या शिल्लकी इत्यादी वगळून नगरपरिषदेकडे उरणारी मुक्तता / अनिर्बेंध हा आहे. त्याचप्रमाणे या नियमात उल्लेख केलेले उत्पन्न यामध्ये विशिष्ट उद्दिष्टांसाठी मिळालेल्या अनुदाना व्यतिरिक्त राज्य शासनाकडून मिळालेल्या इतर अनुदानाच्या जमेचा समावेश असावा असा उल्लेख आहे.

**परिच्छेद क्र. ७४ :- मोबाईल टॉवर व केबल नेटवर्कबाबत**.

अ) नगरपरिषद सातारा लेखापरीक्षण सन २०११/२०१२ मधील मोबाईल टॉवरची माहिती घेतली असता न. पा. सातारा हद्दीमध्ये एकूण २१ मोबाईल टॉवर असून त्याबाबतची माहिती सोबतचे परिशिष्ट क्र. ४ मध्ये नमूद केली आहे. सदर परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे न. पा. हद्दीतील २१ टॉवर न. पा. ने मान्यता देऊन अधिकृत केलेले आहेत का त्यापैकी काही टॉवर अनधिकृत आहेत याबाबतची माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. तरी सर्व टॉवर अधिकृत असलेबाबत कागदपत्रा आधारे पुर्तता दाखवून खात्री पटवावी. शासन आदेशाप्रमाणे मोबाईल सेवा खंडीत न होता अनधिकृत टॉवरवर कर वसुलीची कार्यवाही करावी. तसेच कार्यान्वित होणाऱ्या टॉवरवर सेवा सुरू होणेपूर्वीच कर आकारणी बाबत कार्यवाही करावी.

ब) सोबतच्या परिशिष्टातील नमूद माहितीप्रमाणे सर्व मोबाईल टॉवर बाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. डी. आय. टी./फाईल ०३/३३६ दि. १/४/०६ नुसार कार्यवाही

केलेली नाही. संबंधित कंपनीकडून परवाना शुल्क भरणा करून ज्या मिळकतीवर अथवा रिकाम्या जागेवर सदर मोबाईल टॉवर बसविण्यात आले आहेत व ते जेव्हापासून बसविण्यात आले आहेत तेव्हापासून सदर जागेची शासन आदेशाप्रमाणे वाणिज्य दराने वार्षिक कर आकारणी करून थकबाकीसह रक्कम वसूल करून न. पा. फंडात जमा करावी.

क) सामान्य प्रशासन विभाग शा. नि. दि. १/४/२००६ मधील परिच्छेद क्र. 'ब' व 'क' नुसार न. पा. हद्दीतील केबल नेटवर्क वाहिन्यांसाठी परवाना शुल्क वसूल करून न. पा. फंडात जमा केल्याची पूर्तता दाखवावी.

उपरोक्त अ ते क बाबत शासन आदेशानुसार कार्यवाही करुन पूर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. ७५ :- बृहतपत्रकातील तफावतीबाबत – भविष्य निर्वाह निधी.**

नगरपालिका लेखा संहिता १९७१ नियम १३४ (३) नुसार नमुना नं. १९ मध्ये बृहतपत्रक नोंदवही ठेवली आहे. त्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतनातुन भविष्य निर्वाह निधी रक्कमेची कपातीची नोंद घेण्यात आली आहे. सदर बृहतपत्रक नोंदवहीची दिनांक ३१/३/२०१२ ची अखेर शिल्लक आणि बँक खाते आणि भविष्य निर्वाह निधी खात्यावर केलेली गुंतवणूक यांचा मेळ घेतला असता त्यात तफावत आढळून आली. ती खालील प्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| १. | दि. ३१/३/१२ रोजी बृहतपत्राची अखेर शिल्लक | रु.१,७३,८०,७१८/- |
| २. | दि. ३१/३/१२ रोजी भ. नि. नि. रोज किर्द शिल्लक | रु. ९४,५८,६६०/४५ |
| | | तफावत रु. ७९,२२,०५७/४५ |

| | |
|---|---|
| १) कॅनरा बँक शिल्लक रुपये | ३१,४१,३१७/- |
| २) आय.डी.बी. आय. बँक | ४७,५३९/४५ |
| ३) गुंतवणूक रक्कम रुपये | ६२,६९,८०४/- |
| | ९४,५८,६६०/४५ |

तरी बृहपत्रकानुसार / खाते नोंदवहीनुसार कर्मचाऱ्यांना भ. नि. नि. ची अदायगी करावी लागणार असल्याने न. पा. ने भ. नि. नि. मध्ये गुंतवणूक करून तफावत दूर करण्याची दक्षता घ्यावी.

बृहतपत्रकामध्ये सहाव्या वेतन आयोगाची फरकाची रक्कम जमा केली आहे. परंतु सदरची रक्कम नगरपालिकेने कर्मचाऱ्यांच्या भ. नि. नि. बँकखातेमध्ये जमा केली नाही. योग्य ती कार्यवाही करून पूर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. ७६ :- बँक ताळमेळाबाबत सन २०११/२०१२**.

सन २०११/२०१२ चे लेखापरीक्षणात माहे मार्च २०१२ ची दि. ३१/३/२०१२ ची रोकडवहीतील अखेरची शिल्लक व बँक पासबुकामधील शिल्लक यामध्ये तफावत असून शिल्लकेबाबत दैनंदिन पडताळणी होऊन तफावतीचा मेळ घेणेत आलेला नाही. याबाबत लेखा परीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ मधील नियम ५१(३) नुसार प्रत्येक महिन्याच्या शेवटी रोकडवहीत नमुद केलेल्या जमा व खर्चाच्या रकमांच्या पासबुकातील प्रत्येक नोंदीबरोबर तुलना करून शिल्लक रकमांचा मेळ घेण्यात येईल. फरक आढळून आल्यास सर्वसाधारण रोकडवहीतील तळटीपीत त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात येईल व न वटलेल्या धनादेशांची रक्कम व दिनांक, क्रमांक इत्यादी तपशिलासह यादी तयार करून रोकडवहीत नोंदविण्यात येईल. याप्रमाणे कार्यवाही न केल्याने सोबतचे परिशिष्ट क्र. ५ मधील रकाना क्र. ५ व ६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे तफावत दिसून येते. प्रत्येक महिना अखेरीस बँक ताळमेळ घेऊन तो लेखापाल, अंतर्गत लेखापरीक्षक यांचेकडून तपासून घेऊन मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक होते. तथापी याप्रमाणे कार्यवाही न केल्याने निधीतील शिल्लक रकमा योग्य असलेबाबत खात्री करता आली नाही. तरी बँक ताळमेळ घेऊन शिल्लका योग्य असलेबाबत पुर्तता दाखवावी.

**परिच्छेद क्र. ७७ :- विविध नमुने छपाई व साठा नोंदीबाबत**.

नगरपरिषद साताराने कामकाजाकरीता लागणाऱ्या विविध नमुन्यांची छपाई करून घेतली आहे व वेळोवेळी खर्च/वाटप साठा नोंदवहीत दर्शविले आहे. त्याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

१. कार्यादेश क्र. ८२ दि. २२/९/२०११ अन्वये लेटर पॅड व व्हीजिटींग कार्ड छपाई खालीलप्रमाणे करून घेतली आहे.

| बील क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशील |
|---|---|---|---|
| ६४१ | २८/९/११ | ५,१३०/- | लेटर पॅड १०० पानी ३० नग रु.१७१/- प्रमाणे |
| ६४१ | २८/९/११ | २,५५६/- | व्हीजिटींग कार्ड १८०० नग रु.१४२/-शेकडा प्रमाणे |
| | एकूण | ७,६८६/- | |

उपरोक्त रक्कम कोहीनूर प्रेस यांना आदा केली आहे. छपाई २ नोंदवही पृष्ठ क्र. ८६ नुसार ३० नग लेटरपॅड छपाई केल्याचे नोंदविले. मात्र कोणत्या सदस्याचे किती लेटरपॅड छपाई केली याचा तपशील व त्याप्रमाणे वाटप/पोच दर्शविली नाही.

व्हीजिटींग कार्ड १५०० नग वाटप दर्शविले. मात्र प्रती पदाधिकारी किती कार्ड छपाई केली याचा तपशील नमूद नाही. त्यामुळे उपरोक्त दोन्ही वाटप नमुन्यांबाबत खात्री होत नाही.

२. पान क्र. १७२ प्रमाणे वर्क ऑर्डर छपाई बील नं. १५१४ दि. ३१/३/११ रु. १,७६०/- प्रत्येकी ४४०/- प्रमाणे आदा केले. मात्र सदर फॉर्म संख्या पुढील साठा नोंदवही (२०११/१२) मध्ये नमूद केलेली नाही. त्याचप्रमाणे पान क्र. २६७ प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन २० पुस्तके वर्क ऑर्डर क्र. ५७ दिनांक १२/८/२०१० नुसार खरेदी केली. मात्र २०११/१२ पुढील साठा नोंदवहीत सदर खरेदी रु. ६७/- नग प्रती प्रमाणे २० नगाची रु.१,३४०/- नोंद नाही. त्यामुळे र. रु. ३,१००/- लेखा परीक्षणास अमान्य करण्यात येत आहेत.

३. स्थायी समिती ठराव क्र. १७४० दि. ११/५/२०११ अन्वये सन २०११/१२ करीता अर्थसंकल्प अंदाजपुस्तके १७५ नग रु. २८२/- प्रमाणे रु.४९,३५०/- आकारले. बील क्र. ८३३ पाहता त्यावर दिनांक २२/३/२०११ नमूद आहे. म्हणजेच मागणी करण्यापूर्वीच पुरवठा केल्याचे दर्शविले आहे. यावरून अंदाजपुस्तके पुरवठा नियमानुसार वेळेत व योग्य झाल्याचे सिद्ध होत नाही.

उपरोक्त १ ते ३ ची पूर्तता होईपर्यंत रु.३,१००/- अमान्य व रु. ५७,०३६/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहेत.

**परिच्छेद क्र. ७८ :– वर्गीकरण नोंदवहीबाबत**.

नगरपालिकेने सन २०११/२०१२ करीता महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ चे नियम ५६ नमुना क्रमांक २४ प्रमाणे जमा व खर्चाच्या वर्गीकरण नोंदवह्या ठेवल्या आहेत. तथापी सदर नोंदवह्यात खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्या.

जमा व खर्च वर्गीकरण नोंदवहीमध्ये मूळ अंदाजपत्रकीय तरतूद तसेच सुधारीत अंदाज पत्रकाप्रमाणे तरतुदी नमुद केलेल्या नाहीत. तसेच नोंदवहीतील एकूण पानांची संख्या त्या नोंदवहीच्या शेवटच्या पानावर प्रत्यक्ष मोजणीनुसार लिखित स्वरुपात अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली नाही. तसेच जमा व खर्च वर्गीकरण नोंदवहीतील एकूण वार्षिक जमा व खर्च रक्कमा अधिकाऱ्यांनी स्वाक्षरीसह प्रमाणित केलेल्या नाहीत.

तरी उपरोक्त उणिवांची पुर्तता करून केलेली पुर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. ७९ :– इमारत भाडे व भुई भाडे वसुलीबाबत**.

नगरपालिका साताराकडील सन २०११/१२ या कालावधीतील इमारत भाडे, भुई भाडे मागणी व वसुली नोंदवही पडताळणी केली असता त्याबाबत खालील आक्षेप घेण्यात येत आहेत.

१. इमारत भाडे व भुई भाडे येणे बाकी एकूण १,४१,८८,१३७/– एवढी आहे. तरी सदर रक्कम संबंधितांकडून व्याजासह वसूल केल्याची पूर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

२. इमारत भाडे, भुई भाडे प्रति महिना वसूल होणे आवश्यक आहे. तथापी तशी कार्यवाही केलेली नाही. याबाबत योग्य ते स्पष्टीकरण करून प्रति महिना भाडे वसुली करून पुर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

३. इमारत भाडे व भुई भाडे येणे बाकी रक्कमेबाबत कायदेशीर कारवाईबाबतचा अहवाल लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावा.

उपरोक्त आक्षेपात नोंद केल्याप्रमाणे नगरपालिकेने कार्यवाही केल्यास नगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. तरी कार्यवाहीची पुर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. ८० :- कोर्ट केसेस नोंदवही व वकील फी अदाईबाबत.**

नगरपालिका सातारा सन २०११/१२ या आर्थिक वर्षात कोर्ट केसेस व वकील फी अदाईवर रक्कम रुपये ३,६३,५९५/- इतका खर्च करण्यात आला आहे. त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

१. कोर्ट केसेस नोंदवही महा. न. प. लेखा संहिता १९७१ मधील नियम क्र. १२१ नुसार नमुना क्र.९० मध्ये ठेवण्यात आलेली नाही. तसेच वर्षाअखेर न्यायालय निहाय मागील वर्षातील प्रलंबित चालू वर्षात नवीन दाखल केलेल्या त्यापैकी अंतिम निकाल लागलेल्या अशाप्रकारे न. पा. ने दाखल केलेल्या व नगरपालिका विरुद्ध दाखल केलेल्या दाव्यांचा गोषवारा काढणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नगरपालिकेच्या बाजूने व नगरपालिकेच्या विरोधात लागलेल्या एकूण निकालानुसार केसेसचा गोषवारा काढणे. तसेच न. पा. ने नियुक्त केलेल्या कायदे सल्लागारांकडे सोपविलेल्या केसेसची स्थिती दर्शविणारा गोषवारा काढणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केली नसल्याने न. पा. कडील प्रलंबित केसेस तसेच नियुक्त कायदे सल्लागारांची कामातील प्रगती इ. बाबत सद्यस्थिती समजून येत नाही. याबाबत योग्य तो खुलासा करण्यात यावा.

उपरोक्त परिच्छेदातील पूर्तता होईपर्यंत खर्चाची रक्कम रुपये ३,६३,५९५/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ८१ :- हत्यारे व सयंत्रेविषयक नोंदवही ठेवली नसलेबाबत.**

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ चे १८४ अन्वये नगरपालिका नमुना १४१ प्रमाणे हत्यारे व सयंत्रेविषयक नोंदवही ठेवणे अनिवार्य असून त्यामध्ये तयार सयंत्रे व यंत्रसामुग्री तसेच उपकरणे यांची नोंद करणे आवश्यक आहे.

सन २०११/१२ चे लेखा परीक्षणात असे निदर्शनास आले की नगरपालिकेने अशा प्रकारची नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे नगरपालिका मालकीची सयंत्रे व यंत्रसामुग्री उपकरणे तसेच हत्यारे व किरकोळ संकीर्ण वस्तुविषयी बोध होत नाही. तसेच सदरहू बाबींचा गैरवापर होण्याची किंवा त्या गहाळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विहित नमुन्यात अद्ययावत नोंदवही ठेवण्यात यावी.

तसेच गहाळ झालेल्या हत्यारे व औजारांची जबाबदारी निश्चित करून संबंधितांकडून बाजारभावाप्रमाणे वसूली करून तसे अनुपालन लेखा परीक्षणास सादर करावे.

**परिच्छेद क्र. ८२ :- अंत्यसंस्कार सहाय्यक मंडळांना अनुदान वाटपाबाबत.**

सन २०११/१२ लेखा परीक्षणा दरम्यान नगरपरिषद हद्दीतील मृत व्यक्तींच्या अंत्य संस्काराकरीता संस्था/मंडळांना सहाय्यक अनुदान नगरपरिषदेमार्फत खालील मंडळांना दिले आहे.

१. गेंडामाळ कब्रस्थान

२. फुटका तलाव गणेशोत्सव मंडळ

३. कै. शरद लेवे स्मृती प्रतिष्ठान

४. भैरवनाथ, महादेव, नृसिंह, गणपती देवस्थान ट्रस्ट

५. वैकुंठ अंत्यसंस्कार सहाय्यक मंडळ

याकरीता सन २०११/१२ मध्ये एकूण रु.१,४२,०५२/- इतकी रक्कम खर्च दर्शविली आहे. याबाबत खालील अभिप्राय आहेत.

१. उपरोक्त संस्थांचे वरील कामाचे स्वरूप हे धर्मादाय प्रकारचे असल्याने सदर संस्था/मंडळे सहा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत असल्याबाबत प्रमाणपत्र आवश्यक आहे. मात्र वरीलपैकी फक्त अ. क्र. ५ वैकुंठ अंत्यसंस्कार सहा. मंडळ यांचेच प्रमाणपत्र दप्तरी आहे. अन्य संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत नसलेबाबत खुलासा करावा.

२. उपरोक्त पाचही मंडळ/संस्थांचे वार्षिक लेखे सनदी लेखापाल यांचेकडून तपासणी करून प्रमाणत केलेबाबत अहवाल दप्तरी नाहीत. त्यामुळे सदर मंडळे अनुदान प्राप्तीस लायक असलेबाबत प्रमाणित होत नाही.

३. नस्तीसोबत टिपणीमध्ये नगरपरिषदेच्या कर्तव्याबाबत अधिनियम १९६५ चे कलम ४९(२)(ह) याचा उल्लेख केला आहे. तथापी सदर कलमानुसार अंत्यसंस्कारसंबंधी विल्हेवाटीची कामाची नगरपरिषदेची स्वत:ची जबाबदारी आहे. त्याऐवजी नगरपरिषद संस्थांना अनुदान देत आहे. सदर बाब ही कलम ४९(३)(स) या खाली येत आहे. न. पा. ने उपरोक्त कर्तव्यासंबंधी सुस्पष्ट धोरण नमूद करणे आवश्यक आहे.

उपरोक्त १ ते ३ बाबत खुलासा होईतो रु.१,४२,०५२/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र. ८३ :- प्रतयेक मालमत्तेस स्वतंत्र क्रमांक न दिल्याबाबत.**

महा. न. पा. लेखासंहिता १९७१ मधील नियम ७५(२) नुसार एकाच क्रमांकाच्या मालमत्तेमधील एक भाग असणाऱ्या प्रत्येक भागास (गाळ्यास) मालमत्ता क्रमांकानंतर अ, ब, क, ड असे जोड क्रमांक देणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही न केल्यामुळे कोणत्या मालमत्ताधारकाची कोणती मालमत्ता आहे हे समजून येत नाही. तसेच अधिनियम १९६५ चे कलम ११४ (३) प्रमाणे नमूद वर्गवारी प्रमाणे योग्य मूल्याची कर आकारणी झाली आहे व न. पा. स कराचे योग्य उत्पन्न मिळत आहे, याची खात्री होत नाही. तसेच एकत्रित मालमत्ता कर नियम १९६९ चे नियम ७ प्रमाणे मुख्याधिकारी यांनी त्यांना योग्य वाटेल अशा पद्धतीने हिश्श्यांना स्वतंत्र क्रमांक देऊन त्याप्रमाणे योग्य करनिर्धारण केल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

याबाबत खुलाशासह नियमानुसार कार्यवाही केलेबाबबत पूर्तता सादर करावी.

**परिच्छेद क्र. ८४ :- शिक्षण कर व रोजगार हमी कर भरणा रक्कमेबाबत.**

महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम १९६९ अन्वये शासनाने नगरपरिषद हद्दीतील इमारतींवर शिक्षण व रोजगार हमी उपकर बसविलेले आहेत. त्यानुसार सदर उपकर वसूल करून शासकीय कोषागारात विहीत कालावधीत भरण्याची जबाबदारी नगरपरिषदेची आहे.

१. सन २०११/१२ मध्ये उपरोक्त दोन्ही कराची रक्कम वसूली व भरणा खालीलप्रमाणे केल्याचे जमा व खर्च वर्गीकरण नोंदवहीत नोंदवले आहे.

| जमा उपकर | रिबीट | भरणे आवश्यक | प्रत्यक्ष भरणा | कमी भरणा |
|---|---|---|---|---|
| २,३५,८६,०१० | ४,३३,३१४ | २,३१,५२,६९६ | २,१६,६५,६५२ | १४,८७,०४४ |

उपरोक्त कमी भरणा रक्कम ही गतसालातील आहे किंवा कसे याबाबत नोंदवहीत तपशीलासह नोंदी नसल्याने कमी भरणा रु. १४,८७,०४४/- बाबत खुलासा करावा व आता तपशीलवार नोंदीसह योग्य भरणा केलेबाबत खुलासा करावा.

२. सन २०११/१२ मधील जमा उपकर रक्कमा सन २०१२/१३ मध्ये म्हणजे पुढील वर्षात केल्याचे खालीलप्रमाणे आढळते.

| रोजगार हमी कर | शिक्षण कर र.रु. | जमा दिनांक | भरणा दिनांक चलन |
|---|---|---|---|
| १,७९,५७७ | ११,५४,५११ | २६ ते ३१ मार्च २०१२ | ७/४/२०१२ |
| १,०९,९२० | ५,४८,८०६ | ३१ मार्च २०१२ | २४/४/२०१२ |

उपरोक्त रक्कमा विहीत मुदतीत न भरण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

३. उपरोक्त अ. क्र. १ प्रमाणे नमूद कमी भरणा रक्कम ही फक्त सन २०११/१२ च्या उपकरा बाबतची आहे. मत्ता दायित्व विवरणपत्र पाहता एकूण थकबाकी रु.२,७५,०४,२२२/- इतकी भरणा करणे बाकी आहे. सदर रक्कमांबाबत सन २०१०/११ व त्यापूर्वीच्या थकबाकी रक्कमांबाबत वर्षनिहाय मेळ घेऊन सर्व थकबाकी रक्कमा शासनाकडे भरणा केल्याची पूर्तता सादर करावी.

उपरोक्त १ ते ३ बाबत खुलाशासह तपशीलवार पूर्तता सादर करावी.

**परिच्छेद क्र. ८५ :- कराची वाढीव रक्कम, परतावा रक्कम तसेच निर्लेखित करावयाच्या रक्कमेबाबत**.

महा. नगरपरिषदा, नगर पंचायती व औ. नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०६ (ब) (सुधारणा २०११) अन्वये कराची अधिक भरलेली परत करावयाची रक्कम, कलम १२७ अन्वये सूट दिलेली रक्कम तसेच कलम १६७ अन्वये निर्लेखित करावयाची रक्कम या रक्कमांबाबत लेखासंहिता नियम ८२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे याबाबतचे करदात्यांचे अर्ज, त्यावरील आदेश क्रमवार, प्रभागवार दप्तरी ठेवावयाचे आहेत. तसेच परताव्याबाबत दुबार प्रदान टाळण्यासाठी सर्व परतावे मागणी पुस्तकात अभिप्राय स्तंभात नोंदवावे. असे असता अर्ध समास पत्र क्र. १ व क्र. ५ अन्वये मागणी पुस्तक उपलब्ध करणेबाबत सूचित करूनही लेखापरीक्षण कालावधी अखेर उपलब्ध झाले नाही. त्यामुळे उपरोक्त बाबी खाली किती रक्कम प्रलंबित आहे, हे समजू शकले नाही. तसेच दुबार प्रदान झाले किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही.

मागणी पुस्तक नसल्याने तसेच उपरोक्त रक्कमांच्या प्रदानाबाबत पर्यायी नियंत्रण व्यवस्था नसल्याने रक्कमांचे दुबार प्रदान तसेच सूट, परतावा, निर्लेखन याखाली पात्र नसताना देखील रक्कमा प्रदान तसेच निर्लेखित केल्या जाऊ शकतात. अधिनियम तसेच लेखा संहीता याप्रमाणे अभिलेखे न ठेवल्याने शासनाद्वारा नियमित केलेल्या प्रचलित पद्धतीवर अधिक्रमण झाले आहे. सदर बाब गंभीर आहे. मागणी पुस्तक ठेवले नसल्याबाबत व उपरोक्त रक्कमांबाबत योग्य ती कार्यवाही केलेबाबत खुलाशासह पूर्तता सादर करावी.

**परिच्छेद क्र. ८६ :- जमा पावती पुस्तकांबाबत व अन्य नमुन्यांबाबत**.

महा. नगरपरिषद लेखासंहीता १९७१ नियम ९, ४६ व १५२ अन्वये नगरपरिषदेच्या उपयोगासाठी ठेवलेली पावती पुस्तके, परवाना नमुने, धनादेश पुस्तके, तिकीटे इ. नमुन्यांच्या पुस्तकांच्या साठ्याचा हिशोब नमुना क्र. १ नोंदवहीमध्ये ठेवला पाहिजे. त्याच्या विनियोगाबाबत नोंदीची तपशीलासह पडताळणी केली असता पुढील अभिप्राय आहेत.

१. उपरोक्त नियम ९ मधील (१) ते (८) अन्वये नमूद पद्धतीनुसार उपरोक्त नमुने त्यांचा साठा, विनियोग याबाबत विहीत कार्यवाही नियमित होत असलेबाबत आढळले नाही. उदा. अ. क्र. ४ अन्वये एकावेळी पूर्ण वापरलेली सर्व पुस्तके परत घेण्यापूर्वीची नवी पुस्तके दिली जाणे, अ. क्र. ८ अन्वये पूर्णत: वापरलेल्या पुस्तकांची खाते प्रमुख / मुख्याधिकारी यांनी पावती पुस्तकातील नोंदी तपासलेबाबत, उपरीलेखन केलेल्या पावत्यांची काळजीपूर्वक तपासणी केलेचे प्रमाणित केले नाही.

२. नगरपालिकेने सन २०११/१२ मध्ये संगणकीकरण राबविले आहे. त्यानुसार प्राप्त होणाऱ्या सर्व रक्कमांपोटी संबंधितांना संगणकाद्वारे मुद्रीत पावती दिली जाते व त्याची नोंद संगणकात साठविली जाते. तथापि नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम ७८ (१) नुसार कर संकलकाकडे रक्कम जमा करण्यास आली की त्याने नमुना क्र. ४९ प्रमाणे ठेवण्यात आलेल्या मुद्रीत पावती पुस्तकांतून दुहेरी कार्बन प्रती लिपी पावती योग्य स्वाक्षरी व दिनांक घालून दिली पाहिजे. संगणकीकरण केल्याने या बाबीचे पालन होत नाही. नियम ७८ (१) अन्वये ठेवावयाच्या पावती पुस्तकांऐवजी संगणकीकृत पावत्या देणेबाबत शासनाद्वारे मान्यता असल्याची योग्य त्या कागदपत्राधारे खुलाशासह पूर्तता सादर करावी.

**परिच्छेद क्र. ८७ :– वार्षिक वेतनवाढी मंजुरीबाबत.**

सातारा नगर परिषद साताराकडील वर्ग – ३ च्या कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके पडताळणी केली असता सेवा पुस्तकांमध्ये एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण झाल्याची अथवा त्याबाबत सुट मिळाल्याची नोंद सेवा पुस्तकांमध्ये घेणेत आलेली नाही. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

अ) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग स्थाविक मभाप–१९८४/२७०१/२० दि. ११/९/७६ तसेच २०० अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मभाप १२७/१४/सीआर–२/८७/२० दिनांक ३०/१२/८७ नुसार एतदर्थ मंडळाची मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा उत्तीर्ण होणे पासून सुट मिळविणे आवश्यक आहे. अन्यथा कर्मचाऱ्याची वेतनवाढ रोखणे क्रमप्राप्त ठरते. तथापि तशी कार्यवाही करणेत आलेली नाही. योग्य ती कार्यवाही करून पुर्तता दाखवावी.

ब) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शानिक्र हिभाप–१०८३/१४४८/२० दि.१/१२/८४ नुसार एतदर्थ मंडळाची हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा तशी सूट मिळविणे आवश्यक आहे. अन्यथा कर्मचाऱ्याची वेतनवाढ रोखणे क्रम प्राप्त आहे. तथापी तशी कार्यवाही केलेली नाही. योग्य ती कार्यवाही करून पुर्तता लेखा परीक्षणास दाखवावी.

**परिच्छेद क्र. ८८ :– सेवा पुस्तकांमधील अनियमितता बाबत.**

नगरपरिषद सातारा सन २०११/१२ चे लेखा परीक्षणात कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तकांची पडताळणी केली असता खालील अनियमितता आढळून आल्या.

अ)

१. सेवा पुस्तकांमध्ये बहुतांशी कर्मचाऱ्यांच्या रजा मंजुरीच्या नोंदीवर व इतर घेतलेल्या नोंदीवर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

२. कर्मचाऱ्यांचे रजा लेखे अपूर्ण आहेत.

३. सेवा पुस्तकात स्तंभ क्र. ८ मध्ये कर्मचाऱ्याची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

४. सेवा नोंद पुस्तकातील स्तंभ क्र. ११ व १२ भरलेले नाहीत.

५. वार्षिक वेतन पडताळणी प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

ब) नवीन कर्मचारी सेवा पुस्तकाबाबत –

१. जात वैधता प्रमाणपत्राची नोंद नाही.

२. रजा लेखे अपूर्ण.

३. वार्षिक वेतन पडताळणी प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

४. सेवा पुस्तकातील पहिल्या पानावर जन्म दिनांक व जात पडताळणी कोणत्या कागदपत्रावरून केली याची नोंद नाही.

५. कर्मचारी गट विमा योजनेचा सभासद असलेबाबत नोंद नाही.

वरील अ, ब ची पूर्तता करून लेखा परीक्षणांस दाखवावे.

नगरपरिषदेने प्रत्यक्ष कराचे नोंदवहीत मागणी, वसुली नोंदवहीप्रमाणे करणेत आली किंवा कसे याबाबत आक्षेप अहवालात नमूद केलेले आहेत.

नगरपरिषदेस मिळालेल्या अनुदानाचा वापर अहवालातील आक्षेपास अधिन राहून त्याच कारणासाठी करण्यात आला आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे नियम १०(१) अनुसार हा लेखापरिक्षण अहवाला मिळाल्यापासून चार महिन्याच्या आत त्याचे अनुपालन वृत्त दोन प्रतीत नगरपरिषदेच्या ठरावासह मा. सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे विभाग, पुणे यांना सादर करावे.

लेखापरिक्षण अहवाल मिळाल्याची पोहोच तो मिळालेल्या दिनांकासह देण्यात यावी.

**सह संचालक,**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे विभाग, पुणे**

क्रमांक – स्था-२/ब-१/नपलेप/सातारा/२०११-२०१२/पुणे/२३४ दिनांक ३०/०३/२०१३

प्रत सादर :-

१. मा. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. संचालक, नगरपालिका प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. मा. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
५. मा. सहाय्यक संचालक (पंरास) स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई.
६. मा. वरिष्ठ लेखाधिकारी, बाह्य लेखा परीक्षण विभाग क्र.४, मुंबई.
७. मा. आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, पुणे.
८. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

प्रत अग्रेषित

१. सहायक संचालक स्थानिक लेखा परीक्षा, सातारा.
२. अभिलेखापाल, पुणे विभागीय कार्यालय, पुणे.

**सह संचालक,**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे विभाग, पुणे**

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग**

# सातारा नगरपरिषद, सातारा

## लेखापरीक्षण अहवाल

## सन २०११-१२

**प्रेषक :**
**सह संचालक**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**पुणे विभाग, पुणे**